(सभापतीस्थानी माननीय सभापती)

नियम 289 च्या प्रस्तावाबाबत.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील व सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी नियम 289 अन्वये दोन वेगवेगळया विषयावरील सूचना माझ्याकडे दिलेल्या आहेत. त्यासंदर्भात त्यांनी दोन-तीन मिनिटांत आपले विचार मांडावेत.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, गेली दोन महिने महाराष्ट्रामध्ये उत्तर भारतीयांविरोधात एका प्रांतवादी नव्या पक्षाने जाणीवपूर्वक वातावरण तापविण्याचा प्रयत्न केला आहे. या मुंबईत तसेच राज्यातील नाशिक व पुण्यासारख्या शहरांमध्ये कष्टाची कामे करणारे जे लोक आहेत त्यांना जाणुनबुजून बाधित करण्याचे काम या राज्यात सुरु केले आहे. त्याचा परिणाम म्हणून एक लाखाहून अधिक बांधकाम क्षेत्रातील मजूर आज पुणे आणि नाशिकमधून परागंदा झालेले आहेत, त्यांना या राज्यातून पलायन करावे लागले आहे. यासंदर्भात माननीय मंत्री महोदय श्री. अजितदादा पवार यांनी पुण्यात एक बैठक घेतली होती. अशी घटना या महाराष्ट्रात प्रथमच घडत आहे. खरे तर आपल्या महाराष्ट्राची अशी संकुचित भूमिका कधीही राहिली नाही. आपल्याला जितका महाराष्ट्राचा आणि मराठीचा अभिमान आहे तितकीच राष्ट्रीय एकात्मतेची भूमिकाही आपण यापूर्वी घेतलेली आहे. पण ज्यांनी मराठी माणसाबद्दल पुळका दाखविला तो पुतना मावशीचा पुळका घेऊन मराठीविरुध्द उत्तर भारतीय अशा प्रकारे देशविरोधी वातावरण निर्माण केलेले आहे. म्हणून या सभागृहाच्या माध्यमातून शासनाने यासंदर्भातील आपली भूमिका स्पष्ट करुन या लोकांना आश्वासित करण्याची आवश्यकता आहे आणि त्या अनुषंगाने सत्ताधारी पक्षाच्या बाजूने निवेदन करावे तसेच सभागृहात तसा प्रस्ताव आणून त्यावर चर्चा घडवून आणली पाहिजे. यासंदर्भात दोन राष्ट्रीय नेत्यांनी विधान केले आहे पण त्याबाबतीतील शासनाच्यावतीने भूमिका जशी स्पष्ट व्हायला पाहिजे तशी ती अजून स्पष्ट झालेली नाही. त्यामुळे आज संपूर्ण राज्यात प्रचंड भितीचे आणि द्वेषाचे वातावरण निर्माण झालेले आहे. ते वेळीच दुरुस्त केले नाही तर समाजात तसेच देशभर एक प्रकारे चुकीचा संदेश जाईल व त्यामुळे वातावरण आणखी बिघडेल. म्हणून माझी अशी विनंती आहे की, ज्या लोकांनी हे उद्योग सुरु केले आहेत त्यांच्यावर कारवाई होण्याची गरज आहे आणि जे लोक महाराष्ट्र सोडून बाहेर जात आहेत

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.....

त्यांना थांबवून आश्वासित करावे व त्याबाबतची चर्चा सभागृहात घडवून आणावी. म्हणून माझी शासनाला अशी विनंती आहे की, त्यांनी स्वत: पुढाकार घेऊन आपली भूमिका स्पष्ट करावी आणि असे केले नाही तर लोकांच्या मनात अनेक शंका निर्माण होतील. शासन स्वत:ला सेक्युलर म्हणवून घेते, राष्ट्रीय एकात्मतेचीशासनाची भूमिका असेल तर तशी स्पष्ट भूमिका या ठिकाणी घेणे आवश्यक आहे. अन्यथा चुकीचा मेसेज देशभर जाईल म्हणून शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मी विनंती करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी जो प्रस्ताव सभागृहात मांडला आहे त्यासंदर्भात मला असे सुचवावयाचे आहे की, महाराष्ट्रातील मुंबई, नाशिक व पुणे येथे असलेल्या उत्तर भारतीय मजुरांनी पलायन केले व त्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली त्याचबरोबर मुंबईतील मराठी बेरोजगार तरुणांना रोजगार मिळत नाही ही देखील वास्तववादी गोष्ट आहे. आज अनेक मराठी तरुण बेरोजगार आहेत, त्यांना काम मिळत नाही आणि या मराठी माणसाचा हक्क डावलून आपण असे करणार काय? हा माझा मुद्दा आहे. यासंदर्भात त्यांनी जी भूमिका मांडली त्या भूमिकेचे समर्थन करण्याच्या मन:स्थितीत मी निश्चितच नाही. त्याचप्रमाणे मराठी माणसाला या राज्यात न्याय मिळाला पाहिजे, ही स्पष्ट भूमिका मांडणे देखील तेवढेच आवश्यक आहे. कारण असे केले नाही तर ते बॅलन्सींग होणार नाही आणि केवळ एकाच बाजुची "री" ओढणे हे देखील बरोबर नाही तसेच उत्तर प्रदेशातील नेते मुंबईत येऊन कशा प्रकारचे वक्तव्य करतात त्याबद्दलही चिंता व्यक्त करण्याची गरज आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : आदरणीय सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी महाराष्ट्रात घडलेल्या दोन महिन्यापूर्वीच्या गोष्टीचा या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, उत्तर भारतीय फार घाबरुन गेलेले आहेत, त्यांची पळापळ सुरु आहे, त्यांचे जीवन उद्ध्वस्त झालेले आहे. परंतु सभापती महोदय, त्या गोष्टीचा अतिरंजित चित्र इलेक्ट्रॉनिक्स मिडीयाने निर्माण केलेले आहे. इलेक्ट्रॉनिक्स मिडीयाने एक एक गोष्टींचे दहा दहा वेळा दाखवून लोकांमध्ये भितीचे वातावरण, अशांतता निर्माण केलेली आहे. हे अशांत वातावरण तयार करण्याचे काम इलेक्ट्रॉनिक्स मिडीयानेच केलेले आहे. बिहारी आणि उत्तर प्रदेशच्या राजकीय लोकांनी मुंबईत येऊन वातावरण बिघडवण्यामध्ये खतपाणी घातलेले आहे. श्री. अबू आझमी यांनी तर शिवाजी पार्कवर, "आमच्या लोकांना न्याय मिळाला नाही तर आम्ही आमच्या लोकांना लाठया काठया देऊ" अशी घोषणा केली होती. त्यांच्या भडकाऊ भाषणाला स्वाभाविकच त्याच पध्दतीने प्रतिउत्तर देण्यात आले. परराज्यातील राजकीय लोकांनी नको ते प्रसंग निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अनिष्ट गोष्टीचा उगम झाल्यावर त्याचा बंदोबस्त तात्काळ केला गेला नाही तर भयानक परिस्थिती निर्माण होत असते, अशांतता निर्माण होत असते. आज परप्रांतियांचे मुंबई शहरामध्ये लाखोच्या संख्येने लोंढेच्या लोंढे येत आहे त्याला अटकाव केला नाही तर येथील भूमिपुत्रांवर त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. मुंबईत येणा-या परप्रांतियांवर बंधने घातली गेली नाहीत तर आहे त्यापेक्षा भयानक परिस्थिती निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही त्यामुळे या गोष्टीला कोठे तरी आळा घालण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र हा सोशिक आहे, महाराष्ट्राने अनेक अन्याय सहन केलेले आहेत,. परंतु आता जर बाहेरुन येणारे लोंढे थांबले नाही तर महाराष्ट्रातील अनेक भूमिपुत्रच बेरोजगार होतील. सध्या महाराष्ट्रातील 38 ते 40 लाख भूमिपुत्र बेरोजगार आहेत. त्यांना आपण उद्योग धंदे दिले नाहीत तर फार भयानक परिस्थिती निर्माण होईल. महाराष्ट्राच्या भूमिपुत्राच्या व्यथांकडे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी नितांत लक्ष देण्याची आवश्यकता आहे. स्थानिक भूमिपुत्रांना काम न देता परप्रांतियांना काम दिले गेले तर स्थानिक लोकांवर अन्याय करण्यासारखे होईल. खरे म्हणजे बाहेरच्या राज्यातून मुंबईमध्ये जे परप्रांतीय येत आहेत त्या परप्रांतियांना त्या त्या राज्याने त्या ठिकाणीच काम उपलब्ध करुन दिले तर परप्रांतीय मुंबईत येणार नाही.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

सभापती महोदय, ज्यावेळेस मी खासदार होतो त्यावेळेस मी पार्लमेंटमध्ये श्री. मुलायम सिंग यादव आणि श्री. लालू यादव यांना सांगितले होते की, तुम्ही तुमच्या राज्यामध्ये बेकारी निर्माण होणार नाही, तेथील तरुणांना तेथेच उद्योग धंदे मिळतील यासाठी बजेटमध्ये तरतूद केली तर परप्रांतीय मुंबईत येणार नाहीत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी अशांतता निर्माण करण्याचा पयत्न केलेला आहे. परंतु वातावरण शांत कसे होईल, येथील तरुणांना व्यवसाय कसे मिळतील याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

....3

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, उत्तर भारतीयांच्या मनात भितीचे वातावरण तयार झालेले आहे, त्यांचे जीवन असुरक्षित झाले आहे असा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी या ठिकाणी केलेला आहे. परंतु परप्रांतियांची भिती दूर करण्याचे काम हे शासनाचे आहे. परंतु असे असतांनाही शासनाकडून अशा प्रकारचे काम केले गेले नाही. त्यावेळेस शासन नावाची वस्तुच अस्तित्वात नव्हती असे आम्हाला दिसून आलेले आहे. भुमिपूत्रांचा प्रश्न या ठिकाणी महत्वाचा आहे तो कोणीही टाळू शकत नाही. खरे म्हणजे परप्रातीयांच्या प्रकरणाला इलेक्ट्रॉनिक्स मिडीयानेच जास्त महत्व दिलेले आहे. भारतीय जनता पार्टी जात,धर्म, पंथ पाळत नाही. महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारचे वातावरण तयार होणार नाही याकडे शासनाने अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. त्याच बरोबर भूमिपुत्रांच्या प्रश्नाकडेही तेवढेच महत्व देण्याची आवश्यकता आहे. एकीचे वातावरण तयार करण्याचे काम शासनाचे आहे. परंतु त्या कालखंडात आम्हाला शासन आस्तित्वातच दिसले नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कपिल पाटील यांच्या नावातच कपिल आहे त्यामुळे कुठल्याही प्रकारची अशांतता निर्माण होणार नाही आणि सारे सुरक्षित राहतील याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारचे वातावरण पुन्हा निर्माण होणार नाही याकडे शासनाने अधिक बारकाईन लक्ष द्यावे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी या ठिकाणी 289 अन्वये प्रस्तावाची जी सूचना दिली आहे ती अपुऱ्या स्वरुपात आणि एकांगी भूमिका घेऊन दिली आहे असे आमच्या पक्षाच्या वतीने मला निश्चितपणे वाटते. आपण भाषावार प्रांत रचना स्वीकारल्यानंतर व महाराष्ट्र राज्याचे हे विधीमंडळ आहे असे म्हटल्यानंतर येथील लोकांची सुरक्षितता, स्थानिक लोकांना रोजगार मिळवून देणे आणि अंतर्गत होणारे स्थलातंर याबद्दल राज्य शासनाची योग्य भूमिका असली पाहिजे.त्याच बरोबरीने महाराष्ट्रात जे लोकप्रतिनिधी असतील, महाराष्ट्रातील जे नेते असतील त्या सगळयांची अस्मिता आणि सन्मान पाळणे ही देखील आपल्या विधीमंडळाची जबाबदारी आहे. महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती पद आणि अन्य अनेक पदे स्वीकारलेले माननीय श्री. रा.सू. गवई यांच्या सारख्या नेत्यांचा अपमान बिहारच्या विधानसभेमध्ये झाला होता. "मराठी भाषिक लोकांचा मेंदू सडका असतो कारण ते समुद्र किनारी राहतात" असे वक्तव्य मराठी भाषिक लोकांच्याबद्दल उत्तर प्रदेश आणि बिहार मध्ये करण्यात आलेले आहे. तेव्हा मला असे वाटते की या संदर्भात आपल्याला जर चर्चा करावयाची असेल तर हा महाराष्ट्र नक्की कोणाचा आहे अशी सर्वागीण पध्दतीने चर्चा केली पाहिजे असे मला शिवसेना पक्षाच्या वतीने प्रतिपादन करावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, पिछले कुछ दिनों में मुंबई और महाराष्ट्र के दूसरे शहरों में पर-प्रान्तीय लोगों के बारे में जो घटनाएं हुई हैं, उसके संदर्भ में मैं अपने सदन को बताना चाहता हूँ कि मैं भी बिहार से 38 साल पहले नागपुर में कोल माइन्स में नौकरी करने के लिए आया था. खदान में काम करने के लिए बाहर से मजदूर आते थे. लेकिन मैं आपको यह बताना चाहता हूँ कि हमने वहां पर मराठी मजदूरों के लिए भी लड़ाई लड़ी है. जहां तक धरती पुत्र की बात है तो इनको धन्धा मिलना चाहिए. हमने मराठी मजदूरों के लिए भी संघर्ष किया है. लेकिन मुंबई शहर में जो कुछ उत्तर भारतीय लोगों के साथ हुआ और बिहार विधान सभा में श्री. रा.सु. गवई का जो अपमान हुआ, हम इन दोनों घटनाओं की निन्दा करते हैं. भारतीय संविधान में स्पष्ट रुप से कहा गया है कि कोई व्यक्ति पूरे देश में कहीं भी नौकरी या काम धंधा कर सकता है. लेकिन राजनैतिक स्वार्थ के लिए क्षेत्रवाद की बात होती है. मेरा प्रशासन और माननीय उप मुख्य मंत्री से अनुरोध है कि कठोर कदम उठाए जाएं और पूरे देश को आश्वस्त किया जाए कि मुंबई और महाराष्ट्र के दूसरे शहरों में जो पर-प्रान्तीय लोग रहते हैं, उनको सुरक्षा दी जाएगी. धन्यवाद.

. . . C-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे त्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, मध्यंतरी राज्यामध्ये जी परिस्थिती निर्माण झाली होती ती आता पूर्णपणे निवळलेली आहे. साधारणपणे उत्तर भारताकडे जाणाऱ्या रेल्वे गाडया जर आपण पाहिल्या तर होळीच्या निमित्ताने आणि लग्नाच्या निमित्ताने या महिन्यात आणि मागच्या महिन्यात अनेक रेल्वे गाडया भरुन जातांना व येतांना आपल्याला दिसून येतील. गेल्या वर्षीसुध्दा अशीच स्थिती होती. रेल्वे स्टेशनवर प्रवाश्यांची एवढी गर्दी असते की तेथे मोठया प्रमाणावर पोलीस बंदोबस्त ठेवावा लागतो. रेल्वेने प्रवास करणाऱ्यांची संख्या एवढी असते की रेल्वे गाडया देखील कमी पडतात. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये भीतीचे वातावरण आहे आणि बाहेरच्या राज्यातील लोक येथून निघून गेलेले आहेत अशी स्थिती नाही. मध्यंतरी जे वातावरण निर्माण झाले होते ते आता पूर्णपणे निवळले आहे. पोलिसानी योग्य भूमिका पार पाडली नाही असा उल्लेख केला गेला होता परंतु ही गोष्ट खरी नाही. वेळो वेळी जे काही प्रकार घडलेले आहेत ते प्रसार माध्यमांनी दाखविले होते. त्यामुळे महाराष्ट्रात आणि मुंबईमध्ये फार काही प्रकार होत आहेत अशा प्रकारचे चित्र निर्माण झाले होते परंतु घडलेल्या गुन्हयाच्या संदर्भातील संख्या आणि अटक केलेल्या व्यक्तींची संख्या जर आपण पाहिली तर ही संख्या विक्रमी आहे असे आपल्याला दिसून येईल.. पोलिसांनी योग्य पध्दतीने आणि चोखपणे आपले काम केलेले आहे. सेक्शन 153 (ए) खाली प्रक्षोभक भाषणे केल्याबद्दल महाराष्ट्राच्या स्थापनेपासून आतापर्यंत जे काही गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत त्यात सर्वात जास्त लवकर कारवाई या गुन्हयाच्या संदर्भात आता झालेली आहे. या संदर्भातील तरतुदी आणि बेल मागण्याची जी प्रोव्हीजन आहे त्याच्या बंधनात राहूनच राज्य सरकारला निर्णय घ्यावे लागतात कोणावरही कारवाई करण्यास राज्य सरकारने सोडलेले नाही. सगळया परिस्थितीवर राज्य सरकार लक्ष ठेवून आहे. कोणत्याही राज्यामधून आलेल्या माणसाला माहाराष्ट्रात राहण्याचा अधिकार आहे आणि त्याला संरक्षण देणे हे पोलिसांचे काम निश्चितपणे आहे. ते काम पोलीस करीत आहेत. या संदर्भात समाजामध्ये चांगला संदेश जावा या दृष्टीने या विषयावर सभागृहात चर्चा घडवून आणावी अशी भावना सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी व्यक्त केलेली आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशासकीय प्रस्ताव / शोकप्रस्ताव नाही

श्री. आर.आर.पाटील ....

जे विविध प्रस्ताव या संपूर्ण अधिवेशनात सभागृहात चर्चेला आणले जाणार आहेत त्यात कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा करून हाही प्रस्ताव चर्चेला घ्यावा. या विषयासंबंधात शिवसेना पक्षाची भूमिका नेहमीच स्पष्ट राहिली आहे, पण भारतीय जनता पक्षाची भूमिका मात्र स्पष्टपणे कळलेली नाही. ते परप्रांतियांच्या बाजूनेही बोलतात आणि महाराष्ट्रीयन माणसांच्या बाजूनेही बोलत आहेत. त्यामुळे त्या पक्षाची भूमिका शिवसेना पक्षाच्या भूमिकेसारखी स्पष्ट नाही. तेव्हा या विषयावर सभागृहात जेव्हा चर्चा होईल तेव्हा भा.ज.पक्षाची भूमिका याबाबत काय आहे ते स्पष्ट समजू शकेल. तेव्हा सभापती महोदय, या विषयायवरील प्रस्ताव आपण कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा करून, ठरवून सभागृहात चर्चेला आणावा.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 289 चा प्रस्ताव येथे दिलेला आहे. आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये जे विषय आहेत त्यात हा विषय नाही. म्हणून तांत्रिकदृष्ट्या हा नियम 289 खालील प्रस्ताव मला स्वीकारता येणार नाही. मात्र आता माननीय उप मुख्यमंत्र्यांनी ज्या पद्धतीने येथे सांगितले त्याप्रमाणे कामकाज सल्लागार समितीमध्ये विचार विनिमय करून, दोन्ही बाजूंकडून चर्चा होऊन या विषयावरील प्रस्ताव जरूर आपण सभागृहात चर्चेला घेऊ या.

..... डी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांनी नियम 289 खालील दिलेली प्रस्तावाची सूचना.

सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी नियम 289 खालील प्रस्तावाची सूचना दिलेली आहे, ती मी का स्वीकारावी याबाबत सन्माननीय सदस्यांना काही सांगावयाचे असल्यास मी त्यांना एक दोन मिनिटे बोलण्याची संधी देतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, नियम 289 खालील प्रस्तावाची सूचना मी यासाठी दिलेली आहे की, आज केवळ मुंबई शहरातच नव्हे तर महाराष्ट्राला ज्या गोष्टीने, ज्या प्रकरणाने हादरविले आहे, त्या पोलीस खात्यातील उच्च पदस्थांकडून बिल्डर चतुर्वेदी यांना नाहक अटक करून 41 दिवस पोलीस कोठडीत ठेवले जाण्याचे जे प्रकरण आहे त्याबाबतीत आता सरकारने घाईघाईने भूमिका घेतली आहे. सभापती महोदय, मुंबईतील अभ्युदय नगर या मोठ्या गृहनिर्माण कॉलनीच्या विकासामध्ये पोलीस अधिकाऱ्यांचा असलेला इंटरेस्ट यातून दिसून येतो आणि हे सारे कोणाच्या सांगण्यावरून त्यांनी केले ते सारे जेव्हा या विषयावर या सदनात चर्चा होईल तेव्हा बाहेर येईल. पण मागील वेळेस या बाबत मी मुद्दाम विषय काढून सभागृहाबाहेरही माननीय गृह मंत्र्यांना भेटून याबाबतीतील वस्तुनिष्ठ माहिती दिली होती. पोलीस खात्यातील एक अतिरिक्त आयुक्त एखाद्या ठराविक बिल्डरला फायदा व्हावा म्हणून दुसऱ्या बिल्डरला अटक करून 40 दिवस आत टाकतो. सभागृहामध्ये लोकप्रतिनिधीने हा विषय काढल्यानंतर याबाबत चौकशी सुरू होते. जे पोलीस अधिकारी-कर्मचारी याबाबत खरी माहिती देतात त्यांच्या माहितीच्या आधारे ही सगळी केस उभी राहते आणि त्यांच्या साक्षीच्या आधारे या प्रकरणामध्ये आता आयपीएस अधिकाऱ्यांवर कारवाई होणार आहे. या प्रकरणी एसपीएस आदव यांनी जो अहवाल दिला आहे त्यात त्यांनी म्हटले आहे की, क्रमांक 10 ते 13 मधील अधिकाऱ्यांना या प्रकरणातील सत्य सांगण्यास मदत केली आहे. ...

श्री. आर.आर.पाटील (बसून..) : आपण त्यातील वरची ओळ वाचावी. ..

श्री. विनोद तावडे : मी आपल्याला ते अगदी पहिल्यापासून वाचून दाखवितो. त्यात त्यांनी म्हटले आहे की, "...परिशिष्ठ 'अ' मधील कसूरवार 13 पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना निलंबित करण्यात यावे. विशेष करून क्र. 1 ते 9 यांना निलंबित करण्यात यावे व क्र. 10 ते 13 यांच्यावर इतरांच्या तुलनेने सौम्य कार्यवाही करण्याची शिफारस आहे. कारण राज्य गुन्हे अन्वेषण

..... डी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. तावडे ....

विभागाकडून करण्यात आलेल्या तपासात अ.नं.10 ते 13 मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांनी तपासी अधिकाऱ्याला सत्य परिस्थिती सांगून मदत केलेली आहे व पुरावा गोळा करण्यास (त्यांच्या स्वत:च्या विरूद्धही) राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या तपासी अधिकाऱ्यांना मदत केलेली आहे. ..."

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना सांगू इच्छितो की, नियम 289 खाली आपण जी प्रस्तावाची सूचना दिली आहे तो विषय येथे इतक्या तातडीने का घ्यावा या विषयी आपण सांगावे आणि त्यासाठीच मी आपल्याला 2-3 मिनिटे बोलण्याची संधी दिली आहे. असे असताना आपण या विषयी सगळेच भाष्य करणे बरोबर नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्याला तेच सांगतो आहे, मुंबईमध्ये ख्वाजा युनुस मेला, हा बिल्डर चतुर्वेदी मेला नाही इतकेच. मुंबईमध्ये रिअल इस्टेट मध्ये आपले पोलीस अधिकारी आणि विकासक हे हातात हात घालून कामे करू लागले तर या राज्याचे वाटोळे होणार आहे आणि या दृष्टीने पाहता हा अतिशय महत्त्वाचा असा विषय आहे. या बाबत तपास करणारे सीआयडीचे अधिकारी सांगतात की, या प्रकरणात पोलीस अधिकारी-कर्मचारी दोषी आहेत. म्हणजे पोलीस खात्याच्या इतिहासामध्ये पोलीस आयुक्त डीसीपीच्या कार्यालयात जाऊन बैठक घेतो, आजवर अशी घटना कधी घडलेली नाही. परंतु या प्रकरणात अशी खास बैठक घेतली गेली आहे.

(यानंतर श्री. सरफरे .... इ 1 ..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

सभापती महोदय, याठिकाणी पोलीस खात्याच्या विश्वासार्हतेबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. या शासनाकडून याबाबतीत ठोस कारवाईचा संदेश पोलीस खात्यामध्ये जाण्याची आवश्यकता आहे. परंतु ज्यांनी हे प्रकरण बाहेर काढले त्यांना जर यामध्ये गोवले तर हे प्रकरण मार्गी लागणार नाही हे स्पष्ट आहे. यासंबंधी पोलीस प्रॉसिक्युटर आणि सी.आय.डी. च्या अधिकाऱ्यांचे स्पष्ट म्हणणे असल्यामुळे हा विषय अत्यंत महत्वाचा आहे.

सभापती : माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव कसा होतो या मर्यादेपर्यंतच बोलावे. आपणास परवानगी दिल्यानंतर त्यासंबंधी चर्चेच्यावेळी विस्ताराने आपणास बोलता येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हा नियम 289 अन्वये प्रस्ताव याकरिता होतो की, हे अधिवेशन सुरु असतांना इतक्या महत्वाच्या विषयावर राज्य सरकारची यंत्रणा खाजगीरित्या कामाला लागते, आणि त्या दिशेने पोलीस आयुक्त पावले टाकतात म्हणून हा अतिशय महत्वाचा विषय आहे. हा संपूर्ण अहवाल सांगतो की, यामध्ये पोलीस अधिकाऱ्यांचा वेगळया पध्दतीने इंटरेस्ट जोपासला जात आहे. म्हणून त्याच्या तपशिलामध्ये जाऊन सांगत आहे. यादृष्टीने या प्रस्तावावर सभागृहामध्ये चर्चा झाली पाहिजे. माननीय गहृमंत्र्यांना माझी विनंती आहे की, यामध्ये कोण अधिकारी सहभागी आहेत? याची माहिती घेऊन त्यांना शिक्षा केली गेली पाहिजे. अशाप्रकारचा मेसेज पोलीस यंत्रणेमध्ये गेला पाहिजे. असे झाले नाही तर या विषयासंबंधी मुंबईमध्ये उद्या गँगवारपेक्षा भयानक प्रकार वाढतील. म्हणून आपण नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडण्यास परवानगी द्यावी अशी विनंती करतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या सदनाचे माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी आजचा प्रश्नोत्तरांचा तास तहकूब करुन पोलिसांच्या विश्वासार्हतेसंबंधी चर्चा करण्याकरिता नियम 289 अन्वये प्रस्ताव याठिकाणी मांडला आहे. आणि या प्रस्तावावर सभागृहामध्ये चर्चा करावी अशी त्यांनी सूचना केली आहे. आपल्यासमोर माननीय गृहमंत्री सदनामध्ये बसले आहेत. त्यांच्यासमोर या विषयावर चर्चा झाली तर ते अधिक चांगले होईल. मुबई शहरामध्ये पोलीस आणि बिल्डर यांचे अतूट नाते निर्माण झाले आहे. यामधील एक प्रकरण आपल्यासमोर आले आहे. अशी अनेक प्रकरणे मुंबई शहरामध्ये असल्यामुळे तो काळजीचा आणि चिंतेचा विषय झाला आहे. दाऊद इब्राहीमचे लोक आज मुंबई शहरामध्ये एक संपूर्ण अनधिकृत वस्ती उभी करीत आहेत.. त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. मधुकर सरपोतदार....

वस्तीला मुंबई महानगरपालिकेची परवानगी नाही. पोलिसांच्या आशिर्वादाने या सर्व गोष्टी सुरु असल्यामुळे त्याला सामूहिक स्वरुप यावयास लागले आहे. या सर्व प्रकरणांमध्ये पोलीस कोणत्या टोकापर्यंत जात आहेत हे सांगण्यासाठी आपण जर या प्रस्तावाला संमती दिली तर त्यासंबंधी विस्ताराने सांगता येईल इतका हा चिंतेचा विषय आहे. म्हणून या विषयासंदर्भात सभागृहामध्ये चर्चा झाली पाहिजे. या प्रकरणी आपल्याला कोणती उपाय योजना करता येईल आणि हे प्रकार आपल्याला कसे थांबविता येतील यादृष्टीने चर्चा करण्याची आवश्यकता आहे. शासन या प्रश्नाकडे कोणत्या प्रकारे पहात आहे? हा प्रश्न आहे. पोलिसांमध्ये एकमेकांवर वार करण्याची अंदाधुंदी चालू आहे ती किती भयानक आहे हे आपण याप्रकरणी खोलात गेलात समजेल.. बिपीन बिहारी विरुध्द कोण आहे? आणि अन्य कोण कमिशनर यामध्ये सहभागी आहे? हे एकदा तपासण्याची आवश्ययकता आहे. असे अनेक महत्वाचे मुद्दे यामध्ये समाविष्ट असल्यामुळे माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी मांडलेल्या प्रस्तावावर चर्चा झाली पाहिजे असे मला मनापासून वाटते. म्हणून आपण हा प्रस्ताव स्वीकारावा अशी विनंती करतो.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी महत्वाचा मुद्दा असा आहे की, श्री. अरुप पटनाईक या पोलीस अधिकाऱ्यांवर संशयाची सुई आहे. दुसरी महत्वाची बाब अशी की, एक आय.पी.एस. अधिकारी आपल्याकडील खोटा देशी कट्टा त्यांना देतो, त्यांना खोटया नोटा दिल्या जातात. अश्विन नाईक टोळीतील चार लोकांना त्याठिकाणी हजर केले जाते...

सभापती : माननीय सदस्यांनी हा प्रस्ताव नियम 289 अन्वये कसा होतो एवढया मर्यादेपुरतेच बोलावे...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, प्रश्नोत्तरांचा तास महत्वाचा आहे याबद्दल वाद नाही. परंतु महाराष्ट्रातील उच्च दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांच्या विश्वासार्हतेसंबंधीचा प्रश्न निर्माण झाला आहे. हे प्रकरण अतिशय भयानक आहे. या प्रकरणामध्ये 12 पोलीस अधिकारी जेलमध्ये जातात? त्यासंबंधी चर्चा होत असते. कायदा व सुव्यवस्थेचे ज्यांनी संरक्षण करावे त्यांच्या मनामध्ये दहशत निर्माण झाली आहे. उद्या एखाद्या आमदाराविरुध्द एखादा अधिकारी काहीतरी सांगेल, आणि खोटे प्रकरण तयार करुन त्यांना जेलमध्ये टाकले जाऊ शकते. ही अतिशय महत्वाची गोष्ट आहे. याबाबतीत आपण श्री. अरुप पटनाईक यांना कां सोडले? "हे प्रकरण खोटे आहे याची मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. मधुकर चव्हाण....

याठिकाणी नोंद करतो, कर्तव्यात कसूर केल्याचा डाग माझ्यावर लागू नये, आणि वरिष्ठांचे ऐकले नाही असे नोकरीच्या शिस्तीत न बसणारे मी केले नाही याची मी नोद करतो" अशाप्रकारची डायरी हे अधिकारी तयार करतात. यामध्ये "उडदामाजी काळे गोरे" असे सर्व अधिकारी सामील आहेत. यामध्ये आपण श्री. अरुप पटनाईक यांना कां सहभागी करुन घेतले नाही? माझी विनंती आहे की, स्टेशन डायरी वगैरे या सर्व गोष्टी चर्चेच्या वेळी सांगता येतील. तेव्हा आपण नियम 289 अन्वये हा प्रस्ताव चर्चेकरिता घ्यावा अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : अध्यक्ष महाराज, या प्रकरणाचे असलेले गांभीर्य लक्षात घेऊनच ही संपूर्ण केस सी.आय.डी.कडे तपासासाठी देण्यात आली होती. सी.आय.डी.ने आतापर्यंत केलेल्या तपासामध्ये जे आढळून आले आहे, त्यानुसार संबंधितांची सखोल विभागीय चौकशी करुन कारवाई करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. कोणत्याही विभागीय चौकशीमध्ये अधिकारावर असलेल्या व्यक्तींकडून अडथळा आणला जाऊ नये, म्हणून सी.आय.डी.च्या सूचने प्रमाणेच संबंधितांना निलंबित करण्याची भूमिका घेतलेली आहे. ही गोष्ट खरी आहे की, जमिनीच्या किंमती वाढल्यानंतर स्वार्थीपणामुळे यामध्ये काही अधिकारी इन्व्हॉल्व्ह होण्याची शक्यता सुध्दा नाकारता येत नव्हती. या मुळे यामध्ये कोणीही अधिकारी इन्व्हॉल्व्ह होऊ नये म्हणूनच महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये इतक्या मोठया प्रमाणात लोकांना निलंबित करण्याचा निर्णय शासनाने आता घेतलेला आहे. यामध्ये जे कोणी दोषी असतील, ते विभागीय चौकशीमध्ये आणखी स्पष्ट होईल. यामध्ये जे दोषी असतील, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचीच शासनाची भूमिका आहे. चुकीचे काम करणारा कोणीही अधिकारी वाचणार नाही. सी.आय.डी.ला त्यांचा सर्व तपास पूर्ण करु द्यावा. त्यातून जे निष्पन्न होईल, त्यानुसार सगळयांवर जी कारवाई करणे आवश्यक असेल ती केली जाईल. कोणत्याही चुकीच्या माणसाला पाठिशी घालण्याची भूमिका आजपर्यंत घेतलेली नाही आणि घेतलीही जाणार नाही असा मी विश्वास देऊ इच्छितो.

सभापती महोदय, आता याठिकाणी आज 289 अन्वये जो प्रस्ताव दिला आहे, त्यावर चर्चा करण्याचा प्रश्न शिल्लक राहतो. हे अधिवेशन सात आठवडयांचे आहे. त्या कालावधीमध्ये बजेटवर चर्चा होणार आहे. गृह विभागाच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे. तसेच वेगवेगळया चर्चेच्या माध्यमातून हे प्रश्न उपस्थित करण्याची संधी आहे. त्यामुळे आजचा प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेऊन या विषयावर आजच चर्चा केली पाहिजे अशी काही स्थिती नाही. परंतु आपण जे मुद्दे उपस्थित करणार आहात, त्या सर्व मुद्यांना सविस्तरपणे उत्तरे देण्याची शासनाची तयारी आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. खरे म्हणजे जेव्हा सन्माननीय सदस्य नियम 289 अन्वये प्रस्ताव देतात. त्यावेळी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन, नियम 289 खाली हा प्रस्ताव चर्चेसाठी तातडीने कसा घ्यावयास पाहिजे, त्याचे काय महत्व आहे.एवढया मर्यादेपर्यंतच आपण दोन-तीन मिनिटांमध्ये माहिती सांगतो. पण काही वेळेला याच्या कक्षा अनेक पध्दतीने रुंदावल्या जातात.सन्माननीय सदस्यांनी हे टाळणे गरजेचे आहे

. . . .एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . . .

तांत्रिकदृष्टया सांगावयाचे तर आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये या अनुषंगाने कोणताही विषय नाही. त्यामुळे मी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव देण्यात आला आहे, तो नाकारीत आहे. त्याचबरोबर या सर्व चर्चेमध्ये प्रश्नोत्तराच्या तासातील एकूण 27 मिनिटांचा वेळ गेलेला आहे. त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास 27 मिनिटे वाढविण्याच्या बाबतीत मी निर्णय घेतलेला आहे.

. . . .एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

सभापती : प्रश्नोत्तरे.

राज्य शासनाकडून शेतकऱ्यांना दिले जाणारे कृषि भूषण पुरस्कार नकली आढळल्याबाबत

(1) * 33713 **डॉ. नीलम गोऱ्हे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. श्रीकांत जोशी , सय्यद पाशा पटेल , श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. दिवाकर रावते , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. अरविंद सावंत , श्री. सुरेश जेथलिया , श्री.परशुराम उपरकर , श्री. किसनचंद लेखराज तनवाणी , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , प्रा. फौजीया खान , श्री. गिरीश गांधी , श्री.सागर मेघे , डॉ.दीपक सावंत, विधान परिषद सदस्य** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्य शासनाने सन 2006 मधील कृषी भूषण पुरस्काराचे मानकरी म्हणून 19 शेतकऱ्यांची निवड केली होती, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या 19 शेतकऱ्यांना कृषी भूषण पुरस्कार म्हणून मा.राज्यपालांच्या हस्ते प्रत्येकी 50 ग्रॅम वजनाचे 14 कॅरेटचे सुवर्णपदक देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, 19 शेतकऱ्यांना देण्यात आलेली ही 14 कॅरेटची सुवर्णपदके नंतरच्या काळात चांदीची असल्याचे उघड झाले, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, या प्रकाराची शासनाकडून चौकशी झाली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व कोणकोणत्या अधिकाऱ्यांविरुद्ध कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे,
(5) कोणत्या शेतकऱ्यांना ही पदके बदलून देण्यात आली आहेत ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील, श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकरिता : (1) व (2) सन 2005 सालासाठी सन 2006 मध्ये पुढीलप्रमाणे 19 विविध पुरस्कारांसाठी निवड केलेली होती,

1) कृषि रत्न 1
2) कृषि भूषण 10
3) जिजामाता कृषि भूषण 5
4) शेतीमित्र 3

या पुरस्कार प्राप्तींना पदकांसह मा. राज्यपाल महोदयांच्या हस्ते गौरविण्यात आले.
(3) नाही. सदर पदके मिश्र धातूची असल्याचे आढळले.
(4) चौकशी अहवाल प्राप्त झालेला असून त्यानुषंगाने या प्रकरणी एफ.आय.आर.दाखल केलेला आहे. तसेच विभाग प्रमुख, कला व शिल्प विभाग, सर जे.जी.कला महाविद्यालय, मुंबई यांचे विरुध्द विभागीय चौकशीची प्रक्रिया सुरु आहे.
5) याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : अध्यक्ष महाराज, नागपूर अधिवेशनामध्ये या प्रश्नावरुन फार मोठा गदारोळ झाला होता. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी थोडेसे तपशीलवार उत्तर ....

. . . .एफ-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिलेले आहे. तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये स्पष्ट केलेले आहे की, "सदर पदके मिश्र धातूची असल्याचे आढळले."याठिकाणी असेही उत्तर देण्यात आलेले आहे की, "या प्रकरणी एफ.आय.आर. दाखल केलेला आहे. तसेच विभाग प्रमुख, कला व शिल्प विभाग, सर जे.जी.कला महाविद्यालय, मुंबई यांचेविरुध्द विभागीय चौकशीची प्रक्रिया सुरु आहे." माझा प्रश्न असा आहे की, ही घटना होऊन सात-आठ महिने झालेले आहेत. यासंबंधात आरोप पत्र दाखल केल्यानंतर कोणाविरुध्द कोणकोणते गुन्हे दाखल केलेले आहेत ? तसेच शासनाने यासंदर्भातील सध्याचे धोरण बदललेले आहे का ? जेणेकरुन शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही आणि शेतकऱ्यांनी जे परिश्रम घेतलेले आहेत. आपण त्यांच्या कामाबद्दल आदर व्यक्त करीत आहोत. अशा वेळी तो आदर आपण सच्च्या मनाने व्यक्त करीत आहोत असा विश्वास शेतकऱ्यांना वाटेल यादृष्टीने शासनाने कोणती पावले उचललेली आहेत ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : अध्यक्ष महाराज, दि.22-11-2007 रोजी आझाद मैदान, पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्र.304/07 एफ.आय.आर.दाखल केला असून कलम 420 लावण्यात आलेले आहे. याची चौकशी झाली आहे. संबंधित व्यक्तिने इंटेरिअम बेल घेतली होती. आता फायनल बेल मिळालेली आहे, त्यामुळे संबंधितांना अटक केलेली नाही. पण शासनाने संबंधित व्यक्तिला निलंबित केले असून, विभागीय चौकशी सुरु आहे. तसेच आता शासनाने यासंदर्भातील धोरणामध्ये बदल केला आहे. त्यानुसार पुढच्या काळामध्ये 50 ग्रॅम वजनाचे 14 कॅरेटचे सुवर्णपदक देण्याऐवजी मार्केटमध्ये जी किंमत असेल, आजच्यामितीला ही किंमत 35 हजार रुपयांच्या आसपास आहे. तेवढी रक्कम आणि एक स्मृतीचिन्ह देण्याच्या बाबतीत धोरण ठरविण्यात आले आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रक नाही

श्री. श्रीकांत जोशी : कोणत्या शेतक-यांना ही पदके बदलून देण्यात आली आहेत? असा प्रश्न विचारण्यात आला होता, त्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरात 'याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे' असे म्हटले आहे. या प्रश्नाला उत्तर देतांना माननीय मंत्रिमहोदयांनी आता प्रत्येक शेतक-याला 35000/- रुपये रोख देण्यात येणार आहेत असे सांगितलेले आहे. सन 2006 मधील कृषी भूषण पुरस्कारांच्या संदर्भात हा प्रश्न विचारण्यात आला होता. आता दिनांक 11 मार्च, 2008 हे वर्ष सुरु आहे. सन 2006 मध्ये शेतक-यांना कृषी भूषण पुरस्कार देण्याचे ठरविण्यात आले होते. त्यामध्ये शेतक-यांना सुवर्ण पदके देण्याचे ठरले होते असे असतांना त्या शेतक-यांना मिश्र धातुची पदके देऊन या शेतक-यांची हेळसांड आणि चेष्टे`ssा केलेली आहे. म्हणून त्या शेतक-यांना तातडीने सुवर्ण पदके देण्याच्या बाबबतीत सरकारच्या मानसिकतेत बिघाड आहे? सरकारकडे पैसा नाही की याबाबतीत निर्णय घेण्यास माननीय मंत्रिमहोदय अकार्यक्षम आहेत?. या तिन्ही कारणांपैकी नेमके कारण काय आहे? याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : अध्यक्ष महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये देखील मी हा विषय स्पष्टपणे सांगण्याचा प्रयत्न केला होता. सोन्याची पदके चौदा कॅरेटची दिली जातात, त्यात सोन्याचे प्रमाण 58.5 टक्के असते. चांदीचे प्रमाण साधारणत: 12 टक्के असते आणि कॉपरचे प्रमाण साधरणत: 17.05 टक्के असते. या पदकांमध्ये तिन्ही मेटल्सचे मिश्रण असते, हे साहजिक आहे. पुरस्कार देण्याच्याबाबतीत या ठिकाणी प्रश्न विचारण्यात आला आहे. पुरस्कारांचे साधारणत: प्रास्ताविक स्वरुप पुढीलप्रमाणे आहे. डॉ. पंजबराव देशमुख कृषी रत्न पुरस्काराचे साधारणत: 75,000/- रुपये रोख, स्मृतिचिन्न, सन्मानपत्र आणि पुढच्या काळात सपत्नीक सत्कार असे स्वरुप ठरविण्यात आले आहे. वसंतराव नाईक कृषी भूषण पुरस्काराचे साधारणत: 50,000/- रुपये रोख, स्मृतिचिन्न, सन्मानपत्र आणि सपत्नीक सत्कार असे स्वरुप ठरविण्यात आले आहे. जिजामाता कृषी भूषण पुरस्काराचे साधारणपणे 50,000/- रुपये रोख, स्मृतिचिन्न, सन्मानपत्र आणि सपत्नीक पुरस्कार असे स्वरुप ठरविण्यात आले आहे. वसंतराव नाईक शेती मित्र उपाधीच्य बाबतीत साधारणपणे 30,000/- रुपये रोख, स्मृतिचिन्न,सन्मानपत्र आणि सपत्नीक सत्कार असे स्वरुप ठरविण्यात आले आहे. वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराचे साधारणत: 15,000 रुपये रोख, स्मृतिचिन्न, सन्मानपत्र आणि सपत्नीक सत्कार असे स्वरुप ठरविण्यात आले आहे. ही पदके

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र.क्र. 33713. . . . . ..

श्री. राणा जगजितसिंह पाटील. . .

देण्याच्याबाबतीत उशीर कां लागत आहे असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आला आहे. साधारणपणे जी सुवर्ण पदके देण्यात आलेली आहेत ती सर्व सुवर्ण पदके तपासण्याचे ठरविले होते. त्यापैकी 12 पदके तपासण्यात आली. तीन लोकांनी त्यांना देण्यात आलेली पदके तपासण्यास नकार दिला. दोन शेतक-यांकडून सुवर्ण पदके प्राप्त होऊ शकली नाहीत आणि दोन शेतक-यांकडून सुवर्ण पदके मिळणे अपेक्षित आहे. अशी एकूण 19 पदके पूर्णत: तपासून निर्णय घेण्याचे ठरविले होते, त्यामुळे थोडासा विलंब लागलेला आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, या पदकांमध्ये तीन धातूंचे मिश्रण झालेले असल्यामुळे त्या धातूंचा विचार न करता मी या ठिकाणी प्रश्न विचारु इच्छितो. 50 ग्रॅम्स वजनाची 19 पदके शेतक-यांना देण्यात आली आहेत. यासाठी कोणत्या स्तरावरुन निधी मंजूर करण्यात आला होता, एकूण किती निधी मंजूर करण्यात आला होता, हा प्रत्यक्ष खर्च कोणी केला आणि कमी खर्च करण्याची जबाबदारी कोणावर आहे?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा शेवटचा प्रश्न सर्वात महत्वाचा आहे. 50 ग्रॅम्स वजनाची जी पदके देण्यात आलेली आहेत या पदकांमध्ये जवळजवळ 9 ग्रॅम्सच्या आसपास सोने कमी वापरण्यात आले होते. त्याची अंदाजे किंमत साधारणपणे 11,000 च्या आसपास कन्सिडर करण्यास हरकत नाही. यामध्ये झालेला लॉस फिक्स करावयाचा असेल तर तो प्रत्येक पदका मागे साधारणत: साडेदहा ते अकरा हजार रुपये इतका होईल. याबाबतची ऑर्डर कृषी खात्यामार्फत देण्यात आली होती. श्री. एल.एम.यवले यांना ही ऑर्डर देण्यात आली होती. जे.जे.कला महाविद्यालय, मुंबई येथे ते मॅटॅलॉजी विभागाचे विभाग प्रमुख आहेत.

श्री. गोपीकिसन बजोरिया : अध्यक्ष महोदय, शेतक-यांमध्ये कृषी क्षेत्रात चांगली स्पर्धा निर्माण व्हावी यासाठी शासनाने ही पदके दिली होती. परंतु ही पदके खोटी देण्यात आली होती हे शासनाने मान्य केलेले आहे. आता ही पदके रोख रकमेत देण्यात येणार आहेत. ही पदके किती दिवसात देण्यात येणार आहेत? शेतक-यांमध्ये उत्साह निर्माण झाला पाहिजे. विदर्भातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या करीत आहेत अशा परिस्थिती शेतक-यांना हे पुरस्कार केव्हा देण्यात येणार आहेत? यानंतर श्री. बरवड. . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 33713 .....

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, जी पदके वितरित केली गेली होती ती परत घेऊन तपासली. आता जे 35 हजार रुपये रोख रक्कम आणि स्मृतिचिन्ह देण्याचे ठरविले आहे ते एप्रिल अखेरच्या आधी देण्यात येईल.

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बीड जिल्ह्यातील टोकेवाडी येथील पिण्याच्या पाण्यात मलदुषित जिवाणू आढळून आल्याबाबत

(1) * 38084 श्रीमती उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बीड जिल्ह्यातील टोकेवाडी येथील पिण्याच्या पाण्यात मलदुषित जिवाणू आढळून आले असल्याचे महानिर्मिती व निरी यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, टोकेवाडी येथील रहिवाशांना शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

श्री. रणजित कांबळे, श्री. अजित पवार यांच्याकरिता : (1) हे अंखत: खरे आहे.

महानिर्मिती व निरी यांचा अहवाल प्राप्त नाही परंतु टोकेवाडी येथील पिण्याच्या पाण्याचे नमुने जानेवारी, 2007 ते सप्टेंबर, 2007 या कालावधीत जिल्हा प्रयोगशाळेमार्फत 13 पाणी नमुन्याची तपासणी केली असता त्यातील 7 नमुने पिण्यास अयोग्य असल्याचे आढळून आले आहे.

(2) मौ.टोकेवाडी गावांसाठी 3 पैकी 2 उच्च क्षमतेच्या विंधन विहिरीवरुन शुध्द पाणीपुरवठा करण्यात येत आहे. दुषीत पाणी आढळलेल्या ठिकाणच्या पाण्यात टी.सी.एल. पावडर वापरुन निर्जंतूक करुन पाणी वापरणेबाबत सुचना ग्रामपंचायतीला दिलेल्या आहेत. तसेच या गावांकरिता उन्हाळ्यामध्ये पाणी कमी पडू नये याकरिता विहिर अधिग्रहण करण्याचा प्रस्ताव तहसील कार्यालयास सादर करण्यात आला आहे.

श्रीमती उषाताई दराडे : यामध्ये असे उत्तर दिले आहे की, दुषित पाणी आढळलेल्या ठिकाणच्या पाण्यात टी.सी.एल. पावडर वापरुन निर्जंतुक करुन पाणी वापरणेबाबत सूचना ग्रामपंचायतीला दिलेल्या आहेत. यासंदर्भामध्ये स्वत: पाणीपुरवठा मंत्री श्री. अजित पवार यांच्या दालनात जून महिन्यामध्ये बैठक घेण्यात आली. जुलै महिन्यामध्ये मध्ये मी सुध्दा सर्व पाणीपुरवठा यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना बोलविले होते. 11 ठिकाणच्या पाणीपुरवठा योजनेमध्ये या गावचा समावेश असताना अनेक वर्षापासून या गावाला पाणी मिळत नाही. या वर्षभरामध्ये भारत निर्माण योजनेअंतर्गत प्रस्ताव दाखल करण्याचा निर्णय होऊन सुध्दा तो प्रस्ताव का दाखल करण्यात आला नाही. त्याचा समावेश या प्रश्नाच्या उत्तरामध्ये का केलेला नाही ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, टोकेवाडी ग्रामपंचायत ही प्रादेशिक योजनेचा भाग आहे आणि अगोदर प्रादेशिक पाणीपुरवठा योजना बंद पडलेली आहे. एकवेळा योजना दिल्यानंतर पुन्हा तेथील 1 गाव वगळून वेगळी योजना बांधणे योग्य होणार नाही. सन 2004 मध्ये जिल्हा

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38084 ..... श्री. रणजित कांबळे ....

परिषदेला प्रादेशिक पाणीपुरवठा योजना हस्तांतरित केली होती. 2007 मध्ये प्रादेशिक पाणीपुवठा योजना बंद झाली. त्याचे कारण असे आहे की, 40 लाख रुपयांची रिकव्हरी आहे. नवीन योजना घेण्याऐवजी आधी जी थकबाकी आहे ती पूर्ण केली तर प्रादेशिक पाणीपुरवठा योजना परत चालू करु शकतात.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, उत्तरामध्ये महानिर्मितीचा उल्लेख केलेला आहे म्हणजे त्या ठिकाणी थर्मल पॉवर स्टेशनच्या राखेमुळे पाणी खराब होण्याचा विषय निर्माण झालेला दिसतो. पाणी दुषित होण्याचे कारण काय ? या कारणामध्ये थर्मल पॉवर स्टेशनचा संबंध असेल म्हणूनच महानिर्मितीचा संबंध जोडलेला आहे. त्यांना शुध्द पाणी देण्याची जबाबदारी सरकारची आहे. वाण प्रकल्पातून टोकेवाडीकरिता दुसरी योजना करण्यात येणार आहे काय ? त्या विहिरीचे पाणी सातत्याने दुषित होत असेल तर वेगळी पाणीपुरवठा योजना करण्याची राज्य सरकारची जबाबदारी होती. ती जबाबदारी राज्य सरकार पार पाडील काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, यामध्ये सानगाव आणि इतर 8 गावे आहेत. त्या ठिकाणी जो स्त्रोत होता तो थर्मल पॉवर प्लँटमुळे दुषित झाला. त्यामध्ये टोकेवाडी ग्रामपंचायतीचा समावेश नव्हता परंतु हे टंचाईग्रस्त गाव होते म्हणून त्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेमध्ये तेव्हा या गावाचा समावेश केलेला होता. त्या ठिकाणी बोअरमध्ये बॅक्टेरिया सापडले. इतर जी 8 गावे होती त्या ठिकाणी स्त्रोत दुषित झाला म्हणून नवीन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना त्यावेळी तयार केली होती..

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, महानिर्मिती आणि नेरी यांचा अहवाल प्राप्त नाही. परंतु अहवालात हे पाणी दुषित आहे असे म्हटले आहे. मग उत्तरामध्ये अहवाल प्राप्त झाला नाही असे म्हणणे उचित ठरेल काय ? अद्यापपर्यंत अहवाल प्राप्त झालेला नाही काय ? दुसरा प्रश्न असा की, त्या गावामध्ये तीन विंधन विहिरी आहेत. दोन विहिरींचे पाणी चालू आहे. तिसऱ्या विहिरीचे पाणी दुषित असल्यामुळे ते घेण्यास खात्याने प्रतिबंध केला आहे काय ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38084....

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, त्या ग्रामपंचायतीमध्ये 3 बोअरवेल्स आहेत त्यापैकी एक बोअरवेल ड्राय झाल्यामुळे बंद पडलेली आहे. ही बोअरवेल दूषित पाण्यामुळे बंद पडलेली नाही. टोकेवाडी हे टंचाईग्रस्त गाव आहे. त्या ग्रामपंचायतीमध्ये 10 हातपंप असून त्यापैकी 5 हातपंप ड्राय झालेले आहेत. त्यामुळे या गावाचा प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेत समावेश केला होता. योजनेचा स्त्रोत दूषित आहे म्हणून समावेश केलेला नव्हता. 2004 पासून ही योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केली होती. परंतु 2007 मध्ये ही योजना बंद झाली. या ग्रामपंचायतीकडून वसुली होत नाही हे एकमेव कारण ही योजना बंद पडण्याचे आहे. या ग्रामपंचायतीकडून 3.5 लाख रुपये वसुली होणे बाकी आहे. संपूर्ण योजनेचे 58 लाख रुपयांचे विजेचे बिल थकित आहे. त्यामुळे पुन्हा नवीन योजना बांधण्याऐवजी जे थकित बिल आहे ते दिले तर आहे ती योजना पुन्हा सुरु होऊ शकते.

श्री.श्रीकांत जोशी : पाणीपुरवठयामध्ये बॅक्टेरिया कोठून आले ते कळत नाही. आम्ही या योजनेच्या जवळच राहतो. परळीच्या शेजारील ते गाव आहे. तेथे राखेचे मोठमोठे ठीग आहेत. थर्मल पॉवर स्टेशनचा उत्तरात उल्लेख करण्यात आलेला आहे. महानिर्मितीच्या वीज प्रकल्पामुळे पाणी दूषित झाले आहे काय ? कारण बोअरमध्ये सहजासहजी बॅक्टेरिया जात नाहीत. त्याच्या पाठीमागे काही तरी कारण असते. टोकेवाडीला शुध्द पाण्याचा पुरवठा केला जाणार आहे काय ? परळीच्या सबर्ब एरियात मोठया प्रमाणावर नागरीकरण सुरु आहे. त्यामुळे तेथे कायम स्वरुपी पाणीपुरवठा होणे गरजेचे आहे. मंत्रिमहोदयांच्या उत्तरातून आम्हाला काहीच अर्थबोध होत नाही. तेथे नवीन पाणीपुरवठा योजना करावीच लागेल.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, ख-या अर्थाने संगम आणि 18 गावांसाठी ही योजना होती. ही योजना 2006 पर्यंत व्यवस्थित चालली होती. या योजनेतील काही गावांनी पाणीपट्टी व विजेचे बिल न भरल्यामुळे ही योजना बंद करण्यात आली. योजना बंद झाल्यानंतर त्या गावांना प्रथम पाणी मिळालेच पाहिजे हे निश्चित असल्यामुळे तेथे हातपंप आणि विंधन विहिरींच्या माध्यमातून पाणीपुरवठा होत होता. परंतु त्या गावाला दूषित पाणी पुरवठा होत असल्याचे लक्षात आले. दूषित पाण्याचा पुरवठा होऊ नये, लोकांना शुध्द पाणी मिळावे या हेतूने त्या पाण्यात

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ब्लिचिंग पावडर टाकणे, निर्जंतुकीकरण करणे हे उपाय केलेले आहेत. माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, ही 18 गावांची योजना बंद पडली तर भारत निर्माण योजनेतून नवीन योजना घेतली जाईल काय ? शासन नवीन योजना करणार नाही. या 18 गावांच्या योजनेची 40 लाख रुपयांची थकबाकी राहिलेली आहे. या थकबाकीबाबत जिल्हा परिषदेला कळविण्यात येईल. वीज कंपनीला सांगून 40 लाखांचे हप्ते पाडून दिले जातील. त्यापैकी काही हप्ते त्या सर्व गावांनी भरले पाहिजेत. या गावाचा 3.5 लाखांचा हप्ता आहे. त्यांनी 50 हजार रुपयांचा हप्ता ताबडतोब भरला आणि इतर गावांनी त्या प्रमाणामध्ये भरला तर आम्ही विजेचे कनेक्शन ताबडतोब सुरु करुन देऊ. या नळ पाणीपुरवठा योजनेचा स्त्रोत कायम स्वरुपी आहे. त्यामध्ये काही अडचण येत नाही. बोरणा लघु पाटबंधारे प्रकल्प, परळी हा सोर्स आहे. बोरणामध्ये शुध्द व चांगले पाणी आहे. त्यामुळे हेच गाव नाही तर त्या गावाबरोबर असणा-या 17 गावांना शुध्द व चांगले पाणी मिळू शकेल. या गावांना एकदम पाणीपट्टी व विजेचे बिल भरता येत नसेल तर त्यांना हप्ते पाडून दिले जातील. त्या भागातील संबंधित लोकप्रतिनिधींनी त्यांना तसे समजावून सांगण्यासाठी मदत करावी म्हणजे त्यांना चांगल्या प्रकारचे पाणी देता येईल.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, ही पाणीपुरवठा योजना सुरु असताना आठ दिवसात केवळ अर्धा तास किंवा 15 मिनिटे पाणी पुरवठा होत होता. म्हणजे या टोकेवाडीच्या योजनेमध्येच दोष आहे. या 18 खेडी योजनेतील या गावांना पाणी मिळत नाही म्हणून डावी व इंदपवाडीचा जलस्वराज्य योजनेमध्ये समावेश केलेला आहे. त्याचप्रमाणे स्थानिक अधिका-यांनी भारत निर्माण योजनेमध्ये हे काम घेऊ असे आम्हाला बैठकीत आश्वासन दिलेले आहे. त्यानुसार भारत निर्माण योजनेत या गावाचा समावेश करण्याच्या दृष्टीने शासन काय करणार आहे ?

श्री.अजित पवार : माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी उपस्थित केलेल्या मुद्याची तांत्रिक तपासणी करुन घेण्यात येईल. त्यांनी म्हटल्याप्रमाणे ते करणे गरजेचे असेल तर त्याला मान्यता देण्यात येईल. परंतु आहे ती योजना पूर्ववत चालू करुन त्या गावाला पिण्याचे शुध्द पाणी मिळत असेल तर त्यासाठी योग्य ती पावले उचलली जातील.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उत्तर सोलापूर तालुक्यातील शिरापूर उपसा सिंचन योजनेस निधी उपलब्ध करण्याबाबत

(२) * ३७९७४ श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अवर्षणग्रस्त परिस्थितीत सामना करणाऱ्या उत्तर सोलापूर तालुक्यातील शिरापूर उपसा सिंचन योजना निधी उपलब्ध नसल्याने गेल्या आठ वर्षापासून काम बंद असल्याचे माहे डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे काम बंद पडल्यामुळे नान्नजचे द्राक्ष, शरद सिडलेस, शबरीची बोरे, डाळींब, ऊस ही पिके धोक्यात आली असून, तालुक्यातील अनेक गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिरापूर उपसा सिंचन योजनेस ६१ कोटींचा निधी देण्याची मागणी पदाधिकारी व तालुक्यातील सरपंच व ग्रामस्थांच्या वतीने मा. जलसंपदा मंत्री यांचेकडे दि. १४ डिसेंबर, २००७ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उत्तर सोलापूर तालुक्यातील शिरापूर सिंचन योजनेला निधी उपलब्ध करुन काम पूर्ण करण्याबाबत आघाडी शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली आहे वा कार्यान्वित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

डॉ.सुनील देशमुख, श्री.रामराजे नाईक-निंबाळकर यांच्याकरिता : (१) हे खरे नाही. शिरापूर उपसा सिंचन योजनेचे काम निधींच्या उपलब्धतेप्रमाणे चालू आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) हे खरे आहे.

(४) दिनांक ९.१.२००८ रोजी शासन स्तरावर शिरापूर उपसा सिंचन योजनेबाबत मुंबई येथे झालेल्या बैठकीत महामंडळास प्राप्त होणाऱ्या रु.५००० कोटींच्या अतिरिक्त वाढीव निधींच्या प्रस्तावात शिरापूर सिंचन योजनेसाठी रु. ३० कोटी निधीची तरतूद करण्यात यावी, असा निर्णय झाला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, सदरहू योजनेकरिता 2002 पासून आजपावेतो किती खर्च झालेला आहे ?

नंतर श्री.शिगम....

अशुद्धीरित प्रत / शीघ्रलेखाकरीता नाही

(ता.प्र.क्र. 37974....

डॉ. सुनील देशमुख : आतापर्यन्त 46.28 कोटी रु. इतका खर्च झालेला आहे.

श्री. सय्यद पाशा पटेल : 1998मध्ये ही योजना मंजूर झाली. 2002 पर्यन्त या योजनेवर 6 कोटी रु. खर्च झाले. त्यानंतर एकही रुपया खर्च झालेला नाही. त्यामुळे उत्तरातून सभागृहाची दिशाभूल करण्यात येत आहे.

डॉ. सुनील देशमुख : 2001-2002मध्ये 2.91 कोटी, 2002-2003मध्ये 1.30 कोटी, 2003-2004मध्ये 2.73 कोटी, 2004-2005मध्ये 33 लाख, 2005-2006मध्ये 66 लाख, 2006-2007मध्ये 48 लाख आणि 2007-2008मध्ये 1.10 कोटी रु. इतका खर्च झालेला आहे.

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील : या योजनेची मूळ किंमत किती आहे ? वाढीव निधीच्या प्रस्तावात या योजनेचा समावेश आहे काय ?

डॉ. सुनील देशमुख : या योजनेची मूळ किंमत 133.23 कोटी रु. आहे. 5 हजार कोटीचा अतिरिक्त वाढीव निधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर येणार आहे. त्यामध्ये या प्रकल्पासाठी तरतूद केलेली आहे.

डॉ. दीपक सावंत : या योजनेवर आतापर्यन्त झालेल्या खर्चामध्ये प्रत्यक्ष योजनेवर आणि पगारावर किती खर्च झालेला आहे ?

डॉ. सुनील देशमुख : पंपगृहाची अंदाजित किमत 9.92 कोटी रु. असून 2.31 कोटी रु. खर्च झालेला आहे. पंम्पिंग मशिनची अंदाजित किंमत 14.85 कोटी रु. असून त्यावर खर्च झालेला नाही. ते मशिन अजून यावयाचे आहे. विद्युत कामांचा अंदाजित खर्च 12.73 कोटी रु. असून त्यावरही अजून खर्च झालेला नाही. विद्युत कामे व्हावयाची आहेत. उर्ध्वगामी नलिकासाठी अंदाजित किंमत 26.68 कोटी रु. असून त्यावर 22.58 कोटी रु. खर्च झालेला आहे. कालव्यांचा अंदाजित खर्च 38.72 कोटी रु. असून 6.22 कोटी रु. खर्च झालेला आहे. उर्वरित कामासाठी 32.50 कोटी रु. लागणार आहेत. वितरण व्यवस्थेसाठी 7.03 कोटी रु. लागणार आहेत. त्यावर एकही पैसा खर्च झालेला नाही. भूसंपादनासाठी 18.73 कोटी रु. लागणार आहेत. भूसंपादनावर 15.12 कोटी रु. खर्च झालेला असून 3.61 कोटी रु.ची आवश्यकता आहे.

श्री. विक्रम काळे : ही योजना किती कालावधीमध्ये पूर्ण होईल ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : या योजनेची अंदाजित किंमत 133 कोटी रु. असून आतापर्यन्त 46 कोटी रु. खर्च झालेला आहे. उर्वरित 86.85 कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. 5 हजार कोटीचा अतिरिक्त वाढीव निधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे येत आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार ही योजना लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.

श्री. सय्यद पाशा पटेल : ही योजना पूर्ण करण्यास किती कालावधी लागेल ?

डॉ. सुनील देशमुख : लवकरात लवकर ही योजना पूर्ण करण्यात येईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्र व गोवा राज्याच्या संयुक्त विद्यमाने बांधण्यात येत असलेल्या तिलारी पाटबंधारे प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत

(३) * ३७४८३ श्री.राजन तेली , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.सय्यद जामा : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र व गोवा राज्याच्या संयुक्त विद्यमाने बांधण्यात येत असलेल्या तिलारी पाटबंधारे प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रगतीपथावर सुरु असलेले प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ सुनील देशमुख, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (१) होय.

(२) तिलारी प्रकल्पास सन २००५ पासून एआयबीपी अंतर्गत केंद्रीय अर्थसहाय्य प्राप्त होत असून, एआयबीपी अंतर्गत केंद्रीय अर्थसहाय्याने प्रकल्पातील सर्व कामे जून, २००९ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. राजन तेली : 1979मध्ये या प्रकल्पाला मान्यता मिळाली. ही मान्यता मिळून 27 वर्षे झालेली आहेत. 1979 मध्ये या प्रकल्पाच्या 45.20 कोटीच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता मिळाली. या प्रकल्पाची 2003 मध्ये 952.54 कोटी इतकी किंमत झाली. तेव्हा या प्रकल्पाची किंमत आणखी वाढणार आहे काय ? हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे ?

डॉ. सुनील देशमुख : या प्रकल्पाची सध्याची किंमत 1339 कोटी रुपये असून जून 2009पर्यन्त हा प्रकल्प पूर्ण करण्याचे ठरविले आहे.

.....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, महाराष्ट्र आणि गोवा राज्याच्या संयुक्त विद्यमाने तिलारी पाटबंधारे प्रकल्पाचे काम करण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी गोवा राज्याने किती निधी उपलब्ध करुन द्यावयाचा होता ? आतापर्यंत प्रत्यक्षात गोवा राज्याने किती निधी प्रत्यक्षात सदर प्रकल्पाच्या कामासाठी उपलब्ध करुन दिलेला आहे ? त्याचप्रमाणे या प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्याने किती निधी उपलब्ध करुन द्यावयाचा होता व आतापर्यंत प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध करुन दिलेला आहे ? या प्रकल्पाच्या कामासाठी महाराष्ट्र शासनाने आपल्या हिश्याची रक्कम वेळेवर उपलब्ध करुन दिली नाही म्हणून सदर प्रकल्पाचे काम रेंगाळले आहे ही वस्तुस्थिती खरी आहे काय ? या प्रकल्पाचा समावेश ए.आय.बी.पी. मध्ये झालेला आहे. त्यामुळे या प्रकल्पावरील शंभर टक्के खर्च केंद्र सरकार करणार आहे काय ?

डॉ.सुनील देशमुख : या प्रकल्पाच्या कामासाठी गोवा राज्याचा शेअर 431 कोटी 28 लाख रुपयांचा आहे. त्यापैकी आतापर्यंत 341 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. 90 कोटी रुपयांचा निधी गोवा राज्याकडून यावयाचा आहे. या प्रकल्पाच्या कामासाठी जसाजसा निधी उपलब्ध होईल तसतशी कामे पूर्ण करण्यात येणार आहेत.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, तिलारी पाटबंधारे प्रकल्पाला भेट देण्याचा मला योग आला. गोवा राज्याकडून या प्रकल्पाच्या कामासाठी निधी उपलब्ध होत आहे. या प्रकल्पाच्या कामासाठी मागच्या कालखंडात गोवा राज्याकडून निधी उपलब्ध होत नव्हता म्हणून ते काम रेंगाळले होते. परंतु आता तशी परिस्थिती नाही. तिलारी पाटबंधारे प्रकल्पातील सर्व कामे जून 2009 पर्यंत पूर्ण करण्याचे शासनाने ठरविले आहे. या प्रकल्पास आम्ही भेट दिली, त्यावेळी तेथील शेतकरी आम्हाला भेटले. त्या प्रकल्पांतील अनेक कालवे नादुरुस्त झाले आहेत, अनेक कालवे फुटले आहेत, त्यामुळे तेथील शेतक-यांच्या जमिनीचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. त्या ठिकाणच्या शेतक-यांच्या जमिनीचे नुकसान होऊ नये यासंदर्भात शासनाकडून लक्ष घातले जाईल काय ? तिलारी प्रकल्पातील कालव्यांच्या शेजारी मायनिंगला परवानगी दिली गेली आहे, त्यामुळे मोठया प्रमाणात कालवे फुटण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. त्या ठिकाणी मायनिंगसाठी दिलेल्या परवानग्या रद्द करण्यात येतील काय ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37483....

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती तपासून घेतली जाईल. मायनिंगमुळे कालवे फुटून शेतक-यांच्या जमिनीचे नुकसान होत असेल तर त्याबाबतीत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, 1981 साली या धरणातंर्गत येत असलेल्या जमिनीच्या खरेदी-विक्री संदर्भात अधिसूचना काढण्यात आली होती. सदर प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यापूर्वीच जिल्हधिका-यांनी दिनांक 19.7.2007 रोजी नव्याने अधिसूचना काढून या प्रकल्पातील लाभक्षेत्रातील, बुडीत क्षेत्रातील जमिनी खरेदी-विक्रीवरील निर्बंध उठविण्याचा निर्णय तिलारी प्रकल्पाच्या अधिका-यांच्या विरोध असतानाही घेतला आहे ही गोष्ट खरी आहे काय ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय दिलेली माहिती तपासून घेतली जाईल आणि ती माहिती सदनाच्या पटलावर ठेवली जाईल.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, सदर प्रकल्पाचे काम जून 2009 पर्यंत पूर्ण होईल. या प्रकल्पांतर्गत कालव्यांची कामे होणार आहेत. त्या कालव्यांसाठी जमिनी संपादित झालेल्या नाहीत. त्या ठिकाणच्या लोकांच्या तक्रारी आहेत की, ठेकेदारांनी आपल्या मनाप्रमाणे अंतर्गत कामे केलेली आहेत. काही कामे अजून सुरु आहेत. ठेकेदारांकडून होत असलेल्या कामांना शेतक-यांचा विरोध आहे. कालव्यांच्या कामासाठी शासनाने शेतक-यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत काय ? सदर ठिकाणच्या ग्रामस्थांचा कामांना विरोध होत असेल तर या प्रकल्पाचे काम जून, 2009 पर्यंत कसे पूर्ण होणार आहे ?

श्री. अजित पवार : गोवा आणि महाराष्ट्र राज्यांचा हा संयुक्त प्रकल्प आहे. आंतरराष्ट्रीय प्रकल्पांच्या बाबतीत माननीय राज्यपालांचे निदेश होते. त्या निदेशामध्ये या प्रकल्पाचा देखील समावेश होता. परंतु आता माननीय राज्यपाल महोदयांनी या प्रकल्पाला आता सूट दिलेली आहे. हा प्रकल्प ए.आय.बी.पी.मध्ये टाकण्याच्या बाबतीत जलसंपदा विभाग यशस्वी झालेला आहे. म्हणून या प्रकल्पाच्या कामासाठी ए.आय.बी.पी.मधून ब-यापैकी निधी उपलब्ध होईल. सन्माननीय सदस्यांनी त्या ठिकाणी कालवे आणि इतर गोष्टी करावयाच्या आहेत, ती कामे कशी पूर्ण करण्यात येणार आहेत अशी विचारणा करण्यात आली. याबाबतीत सांगू इच्छितो की, आम्ही देखील टारगेट ठेवले आहे की, काहीही झाले तरी या प्रकल्पाचे काम जून, 2009 पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. या

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37483...

श्री. अजित पवार...

प्रकल्पाच्या कामास निधीची अडचण येणार नाही. दर महिन्याला या प्रकल्पाच्या कामांचा आढावा घेतला जाणार आहे. कालव्याच्या कामांसाठी जमीन कमी लागते. परंतु पोटचा-या करण्याकरिता शेतक-यांच्या जमिनी घे्ण्याची आवश्यकता भासली तर शेतकरी त्यांची जमीन देण्यास विरोध करीत नाही. शेतक-याचे मोठे क्षेत्र प्रकल्पांतर्गत जात असेल तर शेतकरी विरोध करीत असतो. परंतु पाटचा-यांच्या कामासाठी शक्यतो शेतकरी विरोध करीत नाहीत. हा आंतरराष्ट्रीय प्रकल्प असल्यामुळे गोवा सरकारकडून या प्रकल्पाच्या कामासाठी वेळोवेळी निधी येत आहे. गोवा सरकारकडे फक्त 90 कोटी रुपये फक्त यावयाचे आहेत. परंतु गोवा सरकारकडून निधी मिळत नाही म्हणून सदर प्रकल्पाचे काम रेंगाळलेले आहे अशी वस्तुस्थिती नाही. सदर प्रकल्पांचे काम कोणत्याही परिस्थितीत रेंगाळले जाणार नाही. या प्रकल्पाचा समावेश ए.आय.बी.पी.मध्ये झालेला आहे. ए.आय.बी.पी.कडून 42 कोटी रुपये या प्रकल्पाच्या कामासाठी मिळालेले आहेत. अजून 15 कोटी रुपये मार्च अखेरपर्यंत मिळणार आहेत. ए.आय.बी.पी.मधून 50 कोटी रुपये या प्रकल्पाच्या कामासाठी मिळविण्याचा आमचा प्रयत्न आहे. केंद्र सरकार शंभर टक्के निधी उपलब्ध करुन देईल अशी अपेक्षा आहे. सदर प्रकल्पाचे काम जून, 2009 पर्यंत निश्चितपणे पूर्ण केले जाईल.

यानंतर श्री. कानडे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MMP/ 12:55

ता.प्र.क्र. 37483 पुढे सुरु.....

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 1979 पासून या प्रकल्पास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. परंतु ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या प्रकल्पामुळे भूसंपादनामध्ये गेलेल्या आहेत त्यांना अद्याप पैसे दिले गेलेले नाहीत. हे पैसे केव्हा देण्यात येतील ? त्याचप्रमाणे केंद्र शासनाकडून आतापर्यंत या प्रकल्पाला किती अर्थसहाय्य प्राप्त झालेले आहे ?

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाच्या ऐआयबीपी योजनेमध्ये हा प्रकल्प दोन वर्षापूर्वी समाविष्ट झाला. 2005-06 मध्ये या प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून 34 कोटी रु. मिळाले. 2006-07 मध्ये 45 कोटी रु. मिळाले. 2007-08 मध्ये 57 कोटी रुपयांचे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून मिळणार आहे. त्यापैकी 42 कोटी रुपये प्राप्त झाले असून 15 कोटी रु. अद्याप मिळावयाचे आहेत. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला अद्याप मिळाला नाही याचा उल्लेख केला. अशा प्रकारच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केलेल्या असतील तर त्या तपासून घेतल्या जातील आणि भूसंपादनाचे पैसे शेतकऱ्यांना मिळणे बाकी असतील तर ते ताबडतोब दिले जातील.

एाउ

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बोडणी (रेवस जवळ) ता.अलिबाग जि.रायगड या ठिकाणी मत्स्यव्यवसायीकांसाठी पकटी बांधण्याबाबत

(४) * ३७५७४ श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोडणी (रेवसजवळ) ता. अलिबाग, जि.रायगड या ठिकाणी मत्स्यव्यवसायीकांसाठी पकटी बांधण्याबाबतच्या रूपये १५ लाख ८ हजार ७६९ च्या अंदाजपत्रकास व आराखड्यास शासनाने दिनांक २८ जुलै, २००४ रोजी प्रशासकीय मान्यता दिली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या तीन वर्षात या कामासाठी किती तरतूद करण्यांत आली,

(३) तरतूद करण्यात आली नसल्यास त्याची कारणे कोणती, व हे काम केव्हा सुरू करण्यांत येईल ?

श्री. हसन मुश्रीफ ,श्री.अनिस अहमद यांच्याकरिता: (१) होय.

(२) व (३) सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून निधीअभावी सदर काम सुरु करण्यात आलेले नाही. सदर जिल्हा योजनेतून निधी प्राप्त होताच काम पूर्ण करण्यात येईल.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तरामध्ये आपल्या अनुमतीने मी सुधारणा करु इच्छितो. उत्तराच्या भाग(2) आणि (3) मध्ये 'जिल्हा योजनेतून निधी ' या ऐवजी ' राज्य योजनेतून निधी' असे वाचावे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, अलिबाग तालुक्यातील बोडणी गावातील मत्स्यव्यावसायिकांसाठी पकटी बांधण्याबाबतचा हा प्रश्न आहे. या गावामध्ये सर्वात जास्त मच्छीमारांचे ट्रॉलर आहेत. एकूण 2000 ट्रॉलरपैकी या गावामध्ये 700 ट्रॉलर आहेत. असे असताना आतापर्यंत या व्यावसायिकांकडे शासनाने दुर्लक्ष केलेले आहे. मागील अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून मी हाप्रश्न विचारला होता. निधीची कमतरता असल्यामुळे या कामासाठी मी आमदार फंडातून निधी दिलेला आहे याची मंत्रिमहोदयांना माहिती आहे काय ? आमदार फंडातून निधी दिलेला असतानाही पकटी बांधण्याच्या कामास सुरुवात का होऊ शकली नाही तसेच या कामाचे टेंडर अद्यापपर्यंत का निघाले नाही ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आमदार फंडातून निधी दिला असल्याबाबतची माहिती सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही.

सभापती : याबाबतची माहिती सन्माननीय मंत्रिमहोदयांनी तातडीने घ्यावी.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कामाचे टेंडर जिल्हाधिकारी काढतात. शासनाकडे हा विषय येत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी प्रश्नाची पूर्ण माहिती घेतलेली नाही. आमदार फंडातील पैसे लॅप्स होणार आहेत.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला होता की, पकटी बांधण्यासाठी 15 लाख 8 हजार 769 रुपयांच्या अंदाजपत्रकास शासनाने मान्यता दिली आहे काय ? प्रशासकीय मान्यता मिळाली होती. शासनाने निधीची तरतूद केली नाही. या बजेटमध्ये म्हणजे 2008-09 च्या बजेटमध्ये यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करणार आहोत. दरम्यान सन्माननीय सदस्यांनी आमदार फंडातून जिल्हाधिकाऱ्यांकडे निधी उपलब्ध करुन दिला आहे. या प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या निधीतून पैसे उपलब्ध करण्याचा प्रयत्न करणार आहोत. आमदार फंडातून पैसे दिले आहेत असे सन्माननीय सदस्यांनी आताच सांगितले आहे. या कामाच्या टेंडर काढण्याच्या सूचना दिल्या जातील.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, यासंदर्भात मी तीन महिन्यांपूर्वीच पत्र दिले होते. निधीची पूर्तता होत नसल्यामुळे आमदार फंडातून 15 लाख रुपये दिले. असे असतानाही कामाची पूर्तता होत नाही.

श्री. हसन मुश्रीफ : स्थानिक विकास निधीतून जिल्हाधिकाऱ्यांकडे पैसे दिले जातात.

सभापती : स्थानिक विकास निधीतून पैसे देण्याबाबतचे पत्र सन्माननीय सदस्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. जिल्हा स्तरावरील मत्स्यव्यवसायविकास अधिकारी यांना याची नक्कीच माहिती असणार आहे. त्यांचे ते काम आहे. स्थानिक विकास निधीतून निधी दिलेला आहे याची संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा करावी. हा विषय शासनाने गंभीरपणे घ्यावा.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, स्थानिक विकास निधीबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा करतो.

नंतर श्री. खर्चे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नागपूर येथील हातमाग महामंडळात भागभांडवलाच्या रुपाने गुंतवणुक केलेल्या विणकरांची यादी अधिकाऱ्यांनी गायब केल्याबाबत

(५) * ३७९८९ श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.केशवराव मानकर : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील हातमाग महामंडळात भागभांडवलाच्या रुपाने गुंतवणुक केलेल्या जवळपास साडेबाराहजार विणकरांची यादी अधिकाऱ्यांनी गायब केली असल्याचे बुनकर मजदूर समितीच्या वतीने जानेवारी, २००८ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबीमुळे सदर विणकरांना सानुग्रह अनुदान द्यायचे नसल्याची भुमिका महामंडळाची स्पष्ट होत असल्याचेही उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर यादी गायब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, विणकरांना सानुग्रह अनुदान व यादीचा प्रश्न निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती ठोस कार्यवाही वा उपाययोजना कार्यान्वित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर, श्री.सतिश चतुर्वेदी यांच्याकरिता : (१) व (२) नाही. सन १९७१ ते १९९८ या काळामध्ये हातमाग महामंडळाशी मोठ्या प्रमाणात विणकर जोडले गेले होते व नंतर त्यांनी स्वत:हून माग बंद केले किंवा महामंडळाचे थकबाकीदार होऊन व्यवहार बंद केले आहेत. तसेच सदर विणकर हे महामंडळाचे कर्मचारी अथवा नियमित कामगार नव्हते. त्यामुळे अशा विणकरांची यादी ठेवण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी प्रश्न विचारला होता की, नागपूर येथील हातमाग महामंडळात भाग भांडवलाच्या रुपाने गुंतवणूक केलेल्या 12500 विणकरांची यादी अधिकाऱ्यांनी गायब केली असे विणकरांच्या समितीने उघडकीस आणले आहे. माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देतांना सांगितले की, थकबाकीदार होऊन त्यांचे व्यवहार बंद केले. पण सन 1971 ते सन 1998 या काळात ज्या विणकरांनी काम केलेले आहे, असे असताना 12500

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लोकांना सानुग्रह अनुदान देण्यात येऊ नये म्हणून बाद करण्यात आले. त्याचे कारण काय यासंबंधीची माहिती शासनाने घेतली काय तसेच यासंबंधीची चौकशी शासन करणार काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : महोदय, सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात असा प्रश्न विचारला आहे की, विणकरांच्या भागभांडवलाची यादी गायब झाली आहे. त्यांचे कोणतेही भाग भांडवल महामंडळामध्ये नव्हते तर त्यांना काम दिले जात होते आणि त्यांच्याकडून कापड घेतले जात होते. कारण कंपनी ॲक्टनुसार रजिस्ट्रेशन असल्यामुळे दर आठ वर्षांनी या महामंडळाचे रेकॉर्ड नष्ट केले जात होते, त्यानुसार हे रेकॉर्ड नष्ट करण्यात आले, त्यामुळे पूर्वीची यादी महामंडळाकडे उपलब्ध नाही.

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, काही विणकरांना सन 1998 मध्ये 35 हजार रुपयाप्रमाणे सानुग्रह अनुदान देण्यात आले हे खरे आहे काय ? कारण माननीय मंत्री महोदयांनीच मान्य केले की हातमाग महामंडळाशी विणकर जोडलेले होते. म्हणून या सगळयांना सन 1971 पासून रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्टनुसार शासन सानुग्रह अनुदानाची रक्कम देणार आहे काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सन 1998 मध्ये तत्कालीन पालकमंत्र्यांनी पुढाकार घेऊन अडचणीत आलेल्या साधारणत: 4 हजार कामगारांना प्रत्येकी 15 हजार रुपयाप्रमाणे मदत दिली होती. त्यानंतर त्यातील काही सुटले म्हणून आग्रह धरला म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींबरोबर चर्चा करुन पुन्हा ऑगस्टमध्ये जेवढे रेकॉर्ड उपलब्ध होते त्या नवीन यादीनुसार 25 हजार रुपये अनुदान दिलेले आहे. अशा प्रकारे जेवढे रेकॉर्ड उपलब्ध होते तेवढया सगळया कामगारांना मदत देण्यात आली आहे.

श्री सय्यद जामा : सभापति महोदय, हाथमाग महामंडल की स्थापना बुनकरों के लिए की गई थी. कुछ बुनकरों ने हाथमाग महामंडल के साथ व्यवहार बंद कर दिया है.1998 में तत्कालीन मंत्री सम्माननीय श्री गडकरी जी ने शासन की ओर से बुनकरों की सहायता की थी. उस समय सवा चार हजार बुनकरों को 15 हजार रुपये की सहायता की गई थी. उसके बाद अगस्त व सितम्बर, 2007 में वर्तमान सरकार ने करीब 4200 बुनकरों को मदद की है. अब थोड़े से ही बुनकर महामंडल के साथ रह कर काम कर रहें है. 1971 से कई बुनकर जो महामंडल के कार्ड होल्डर थे, उनका रिकार्ड नहीं है, ऐसा अभी मंत्री जी ने बताया है. मेरी जानकारी के अनुसार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उनसे सिक्योरिटी डिपाजिट और थ्रिप्ट मनी लिया गया था और यह जानकारी महामंडल के पास होगी. इसलिए महामंडल के रिकार्ड से जानकारी मिल सकती है कि बुनकरों को पेमेन्ट किया गया है या नहीं. करीब 1000-1500 ऐसे बुनकर है जिनका सिक्योरिटी मनी जमा है, थ्रिप्ट मनी जमा है, वह वापस नहीं दिया है, तो क्या ऐसे बुनकरों को अनुदान दिया जाएगा ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : महोदय, मी आताच सांगितल्याप्रमाणे सन 1998 मध्ये ज्यांना वयाची 50 वर्षे पूर्ण झाली आहेत त्यांच्यापैकी ज्यांना संलग्न व्हावयाचे होते त्यांना मदत दिली आहे. त्यानंतर पुन्हा माननीय मंख्यमंत्र्यांनी बैठक घेतली आणि 4200 लोकांना 25 हजार प्रमाणे मदत देण्यात आली आहे. सन 1971 सालापासून काही लोकांनी ज्यांनी दो-चार-सहा महिने काम केलेले होते अशा लोकांची माहिती महामंडळाकडे नसल्यामुळे त्यांना मदत देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 37989 .....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी सांगितले आहे की, यासंदर्भातील माहिती आमच्याकडे नाही. परंतु बुनकर मजूर समितीने ही सर्व माहिती उपलब्ध करुन दिली, ज्यांच्याकडे आयडेंटीटी कार्ड आहे त्यांनी यासंदर्भातील प्रुफ उपलब्ध करुन दिले तर सरकार अशा लोकांना 25 हजार रुपये मदत देईल काय?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, संबंधित महामंडळाचे प्रश्नकर्ते आणि बुनकरांचे प्रतिनिधी यांच्या बरोबर एक बैठक घेऊन योग्य तो निर्णय घेतला जाईल.

....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

सांगली जिल्हयात बनावट कीटकनाशके विकून शेतकऱ्यांची फसवणूक केल्याबाबत

(६) * ३९२९१ श्री. रामनाथ मोते , श्री. संजय केळकर : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली, जिल्ह्यात बनावट कीटकनाशके विकून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या टोळीस गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने माहे जानेवारी, २००८ मध्ये अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) सदर प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली आहे काय,
(३) प्राथमिक चौकशी मध्ये काय निष्पन्न झाले,
(४) संबंधित व्यक्तिवर कोणती कारवाई केली आहे,
(५) त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल केला आहे,काय,
(६) असल्यास, कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील , श्री.बाळासाहेब थोरात यांच्या करिता : (१) होय.
(२) नाही.
(३) प्राथमिक चौकशीत श्री.संपतराव श्रीपती घाईल (यादव) रा.कवठेएकंद, ता.तासगांव, जिल्हा सांगली यांनी वायर क्रॉप सायन्स या कंपनीच्या ट्रेडमार्कची बनावट किटकनाशके विक्रीसाठी साठविल्याचे छाप्यात आढळले. तसेच श्री.संदेश प्रफुल्ल भानुशाली रा.आग्रारोड, नाशिक हे त्यांना सदर बनावट किटकनाशक पुरविण्यासाठी आले असताना त्यांच्या कब्जातील किटकनाशके जप्त केली आहेत. सदरची बनावट किटकनाशके नाशिक येथे पॅकिंग करुन विक्रीसाठी पुरवित असल्याचे निदर्शनास आले आहे.
(४) आरोपींना अटक करुन त्यांच्या कडून बनावट किटकनाशके जप्त केली आहेत.
(५) होय.
(६) तासगांव पोलीस ठाण्यात भाग ५ गु.र.नं. ८/२००८, भादंविस कलम ४२०, ४८३, ४८६ व ३४, कॉपीराईट ॲक्ट ५१, ६३ व ६४ ट्रेड ॲक्ट कलम १०४ नुसार दिनांक २५/१/२००८ रोजी गुन्हा नोंद करण्यांत आला आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शेतक-यांच्या जीवनाच्या संदर्भात हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. एकीकडे शेतकरी आत्महत्या करीत आहेत, जमिनी नापिकी होत आहेत, शेतक-यांचा कर्जबाजारीपणा वाढला आहे असे असतांना या राज्यातील शेतक-यांना चुकीचे किंवा खोटी किटकनाशके किंवा बियाणे देऊन शेतक-यांची फसवणूक केली जात आहे. या ठिकाणी शासनाने मान्य केले आहे की, अशा प्रकारचे बनावट किटक नाशके विकून शेतक-यांची लाखो रुपयांची फसवणूक केली गेली आहे. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, ज्या व्यक्तींना बनावट औषधे विकतांना पकडण्यात आलेले आहे त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे. परंतु या माणसांनी गेल्या दोन-तीन वर्षात या राज्यातील ब-याच शेतक-यांची फसवणूक केली

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 39291 .....

श्री. रामनाथ मोते....

असावी त्यामुळे या लोकांनी गेल्या दोन तीन वर्षात किती रुपयांची बनावट किटकनाशके विकलेली आहेत? तसेच या प्रश्नाची प्राथमिक चौकशी करण्यात आलेली आहे अशी माहिती या ठिकाणी देण्यात आलेली आहे त्यामुळे यासंदर्भातील संपूर्ण चौकशी किती दिवसात पूर्ण होणार आहे?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, संपतराव श्रीपती घाईल, श्री. संदेश भानुशाली यांना 25.1.2008 ते 1.2.2008 पर्यंत पोलीस कस्टडी देण्यात आली होती तसेच त्यांना 6.2.2008 रोजी न्यायालयीन कस्टडी मिळालेली असून 7 तारखेला जामीन मिळाला आहे. सदर प्रकरणाच्या चौकशीमध्ये हे लोक किती वर्षापासून काम करीत होते, किती प्रमाणात औषधांची विक्री करीत होते यांचा अंदाज मिळू शकलेला नाही. दुर्दैवाची बाब अशी आहे की, बनावट किटकनाशकांच्या संदर्भात एकाही शेतक-याने तक्रार कृषी खात्याकडे केली नव्हती. त्यामुळे किती प्रमाणात बनावट किटकनाशकांची विक्री झालेली आहे याचा अंदाज लावणे कठीण आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, जवळ जवळ 2 वर्षामध्ये 50 लाख रुपयांच्या बोगस किटक नाशकाची विक्री झालेली आहे त्यामुळे हा विषय शेतक-यांच्या दृष्टीने फार गंभीर आहे. त्यामुळे शेतक-यांची बोगस किटकनाशके आणि बोगस बियाणे विकून फसवणूक होणार नाही यासंदर्भात शासनाने काळजी घेण्याची आवश्यकता आहे. या प्रकरणामध्ये दोन व्यक्तींना अटक करण्यात आलेली आहे अशी माहिती या ठिकाणी देण्यात आलेली आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या संदर्भात शासन काय शोध घेत आहे?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो उल्लेख केलेला आहे त्यासंदर्भात माहिती उपलबध्द करुन दिली तर निश्चित चौकशी केली जाईल. बायर क्रॉप सायन्समधील अधिका-यांना बनावट किटकनाशकांची विक्री होत असल्याची बाब लक्षात आल्यामुळे यासंदर्भातील प्रक्रिया सुरु झालेली आहे. तसेच दुसरी बाब अशी आहे की, बायर क्रॉप कंपनीचे औषधाची एमआरपी 2000 रुपये असतांना या व्यक्ती शेतक-यांकडे डायरेक्ट जाऊन बील न देता कमी किमतीत औषधे विकत होते.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.39291.. श्री.राणा जगजितसिंह पाटील... कृषि विभागाने वारंवार वर्तमानपत्रातून प्रसिध्दी दिलेली आहे की, शेतकऱ्यांनी कीटकनाशके खरेदी करीत असतांना ती प्रमाणित घ्यावी आणि मान्यताप्राप्त विक्रेत्यांकडून बिलासह विकत घ्यावी. अशा प्रकारे जर सर्व शेतकऱ्यांनी दक्षता घेंतली तर असे प्रकार कमी होतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी आता असे उत्तर दिले की, "या सदर्भात शेतकऱ्यासंनी तक्रारीच केलेल्या नाहीत." त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, "ज्यावेळी कंपनीने गुन्हा अन्वेषण विभागाकडे तक्रारी केल्या होत्या त्यावेळी कंपनीकडे शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या होत्या." शेतकऱ्यांनी तक्रारी केल्यामुळे या कंपनीने गुन्हा अन्वेषण विभागाला चौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या नाहीत असे माननीय राज्य मंत्र्यांनी म्हणणे गैर आहे. शेतकऱ्यांनी या संबंधी तक्रारी केल्या होत्या त्यानंतरच कंपनीला जाग आली होती . बनावट कीटकनाशके तयार करण्याचे व ते शेतकऱ्यांना देऊन त्यांना फसविण्याचे एक मोठे रॅकेट महाराष्ट्रात कार्यरत आहे. अनेक शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना एका बाटलीमध्ये कीटकनाशके व कीडे टाकून ते कीड जीवंत आहेत असे नमूने पोहोचविले होते परंतु त्या नंतर सुध्दा त्याची चौकशी करण्यात आलेली नाही या प्रकरणात श्री संपतराव श्रीपती घाईल आणि श्री. संदेश प्रफुल्ल भानुशाली या दोन आरोपीना पकडण्यात आलेले आहेत व त्यांच्या विरुध्द गुन्हा रजिस्टर करण्यात आलेला आहे. या आरापींना जेव्हा पकडण्यात आले होते तेव्हा त्यांच्याकडे किती बनावट कीटकनाशकांचा साठा आढळून आला आणि किती साठा जप्त करण्यात आला होता ?

श्री.राणा जगजितसिंग पाटील : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून मी मुद्दाम पुन्हा खुलासा करतो की, शेतकऱ्यांकडून कृषी विभागाकडे कोणतीही तक्रार आलेली नाही कदाचित शेतक-यांनी कंपनीकडे तक्रार केली असेल. या प्रकरणी दोन आरोपीना अटक करण्यात आली होती. नाशिकलो 47 हजार रुपयांचा माल आणि सांगलीला 19 हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला होता तसेच त्यांच्या विरुध्द आय.पी.सी. अंतर्गत 420, 463, 464 आणि 34 ही कलमे लावण्यात आली आहेत. त्याचप्रामाणे कॉपी राईट ॲक्टच्या अंतर्गत कलम 51, 63, 64 ही कलमे लावण्यात आली आहेत. त्याचबरोबर ट्रेड मार्क ॲक्टच्या अंतर्गत कलम 104 आणि कीटक नाशक अधिनियमाच्या अंतर्गत नियम 10,18,19 आणि 13,17,18, 23, 3, 29 कलमे लावण्यात आली आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.39291.....

श्रीमती उषाताई दराडे :सभापती महोदय, औरंगाबाद येथे विभागीय कार्यालय असून त्या ठिकाणी कीटक नाशकांच्या नमुन्यांची तपासणी केली जाते. त्या ठिकाणी तपासणी करणारी यंत्रसामुग्री बंद आहे त्यामुळे तपासणी होत नाही ही गाष्ट खरी आहे काय ? त्याचबरोबर कीटकनाशकांसाठी शेतकऱ्यांचा प्रचंड खर्च होत असतो तो खर्च कमी करण्याच्या दृष्टीने दशपर्णी अर्क आणि लिंबोळी अर्क हा पर्याय शेतकऱ्या समोर देण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे. ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय सेंद्रिय शेतीचा प्रसार व प्रचार करण्याचे काम चालू आहे त्याचबरेाबर पुण्याच्या प्रयोगशाळेत या कीटकनाशकाची तपासणी करण्यात आली होती.

श्रीमती उषाताई दराडें : यंत्रसामुग्री दुरुस्त करणार आहात काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील :होय

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी दोन आरोपींना पकडण्यात आले असून त्यापैकी एक श्री. भानुशाली हे नाशिकचे आहेत आणि श्री. घाईल हे सांगलीचे आहेत. शेतकऱ्यांच्या जीवनमरणाचा हा प्रश्न आहे. या आरोपी विरुध्द जी कलमे लावण्यात आलेली आहेत त्यातून त्यांची सहीसलामत सुटका होणार आहे. तेव्हा त्यांच्या विरुध्द एम.पी.डी.ए.लावणार आहात काय तसेच अन्य राज्यातील शेतकऱ्यांची त्यांनी किती ठिकाणी फसवणूक केलेली आहे या सबंधी शासन गांभीर्याने चौकशी करणार आहे काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : या ठिकाणी ज्या दोन्ही गोष्टी मांडण्यात आल्या आहेत त्या बाबतीत विचार केला जाईल.

सभापती : सन्माननीय राज्य मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, या ठिकाणी जो प्रश्न मांडण्यात आला आहे तो शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. अनेक शेतकऱ्यांना बनावट कीटकनाशके पुरवून त्यांची फसवूणक केली जात आहे. तेव्हा या बाबतची पुढची चौकशी सी.आय.डी.च्या मार्फत करण्याची गरज आहे असे मला वाटते. तेव्हा त्या दृष्टीने सूचना देण्यात याव्यात.

श्री.बाळासाहेब थोरात : होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठाणे जिल्ह्यात पाणी टंचाई असताना परवानगी शिवाय एमयआयडीसीने जादा पाणी उचलून २०० टक्के कपात केल्यामुळे ठाणे जिल्ह्यात पाणी टंचाईची समस्या निर्माण झालेल्या प्रकारास जलसंपदा विभाग जबाबदार असल्याचा डोंबिवली महानगरपालिकेत लोकप्रतिनिधींनी केलेला आरोप

(७) * ३७२७५ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री.सय्यद जामा , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.राजन तेली : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्याच्या पाणी टंचाईच्या समस्येने समस्त ठाणे जिल्ह्यातील जनता त्रस्त झाली असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २००८ वा त्या सुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परवानगी शिवाय एमयआयडीसीने जादा पाणी उचलले आणि एमआयडीसीने २०० टक्के कपात केल्याचे निदर्शनास आले आहे, हे देखील खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकारास जलसंपदा विभाग जबाबदार असल्याबाबतचे आरोप कल्याण डोंबिवली पालिकेतील लोकप्रतिनिधीनी केला आहे, हे देखील खरे आहे काय,

(४) असल्यास, पाणी टंचाईवर तोडगा काढण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत वा येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (१) उल्हास खोऱ्यात अंशत: पाणी कपात झाल्यामुळे ठाणे जिल्ह्यात काही प्रमाणात पाणी कपात करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही. प्रत्यक्षात जरी २० टक्के पाणी कपात धोरण म्हणून प्रस्तावित करण्यात आले असेल तरी प्रत्यक्षात दिनांक १.१.२००८ पासून आठवड्यातून एक दिवस पाणी कपात (१४ टक्के) अंमलात आणण्यात येत आहे.

(३) अशा तक्रारी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.

(४) व (५) पाण्याचे पुनर्नियोजन करुन समप्रमाणात पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त :सभापती महोदय, हा प्रश्न आमच्या भागाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. माननीय मंत्री महोदयांना या प्रश्नाच्या गांभीर्याची कल्पना आहे. त्यामुळे त्या प्रश्नासाठी माननीय मंत्री महोदयांनी तातडीची एक बैठकही बोलावली होती. या संदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, पाण्याचे पुर्ननियोजन करुन सम प्रमाणात पाणी उपलब्ध करुन देण्याची जी कार्यवाही करण्यात येणार आहे त्याचे स्वरुप काय आहे आणि ही कार्यवाही झाल्यास पाणी कपातीचा प्रश्न कायमचा सुटणार आहे काय ?

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37275 ....

श्री. अजित पवार : सभापती महोदय, हा खरे तर नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, भिवंडी, मिरा-भाईंदर या सर्वच शहरांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सभापती महोदय, आपल्यालाही माहिती आहे की, कृष्णा नदी पाणी वाटपातील जो लवाद आहे त्या लवादात जसे कोयना धरणाचे साडेसदुसष्ट टीएमसी पाणी वीज निर्मितीसाठी त्या ठिकाणी वापरले पाहिजे त्याचप्रकारे या भिवपुरी, खोपोली आणि भिरा तेथे साधारणत: आपल्याला साडेबेचाळीस टीएमसी पाण्याची मर्यादा लावलेली आहे आणि हे तिन्ही प्रकल्प टाटा पॉवर कंपनीच्या मालकीचे आहेत. आपल्याला लवादाने असे सांगितलेले आहे की, तुम्ही 5 वर्षात 213 टीएमसी पाणीच वापरायचे आणि एका वर्षात जास्तीत जास्त साडेचौपन्न टीएमसी पाणी वापरण्यास तुम्हाला मुभा आहे. मात्र अशा प्रकारे एकूण 5 वर्षामध्ये 213 टीएमसी पेक्षा अधिक पाणी आपल्याला वापरता येणार नाही. मी ती पाच वर्षे तुम्ही कोठलीही धरली तरी हरकत नाही. म्हणजे आज पासून मागील चार वर्षे अशी धरली किंवा आज पासून पुढील पाच वर्षे धरली तरी हरकत नाही. मात्र कोठल्याही प्रकारे एकूण पाच वर्षात आपल्याला 213 टीएमसी पाणीच वापरता येणार आहे. त्यामुळेच थोडासा प्रश्न निर्माण झालेला आहे. खरे तर या वेगवेगळ्या शहरांनी त्यांना लागणाऱ्या पाण्याची सोय स्वत: केली पाहिजे. ज्याप्रमाणे मुंबई शहर आपल्या स्वत:च्या पिण्याच्या पाण्यासाठी वेगवेगळी धरणे करते., नवी मुंबई शहराने मोरबे धरण केले. तसे या बाकीच्या शहरांनी करायला पाहिजे होते. परंतु या शहरांनी तशा प्रकारे पाहिजे त्या प्रमाणात या गोष्टीकडे लक्ष दिले नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु आता ठाणे महापालिकेने त्यांच्यासाठी शाई धरण करण्याबाबतचा ठराव केलेला आहे. आता यामध्ये उल्हास नदीमध्ये टाटा कंपनीकडून जे काही पाणी सोडले जाते ते आता कमी सोडले गेल्यामुळे या बहुतेक सर्व शहरांना पाण्याची कमतरता भासू लागली आहे. त्याबाबत आता आम्ही काही पावले तातडीने उचलली आहेत. एक तर आम्ही मध्यंतरी टाटा पॉवर कंपनीला सांगितले की, त्यांनी भिवपुरीमधून 24 मे.वॅ. जादा वीज निर्मिती करून, आता टंचाईच्या काळात त्यामध्ये 1 जानेवारी ते 15 जुलै पर्यंत तुम्ही 30 एमएमक्यूब जादा पाणी सोडा. त्याप्रमाणे त्यांनी निर्णय घेतला आणि जादा 30 एमएमक्यूब पाणी सोडायला सुरूवात केली. सभापती महोदय, आम्ही नवी मुंबई महानगरपालिकेला सांगितले की, मोरबे धरणाचे पाणी तुमच्या जलशुद्धीकरण प्रकल्पातील पाणी फेब्रुवारी मार्च पर्यंत पूर्ण करा.

..... पी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार (पुढे चालू....) ता.प्र.क्र.37275 ...

फेब्रुवारी अखेरपर्यंत हा प्रकल्प पूर्ण करू असे ते सुरूवातीस म्हणत होते. पण तसे प्रत्यक्षात आले नाही, आता मार्च अखेरपर्यंत त्यांचा हा प्रकल्प पूर्ण होईल. ते एकदा पूर्ण झाले की, आतापर्यंत ते 40 एमएलडी पाणी उचलत आहेत. मोरब्यातून त्यांनी पाणी उचलण्यास सुरूवात केल्यानंतर 40 एमएलडी अतिरिक्त पाणी बाकीच्या शहरांना त्या ठिकाणी उपलब्ध होईल आणि 1 मे पासून साधारणत: त्यात दररोज 40 एमएलडी म्हणजे जवळपास 150 एमएमक्यूब पाणी उपलब्ध होईल. त्यामुळे एमआयडीसी कडून देखील पाणी घेण्याची गरज तेथे राहणार नाही आणि इतर शहरांना पाणी ते उपलब्ध करून देतील, मात्र नवी मुंबईला तशी गरज भासणार नाही. सभापती महोदय, ठाणे महानगरपालिकेला सध्या भातसा मधून 100 एमएलडी पाणी उपलब्ध होत आहे. ते पाणी आम्ही मुंबई महापालिकेच्या यंत्रणेच्या माध्यमातून सध्या देत आहोत. ठाणे महापालिकेला सध्या भातसा धरणातून पाणी देण्यासाठी पाईप लाईन आणि जलशुद्धीकरण प्लॅटचे काम चालले आहे. ते साधारणपणे 1 मे 2008 पर्यंत नाही तरी 15 जुलै पर्यंत तरी किमान 40 एमएलडी जादा पाणी आम्हाला उपलब्ध होईल. अशा प्रकारे 1 जानेवारी ते 15 जुले् 2008 पर्यंत 288 एमएमक्यूब म्हणजे अंदाजे 10 टीएमसी पाणी उल्हास नदीमध्ये गरजेचे आहे. बारवी धरणातून उपलब्ध होणारे पाणी साधारणपणे साडेतीन टीएमसी आहे, भिवपुरीमधून आवश्यक असणारे पाणी 7 टीएमसी आहे, परंतु भिवपुरीमध्ये आता मी सांगितल्याप्रमाणे कृष्णा लवादामुळे पाणी कमी उपलब्ध राहते आहे, ते साधारणपणे साडेचार टीएमसी पाणीच राहते आहे, त्यामध्ये मग बाष्पीभवन गृहीत धरले किंवा जे वहनव्यय म्हणजे पाणी वाहत असताना होणारे लॉसेस धरले तर त्यातूनही अर्धा टीएमसी पाणी कमी होत आहे. ...

(यानंतर श्री.सरफरे .... क्यू 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

ता.प्र.क्र. 37275...

श्री. अजित पवार....

त्यामुळे निव्वळ भिवपूरीमधून 4 टी.एम.सी. पाणी उपलब्ध होते. त्यामुळे सुरुवातीला गरजेपेक्षा उपलब्ध तूट 3 टी.एम.सी. आहे. ती तूट भरुन काढण्यासाठी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे भिवपूरी आणि मोरबेच्या धरणामधून पाणी घेण्यासंबंधीच्या सर्व गोष्टी केल्या आहेत. त्यामुळे साधारणपणे या सर्व भागात अपेक्षित तूट 43 एम.एम.क्यूब आहे. तरीसुध्दा आज 14.9 एवढी तूट राहणार आहे. वेगवेगळया महानगरपालिका, नगरपालिकांच्या शहरांमध्ये पाण्याच्या गळतीचे प्रमाण 30 टक्के आहे, हे आमच्या विभागाने लक्षात आणून दिले आहे की, गळतीचे असलेले प्रमाण आपण कमी केले पाहिजे. ते 10 टक्क्यापर्यंत कमी केले तर आपल्याला आणखी पाणी कपात करावी लागेल त्या पासून नागरिकांना आपल्याला मदत करता येईल. रेन वॉटर हार्वेस्टींग व सांडपाणी प्रक्रिया करुन आपण पाण्याचा पुर्नवापर केला पाहिजे. त्यामुळे काही अंशी पाणी टंचाईवर आपल्याला मात करता येईल. याकरिता आपण काही तातडीने निर्णय घेतले आहेत. त्यामध्ये काही लॉंग टर्म निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये बारवी धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. आज त्या धरणामधून एम.आय.डी.सी. पाणी घेते. या धरणाची उंची वाढविल्यामुळे त्याची क्षमता दुप्पट होईल. उल्हास नदीच्या पात्रामध्ये मोहने धरणामध्ये मोठया प्रमाणावर गाळ साचला आहे. तो गाळ काढण्याकरिता मध्यंतरी मी अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती. त्यावेळी आमच्या यांत्रिकी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले की, आम्ही तो गाळ काढण्याचा प्रयत्न करु. परंतु गाळ मोठया प्रमाणावर असल्यामुळे त्या गाळामध्ये मशिनरी पाठविता येत नाही.त्यामुळे तो गाळ ताबडतोब काढणे शक्य नाही असे आमच्या तांत्रिक अधिकाऱ्यांनी सांगितले. म्हणून नदीच्या पात्रामध्ये ठिकठिकाणी केटीवेअर उभे करावे लागतील. त्यासाठी 5 ते 6 कोटींचा खर्च येईल. त्या खर्चाला आपण मान्यता देत आहोत. त्याचप्रमाणे डॉ. चितळे समितीने केलेल्या शिफारशीप्रमाणे पोशीर, शाई,गारगी, आणि काळू या धरणांची कामे हाती घ्यावीत. त्यापैकी गारगी आणि काळू ही दोन धरणे मुंबई महानगरपालिका बांधणार आहे. आणि शाई धरण बांधण्याचा ठराव ठाणे महानगरपालिकेने केला आहे. त्यामुळे मुंबई व ठाणे शहरांना पाणी मिळण्यास मदत होईल. नवी मुंबईला पाणी पुरवठा करण्याकरिता मोरबे धरण झाले आहे. उद्या त्याठिकाणी जर आपण पोशीर धरण करण्यामध्ये यशस्वी झालो तर या धरणातील उपलब्ध असलेल्या पाण्याच्या साठयाचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

ता.प्र.क्र. 37275...

श्री. अजित पवार....

फायदा बाकीच्या शहरांना होणार आहे. त्या संदर्भात वन विभागाची आणि पर्यावरण विभागाची परवानगी मिळविण्याचे प्रयत्न सुरु आहेत. यामध्ये वनाचा बराच भाग जात असल्यामुळे आणि अलिकडच्या काळातील केंद्र सरकारचे वनांच्या संदर्भात कडक धोरण असल्यामुळे अडचणी निर्माण होतात. त्यामुळे आम्ही त्यांच्या लक्षात आणून दिले आहे की, पाऊस पडल्यानंतर पूर नियंत्रण करण्यासाठी पोशीर, शाई या धरणांचा उपयोग होईल. आजच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सदस्य सचिवांना सर्व तांत्रिक अधिकाऱ्यांची बैठक घेण्यास मी सांगितले आहे. आठवडयामधून एक दिवस त्या परिसरातील पाणी पुरवठा बंद होतो. त्याचे नियोजन करण्यासाठी तांत्रिक अडचणी येतात. त्या शहरामध्ये 24 तासानंतर पाणी सुरु केल्यानंतर पाईपलाईन भरण्यासाठी किंवा चार्जिंगमध्ये बराच वेळ जातो. 24 तास संपल्यानंतर सुध्दा 10 ते 12 तास शहराला पाणी मिळत नाही. म्हणून संबंधित तांत्रिक लोकांना बरोबर घेऊन ही बैठक चालू आहे. त्यामुळे आज पाणी सुरु केल्यानंतर 10 ते 12 तास उशिराने पाणी मिळत आहे, त्यामधून आपल्याला काहीतरी रिलिफ मिळू शकेल. एकंदरीत राज्य सरकारने या सर्व शहरांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई भासल्यानंतर तातडीने उपाय योजना करण्यासाठी पावले उचलली. आणि त्या संदर्भात काही प्रमाणात रिलिफ मिळाला आहे तो अधिक मिळाला पाहिजे या मताशी आपण सहमत आहोत. परंतु आज त्याठिकाणी पाणी कमी उपलब्ध असल्यामुळे यामध्ये वेगवेगळया अडचणी येत आहेत. तरीसुध्दा 14 टक्के कपात करण्याचा निर्णय घेत आहोत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37275 . . . .

श्री.संजय केळकर : अध्यक्ष महाराज, माननीय मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिलेले असले तरी खरे म्हणजे ठाणे जिल्हयाचे वाढते नागरीकरण आणि वाढत असलेली लोकसंख्या लक्षात घेतली पाहिजे. हा इतका प्रचंड मोठा जिल्हा आहे की, ज्याच्यामध्ये सहा महानगरपालिका, नऊ नगरपालिका आणि बरीच गावे आहेत. पण शासन या प्रश्नाच्या बाबतीत उदासीन धोरण स्विकारीत आहे आणि त्या-त्या महापालिकेवरच सर्व सोडले जात आहे. उल्हास नदीचे खोरे साफ करण्यासाठी दोन महानगरपालिकेकडे पैसे नव्हते. याबाबतीत मागणी केल्यानंतर उल्हास नदीचे खोरे, वाल्धुनी नाला ज्याठिकाणी अतिवृष्टीमध्ये प्रॉब्लेम निर्माण झाला होता, तो साफ करण्यासाठी एम.एम.आर.डी.ए.ला पैसे द्यावे लागले. एवढे मोठे नागरीकरण झालेले असताना केवळ महानगरपालिका क्षेत्रामध्ये पाण्यासाठी तेथे मोठया प्रमाणात संघर्ष होत आहे. केवळ महापालिकापुरते नाही तर ज्यावेळी 20 टक्के पाणी कपात असेल त्यावेळी त्याचा परिणाम एक दिवस होत नाहीतर महानगरपालिका, नगरपालिका शहरांमध्ये तीन दिवस पाणी येत नाही. ग्रामीण भागामध्ये जर जल स्वराज योजनेची वाट लागलेली आहे. तेथील एकही जलस्वराज योजना चांगल्या प्रकारे झालेली आहे असे नाही.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माझा स्पेसिफीक प्रश्न आहे. हा ठाणे जिल्हयातील पाण्याचा प्रश्न असून तो अतिशय महत्वाचा आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, शाही धरण आणि पोशीर धरण, तसेच मोरबे धरणाचे पाणी देखील नवी मुंबईला पुरत नाही. त्यामुळे याबाबतीत शासनाने ठोस अशी कोणत्या प्रकारची योजना करण्याचे ठरविलेले आहे. नेमके कोणते धरण बांधण्यात येणार आहे ? यासाठी केवळ महानगरपालिकेवर अवलंबून न राहता शासन त्यासाठी किती पैसे खर्च करणार आहे ? एम.एम.आर.डी.ए.कडून किती निधी घेण्यात येणार आहे? कारण ठाणे जिल्हयाच्या बाबतीत एम.एम.आर.डी.ए.कडे बॅकलॉग आहेच. एक लाख कोटी रुपये खर्च झालेले नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडून किती निधी घेण्यात येणार आहे ? या जिल्हयासाठी पाण्याच्या बाबतीत कशा पध्दतीची उपाययोजना करणार आहात ? याचे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. कारण हे अतिशय महत्वाचे प्रश्न आहेत.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, एम.एम.आर.डी.ए.मार्फत पैसे द्यावेत किंवा शासनाने

. . . .आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पैसे द्यावेत. परंतु त्यांना पैसे उपलब्ध करुन दिलेले आहेत. उल्हास नदीच्या बाबतीत महानगर-पालिकेला जे पैसे द्यावयाचे आहेत, ते कोणाकडून द्यावयाचे हा शासनाचा अधिकार आहे. शासनाच्याच अंतर्गत एम.एम.आर.डी.ए.आहे. त्याठिकाणी . . . .

श्री.संजय केळकर : अध्यक्ष महाराज, पण एम.एम.आर.डी.ए.कडून पैसे खर्च होत नाहीत. जर शासनाच्या अंतर्गत एम.एम.आर.डी.ए. असेल तर त्यांच्याकडून आमच्यासाठी पैसे खर्च होत नाहीत.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महाराज, मी सन्माननीय सदस्यांचा प्रश्न ऐकून घेतलेला आहे. त्यामुळे आता त्यांनी माझे उत्तर ऐकून घ्यावे. एम.एम.आर.डी.ए.ने निधी दिला. मधल्या काळामध्ये मी ठाणे महानगरपलिकेच्या सर्व सन्माननीय लोकप्रतिनिधींना एकत्र बोलविले होते. जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशनच्या निमित्ताने पिण्याच्या पाण्यासाठी देखील केंद्र शासन चांगल्या प्रकारे निधी देत असते. आम्ही मधल्या काळामध्ये मोठमोठया शहरांना मग पुणे असेल, पिंपरी-चिंचवड असेल, मुंबई, नवी मुंबई किंवा ठाणे असेल या सगळयांनाच विनंती करीत आहोत की,ही शहरे वाढत असताना, राज्य शासन सुध्दा बाकीची जी मदत हवी आहे, ती जरुर करील.परंतु ही मदत करीत असताना आपल्या भागामध्ये मोठया प्रमाणात नागरीकरण होत आहे. त्यावेळेस आपल्या बजेटमध्ये देखील काही तरतूद करावयास पाहिजे. ज्याप्रमाणे मुंबई महानगरपालिका वेगवेगळया प्रकारची, धरणाच्या बाबतीत तरतूद करते.तसेच शाही आणि पोशीर धरणाच्या संदर्भात आम्ही त्यांना विनंती केली की, तुम्ही तशा प्रकारच्या ठराव करावा. तसेच आपण या विभागाचे माननीय केंद्रीय मंत्री श्री.जयपाल रेड्डीसाहेबांना भेटून यासाठी निधी देण्याच्या बाबतीत विनंती करु. मागच्या वेळी आमच्या विभागाने, राज्य शासनाने असा प्रयत्न केला की, पावसाचे जे पाणी पडेल ते कंट्रोल करण्यासाठी किंवा पूर नियंत्रण करण्याचे काम करण्यासाठी देखील ही धरणे उपयुक्त ठरु शकतात. आमच्याकडून नवी मुंबई महानगरपालिकेने मोरबे धरण टेक ओव्हर केले. त्यामुळे आता नव्या मुंबईतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न जवळपास सुटलेला आहे.

श्री.संजय केळकर (खाली बसून) : अजून राहिलेला आहे.

. . . .आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार : सभापती महोदय, थोडया प्रमाणात राहिलेला असून तो मार्च महिन्यामध्ये सुटणार आहे. जसे नव्या मुंबईने याबाबतीत पुढाकार घेतला, त्याप्रमाणे इतर महानगरपालिकांनी देखील पुढाकार घ्यावा. आम्ही ही बाब केवळ महानगरपालिकेवर अजिबात ढकलत नाही. त्यामध्ये बारवी धरणाच्या बाबतीत सांगावयाचे तर हे धरण एम.आय.डी.सी.च्या मालकीचे आहे. मी सुरुवातीलाच सांगितलेले आहे की, आम्ही बारवी धरणाची ऊंची वाढविण्याच्या बाबतीत निर्णय घेतलेला आहे. वरच्या भागातून पाणी सोडण्यासाठी म्हणजे टाटाची जे वीज निर्मिती केंद्र आहे, तेथून पाणी सोडण्याच्या बाबतीत लवादाची अडचण आली नसती तर हा कोणताही प्रश्न निर्माण झाला नसता. पण त्यांनी पाच वर्षामध्ये 213 टीएमसी पेक्षा जास्त पाणी वापरावयाचे नाही अशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे म्हणून त्याठिकाणी थोडयाफार अडचणी निर्माण झाल्या आहेत. माझी सभागृहाच्या माध्यमातून त्या भागातील महानगरपालिका, नगरपालिकांना विनंती राहील की, त्यांनी त्यांच्या वितरण व्यवस्थेतील जे लॉसेस आहेत, ते कमी करण्याचा प्रयत्न करावा. तसेच त्याठिकाणी मोठया प्रमाणावर नागरीकरण झालेले असल्यामुळे तेथे कोणतीही अडचण येऊ न देता त्यांचे प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत राज्य शासनाची जी काही जबाबदारी आहे, ती पूर्णपणे पार पाडण्यासाठी प्रयत्नशील आहे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

शोक प्रस्ताव

पृ.शी.: शोक प्रस्ताव.

मु.शी.: परम पुज्य सद्गुरु स्वामी गगनगिरी महाराज यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

श्री. आर.आर. पाटील (उप मुख्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, परम पुज्य सद्गुरु स्वामी गगनगिरी महाराज, यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

" परम पुज्य सद्गुरु स्वामी गगनगिरी महाराज यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

श्री. कपिल पाटील : अध्यक्ष महोदय, माझा आक्षेप असा आहे की, ज्या व्यक्ती या सभागृहाच्या सदस्य नाहीत, अशा धार्मिक व्यक्तिंच्या आणि अध्यात्मिक व्यक्तिंच्या दु:खद निधनाबद्दल आपण या सभागृहात शोक प्रस्ताव मांडायला सुरुवात केली तर ते शक्य होणार नाही. अनेक व्यक्तिंच्या दु:खद निधनाबद्दल या सभागृहात शोक प्रस्ताव मांडावे लागतील, त्यातून नवे प्रश्न निर्माण होतील. हे सभागृह इहवादी भूमिका घेऊन काम करीत असते. धर्मिक, अध्यात्मिक व्यक्तिंच्या संत कार्याबद्दल कोणाचाही आक्षेप नाही. कोणाचेही दुमत नाही. त्यांच्याबद्दल सर्वांना आदर आहे. तो आदर जरुर व्यक्त करावा. परंतु सभागृहात अशा पध्दतीचा पायंडा पडत असेल तर त्यातून चुकीचा संदेश जाईल. माननीय मंत्रिमहोदय, श्री. अजितदादा पवार सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी याबद्दल स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे. अन्यथा त्यांचे शासन कोणत्या दिशेने चालले आहे?एवढेच मला या निमित्ताने निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. याबाबतचा माझा तीव्र आक्षेप नोंदविण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री. आर.आर.पाटील : अध्यक्ष महोदय, एखाद्या व्यक्तिच्या शोक प्रस्तावाबाबत कोणी आक्षेप घेऊ नये आणि जर कोणी तशा प्रकारचा आक्षेप घेतला तर तो रेकॉर्डवर ठेवण्यात येऊ नये.

सभापती : या ठिकाणी घेण्यात आलेला आक्षेप रेकॉर्डवरुन काढण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : अध्यक्ष महोदय, हा अन्याय आहे. सभागृहात चुकीचा पायंडे पडू नयेत. मी कोणत्याही व्यक्तिबद्दल बोललो नाही. मी या ठिकाणी आदरच व्यक्त केलेला आहे.

...2s

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. कपील पाटील यांनी या ठिकाणी जो आक्षेप घेतला आहे तो रेकॉर्डवरुन काढलेला आहे. हा आक्षेप वृत्तपत्रातदेखील येणार नाही याची संबंधीतांनी नोंद

श्री. कपिल पाटील : अध्यक्ष महोदय, मी घेतलेला आक्षेप रेकॉर्डवरुन काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे त्याबद्दल मी सभात्याग करीत आहे.

(सन्माननीय सदस्य श्री. कपील पाटील यांचे बहिर्गमन)

श्री. आर.आर.पाटील :आधुनिक काळातील ऋषी, सिद्ध योग तपस्वी, विश्वगौरवांकित परम पुज्य सद्‌गुरु स्वामी गगनगिरी महाराजांचा जन्म सातारा जिल्ह्यात पाटणजवळील श्रीक्षेत्र मणदूरे येथे १९०५ मध्ये झाला. श्रीपाद गणपत पाटणकर हे त्यांचे मूळ नाव होते. लहानपणापासूनच त्यांना अध्यात्माची विलक्षण ओढ होती. कोल्हापूरच्या गगनबावडा पर्वतावर त्यांनी अनेक वर्षे तपश्चर्या केली. त्यामुळेच "गगनगिरी महाराज'' नावाने ते ओळखले जावू लागले. सुरुवातीपासूनच ते नाथ संप्रदायाच्या संर्पकात आले. नाथ संप्रदयातील महंताबरोबर ते संपूर्ण भारतभर फिरले. नेपाळ, भूतान, मानसरोवर, गौरीशंकर, गोरखपूर, पशुपतीनाथ या ठिकाणी त्यांनी तपश्चर्या करुन ज्ञानप्राप्ती केली.

त्यानंतर खोपोली परिसरात येऊन पाताळगंगेच्या उगमाजवळ असलेली निर्मनुष्य, गर्द वनराई त्यांनी तपश्चर्येसाठी निवडली. भटकंतीला विराम देऊन तेथेच त्यांनी आश्रम उभारला आणि अखेरपर्यंत वास्तव्य केले. या काळात सूर्योदयापासून पाताळगंगेच्या प्रवाहात तास्नतास बुडी मारुन ते जलसाधना करीत असत. अध्यक्ष महोदय, हे समजून घेण्याची आवश्यकता आहे. वैश्विककल्याण, बंधुभाव, नितीमत्ता, निष्कामकर्मयोग, विज्ञाननिष्ठ अध्यात्म, त्यागमय जीवन, परोपकार, निसर्गसंवर्धन, सर्वधर्मसमभाव ही त्यांच्या जीवनाची नवसूत्रे होती. अध्यात्माला विज्ञानाची सांगड घालून त्यांनी आपल्या भक्तांना जीवनाचा नवा मार्ग दाखविला. विविध लोकोपयोगी कार्यालाही त्यांचे अधिष्ठान लाभले.

गगनगिरी सेवा ट्रस्टच्या माध्यमातून लोकोपयोगी कार्याकरिता त्यांनी कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला. आदिवासींसाठी आरोग्य शिबिरे, वृक्षारोपणाचे कार्यही त्यांनी हाती घेतले. सर्वसामान्य नागरिकांपासून ते मोठया नेत्यांपर्यंत केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देश-विदेशात त्यांचे अनेक क्षेत्रातील भक्तजण सर्वदूर पसरले आहेत. मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गोवा, नगर, नाशिक या ठिकाणी त्यांच्या संप्रदायाच्या नित्य उपासनाही सुरु आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील. . .

गगनबावडा, मालाड-मनोरी, दाजीपूर, आंबोळगड येथील मठ महाराजांचे आवडते होते. देशभरात त्यांचे ३५०हून अधिक आश्रम आहेत. सन १९६५ मध्ये नाशिक येथील कुंभमेळयाचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले होते.

आपल्या दिव्यशक्तीचा उपयोग लोकोध्दारासाठी व वैश्विकशांतीसाठी करुन समस्त मानव जातीची सेवा केली. त्यांनी केलेल्या या विश्वकल्याणाच्या कार्याची दखल घेऊन अमेरिकेतील शिकागो येथील धर्मसंसदेकडून स्वामी विवेकानंद यांच्या नंतर जागतिक प्रतिष्ठेचा "विश्वगौरव'' पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला होता.

अशा या महान योगीराज, श्री चैतन्यप्रभु, तपस्वी, परम पुज्य सद्‌गुरु श्री स्वामी नाथ गगनगिरी महाराजांचे सोमवार दि. ४ फेब्रुवारी २००८ रोजी महानिर्वाण झाले. मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

यानंतर श्री. बरवड.... . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेब यांनी वंदनीय सद्गुरु स्वामी गगनगिरी महाराजांसंबंधीचा जो शोक प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. मला असे वाटते की, एकदा शोक प्रस्ताव सभागृहाच्या नेत्यांनी मांडल्यानंतर त्याला अशा प्रकारचा विरोध करणे ही या सभागृहातील पहिली घटना असेल. सभापती महोदय, या वरिष्ठ सभागृहामध्ये अशाच व्यक्तींबाबतचा शोक प्रस्ताव आणला जातो की, ज्यांनी समाजाच्या सेवेसाठी आपले आयुष्य खर्ची घातले. अशाच लोकांचा या ठिकाणी उल्लेख केला जात असतो. स्वामी गगनगिरी महाराज यांनी नुसतीच अध्यात्मिकता जोपासलेली नाही. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी उल्लेख केल्याप्रमाणे त्यागमय जीवन, परोपकार, निसर्गसंवर्धन, सर्वधर्मसमभाव इत्यादी त्यांच्या जीवनाची नवसूत्रे होती. सर्व धर्मांना एकत्र जोडण्याचे तसेच आदिवासींसाठी आरोग्य शिबिरे, वृक्षारोपणाचे कार्यही त्यांनी हाती घेतले होते. सर्वसामान्य नागरिक त्यांना भेटावयास जात असत.

सभापती महोदय, नाथ संप्रदायाचे गाढे अभ्यासक आणि अध्यापक गगनगिरी महाराज यांचे दिनांक 4 फेब्रुवारी, 2008 रोजी खोपोली येथे निधन झाले. गगनगिरी महाराज हटयोगी म्हणून प्रसिध्द होते. पाण्यात राहून दीर्घकाळ त्यांनी तपश्चर्या केली होती. तासन्तास पाण्यात राहिल्यामुळे त्यांच्या हातापायाची बोटे देखील माशांनी खाल्ली होती तरीही त्यांच्या साधनेत कधीही खंड पडला नव्हता. त्यांच्या प्रवचनामधून विश्वकल्याण, बंधुभाव, नीतीमत्ता, सर्वधर्मसमभाव याची शिकवण ते देत असत. अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालून जीवनाचा नवा मार्ग त्यांनी दाखविला. मुंबईत आल्यानंतर माझगावच्या रतनज्योत कंपनी मालकांच्या निवासस्थानी त्यांचा मुक्काम असे. मी अनेकवेळा त्या ठिकाणी गेलो होतो. त्यांच्या दर्शनासाठी भक्तांची लांबचलांब रांग त्या ठिकाणी असावयाची. आपल्या सदनाचे जेष्ठ सदस्य कै. वामनराव महाडिक हे त्यांचे निष्ठावान अनुयायी होते. आपल्या विजयाचे आणि आपल्या यशाचे सर्व श्रेय ते गगनगिरी महाराजांच्या चरणी अर्पण करीत असत. धार्मिक क्षेत्रातील नामवंत व्यक्तीप्रमाणेच सामाजिक व राजकीय क्षेत्रात देखील त्यांचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

अनेक अनुयायी आहेत. त्यांच्या जीवनातील सर्वोच्च क्षण म्हणजे अमेरिकेतील शिकागो येथे धर्मसंसदेकडून स्वामी विवेकानंद यांच्यानंतर जागतिक प्रतिष्ठेचा "विश्वगौरव" पुरस्कार त्यांना मिळाला. अशा या महान योगीराजाचे दिनांक 4 फेब्रुवारी, 2008 रोजी निधन झाले. त्यांच्या निधनानिमित्त सभागृहाच्या नेत्यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावास मी व माझा पक्ष समर्थन देत आहोत.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय नेते श्री. आर. आर. पाटील यांनी या ठिकाणी महान योगीराज, चैतन्यप्रभु, तपस्वी, परमपूज्य सद्गुरु श्री. स्वामी नाथ गगनगिरी महाराजांचे सोमवार, दि. 4 फेब्रुवारी, 2008 रोजी निधन झाले त्याबद्दल शोक प्रस्ताव मांडलेला आहे. मला एका गोष्टीचे खूप आश्चर्य वाटले की, शोक प्रस्तावासारख्या विषयाला विरोध करणारे सदस्य या सदनामध्ये आहेत. विचारांचे हे कोणते मिश्रण आहे ते समजत नाही. जगाच्या पाठीवर अशी मिश्रणे थोडी आहेत आणि ती समाजाला लागलेली कीड आहे. समाजातील श्रध्दा नष्ट करण्यासाठी निर्माण झालेले जे किडे आहेत त्यातील ही एक वळवळणारी कीड आहे अशी माझी भावना आहे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आपण रेकॉर्डवर ठेवलेले नाही. त्यामुळे त्याबद्दल आता सन्माननीय सदस्यांनी बोललेले रेकॉर्डवर येऊ शकेल त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी त्याबद्दल प्रतिक्रिया व्यक्त न करणे आणि ते रेकॉर्डवर न आणणे योग्य होईल. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे रेकॉर्डवर आलेले नाही परंतु त्यांनी विरोध केला हे आपल्या रेकॉर्डवर येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांचे नाव घेतलेले नाही आणि घेणार सुध्दा नाही. परंतु ही विकृती कशी आहे ते मी सांगत आहे. मी कोणाचेही नाव घेतलेले नाही. मी जे बोलत आहे ते रेकॉर्डवर यावे अशी माझी इच्छा आहे. आपल्याला ते रेकॉर्डमधून काढावयाचे असेल तर काढावे. महाराष्ट्रामध्ये ही विकृती वाढू नये म्हणून मी ते मांडलेले आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी शोक प्रस्तावावर बोलावे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी शोक प्रस्तावावर बोलत आहे. समाजामध्ये निर्माण झालेल्या विकृतीसंबंधी मी बोलत आहे. ती दूर केली पाहिजे. समाजामध्ये असलेल्या विकृतीच्या विरोधामध्ये असणारे आपण आहोत. या विकृतीला कधीच कोणाचा पाठिंबा असता कामा नये, एवढाच माझ्या बोलण्यातील महत्वाचा भाग आहे, बाकी मला काही म्हणावयाचे नाही. ते एक तपस्वी आहेत हे ज्यांना मान्य असेल त्यांनी त्यांचे आशीवार्द घ्यावेत. गगनगिरी महाराजांनी सामाजिक कार्य केलेले आहे. कालच स्व.बाबा आमटे यांना या सभागृहाने श्रध्दांजली वाहिली आहे. एखादी व्यक्ती जन्माला आल्यानंतर स्वत:ला समाजासाठी वाहून घेते ते कोणत्याही स्वार्थामुळे नाही. त्यांनी नि:स्वार्थी भावनेतून कार्य केलेले आहे, अतिशय वंदनीय अशाप्रकारचे हे कार्य आहे. त्यामुळेच या अल्पपरिचयामध्ये असे नमूद केले आहे की, 'गगनगिरी सेवा ट्रस्टच्या माध्यमातून लोकोपयोगी कार्याकरिता त्यांनी कोटयवधी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला. आदिवासींसाठी आरोग्य शिबिरे, वृक्षारोपणाचे कार्यही त्यांनी हाती घेतले. सर्वसामान्य नागरिकांपासून ते मोठया नेत्यांपर्यंत केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशविदेशात त्यांचे अनेक क्षेत्रातील भक्तजण सर्वदूर पसरले आहेत. मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गोवा, नगर नाशिक याठिकाणी त्यांच्या संप्रदायाच्या नित्य उपासनाही सुरु आहेत. गगनबावडा, मालाड-मनोरी, दाजीपूर, आंबोळगड येथील मठ महाराजांचे आवडते होते. देशभरात त्यांचे 350 हून अधिक आश्रम आहेत. सन 1965 मध्ये नाशिक येथील कुंभमेळयाचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले होते.' एवढे महान कार्य ज्यांच्या हातून घडले त्यांच्याबद्दलचा हा शोकप्रस्ताव आहे. या सदनाच्या भावना जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम आपणा सर्वांचे आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी अतिशय चांगल्या भावनेतून हा प्रस्ताव मांडला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. या शोक प्रस्तावाला मी माझ्या पक्षाच्यावतीने पाठिंबा देऊन प.पू.गगनगिरी महाराज यांना श्रध्दांजली अर्पण करुन मी येथेच थांबतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : या सदनाचे नेते आणि माननीय उपमुख्यमंत्री यांनी याठिकाणी प.पू.गगनगिरी महाराज यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे त्या शोकप्रस्तावाला सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी पाठिंबा दिलेला आहे. समाज जीवनामध्ये असीम त्याग, तपश्चर्या यातून सामान्य लोकांना अचूक व योग्य पध्दतीने मार्गदर्शन मिळावे या अनुषंगाने या तपस्वी योग्याने सा-या महाराष्ट्रातील व देशातील लोकांना मार्गदर्शन केले. एक फार मोठी आध्यात्मिक शक्ती म्हणून गगनगिरी महाराजांकडे समाजातील लोक पाहत असत. मग समाजकारणी असतील, शैक्षणिक क्षेत्रातील असतील, राजकारणातील सुध्दा असतील. सर्वधर्मसमभावाच्या दृष्टीने, सर्व जाती धर्मातील लोक त्यांचे अनुयायी होते.

मला सुध्दा अभिमानाने उल्लेख करावयाचा आहे की, डिसेंबर, 1905 मध्ये पाटण तालुक्यामध्ये त्यांचा जन्म झाला होता. 3 वर्षानंतर त्यांच्या आई-वडिलांचे निधन झाले. माझ्या शिराळा तालुक्यात नाथपंथीय मंदिर आहे. हिमालयातून 14 वर्षानंतर नाथपंथीय स्वामी शिराळा येथे येतात. तेथे मठाधिपतींची स्थापना करीत असतात आणि तेथून ते परत जात असतात.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती...)

त्या ठिकाणी गगनगिरी महाराज हे अत्यंत अल्पवयीन मुलगा म्हणून आले. त्यानंतर ते वयाच्या 8व्या व 9व्या वर्षी नाथपंथीय साधूं बरोबर देशाच्या कानाकोप-यामध्ये गेले, हिमालयात गेले. देशाच्या कानाकोप-यात त्यांनी अनेक वर्षे तपश्चर्या केली आणि 1932 साली ते ख-या अर्थाने पुन्हा महाराष्ट्रामध्ये परत आले. कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराज यांच्या सान्निध्यात ते भोपाळमध्ये आले. त्यानंतर गगनबावडा, दाजीपूर या भागामध्ये त्यांनी पुन्हा 12 वर्षे तपश्चर्या केली. अशा या महाराष्ट्रातील संतश्रेष्ठ विभुतीचे निधन झालेले आहे. या ठिकाणी सभागृहाचे नेते सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील साहेबांनी ज्या काही भावना व्यक्त केल्या त्याच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. गगनगिरी महाराजांना अमेरिकेतील शिकागो येथील धर्मसंसदेकडून स्वामी विवेकानंद यांच्या नंतर "विश्वगौरव" पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. ज्या पध्दतीने ते आंतरराष्ट्रीय क्षेत्रात देखील मान्यता पावले त्यावरुन त्यांचे देवत्व किती मोठे होते याची कल्पना येते. मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गोवा, नगर, नाशिक अशा विविध ठिकाणी त्यांनी आपले आश्रम स्थापन केले आणि लोकांना सातत्याने मार्गदर्शन केले. गगनबावडा, मालाड-मनोरी, दाजीपूर, आंबोळगड या ठिकाणी महाराजांचे सातत्याने वास्तव्य होते. 1965मध्ये त्यांनी नाशिक येथील कुंभमेळयाचे अध्यक्षस्थान भूषविले. संपूर्ण देशाच्यादृष्टीने वैभव समजल्या जाणा-या अशा कुंभमेळयाचे अध्यक्षस्थान भूषविणे हा त्या साधू-संताचा फार मोठा सन्मान समजला जातो. मी या गोष्टीचा अभिमानाने उल्लेख करीन की, मी स्वत: महाराजांचा अनुयायी होतो. आपणासारखे राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक कार्यकर्ते महाराजांच्या सान्निध्यात त्यांच्या दर्शनासाठी आणि त्यांचे अचूक मार्गदर्शन घेण्याच्या दृष्टीने त्यांच्या आश्रमात जात होते. ख-या अर्थाने बंधुभाव, नीतीमत्ता, निष्कामकर्मयोग, विज्ञाननिष्ठ अध्यात्म, त्यागमय जीवन, परोपकार, निसर्गसंवर्धन, सर्वधर्मसमभाव असे अधिष्ठान असलेल्या विचारांनी त्यांनी समाजाला मागदर्शन केले. अशा या महान योगीराज श्री चैतन्यप्रभु, तपस्वी परम पूज्य सद्गुरु श्री स्वामी नाथ गगनगिरी महाराजांचे सोमवार, दिनांक 4 फेब्रुवारी 2008 रोजी महानिर्वाण झालेले आहे. त्यांना मी श्रध्दांजली वाहतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती.....

सनमाननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहातात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे.

...3..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्याबाबत

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती : दर शुक्रवारी औचित्याचे मुद्दे मांडण्यासाठी परवानगी देण्यात यावी, अशा पध्दतीचा नियम आपण केलेला आहे. मी सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार आणि सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांना कागदपत्रे सादर झाल्यानंतर त्यांचे म्हणणे मांडण्यास परवानगी देईन. तेव्हा शुक्रवारचा नियम आपण मोडायचा का ? हे सदनाने सांगितले पाहिजे.

...नंतर श्री. गिते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कृपया औचित्याचा मुद्दा आपण मेरीटवर ठरवावा.

सभापती : एखाद्या सन्माननीय सदस्यांचा मुद्दा हा महत्वाचा आहे व तो मुद्दा उपस्थित करण्यासाठी सन्माननीय सदस्यांना संधी दिली तर दुसरे देखील सन्माननीय सदस्य सांगतील की, आमचे देखील औचित्याचे मुद्दे महत्वाचे आहेत. त्यामुळे ते मुद्दे उपस्थित करण्यास आम्हाला परवानगी द्यावी. म्हणून औचित्याचे मुद्दे शुक्रवारी उपस्थित करावेत अशा प्रकारचा निर्णय सभागृहाने घेतलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, औचित्याचे मुद्दे शुक्रवारी उपस्थित करण्यात यावेत यासंबंधीचा जो निर्णय घेतलेला आहे तो निर्णय आपण बदलू नका. परंतु एखाद्या सदस्यांचा औचित्याच्या मुद्याचा विषय गंभीर स्वरुपाचा असेल तर तो विषय उपस्थित करण्यासाठी आपण कृपया सदस्यांना संधी उपलब्ध करुन द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती : ठीक आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2007-2008 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे.

डॉ. सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007-2008 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाला यांनी सन 2007-2008 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

सभापती : सन 2007-2008 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: आकस्मिकता निधीतून मंजूर केलेल्या आगाऊ रकमांची सूची सभागृहासमोर ठेवणे.

डॉ. सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 11 मार्च, 2008 रोजी विधानमंडळास सादर करण्यात आलेल्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रात दिनांक 10 मार्च, 2008 पर्यंत आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या ज्या आगाऊ रकमांसबंधात मागण्या समाविष्ट केलेल्या नाहीत, त्या दर्शविणारी सूची सभागृहासमोर ठेवीत आहे.

सभापती : सूची सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी " मुंबई येथील घाटकोपर-अंधेरी लिंक रोडवर अल्ताफनगर येथे जोडरस्त्याच्या कामासाठी एम.एम.आर.डी.ए.ने खोदलेल्या खड्डयात दिनांक 7 मार्च, 2008 रोजी वा त्या दरम्यान रात्री 3 विद्यार्थी पडून त्यातील एका विद्यार्थ्याचा पाण्यात बुडून मृत्यू होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री. जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील यांनी " कुवेत येथे नोकरीचे आमिष दाखवून रायगड जिल्हयातील श्रीवर्धन व म्हसळ तालुक्यातील अनेक बेरोजगार युवकांची सौ.शहनाझ अजिज सोंडे व इतरांनी केलेली फसवणूक, यासंबंधातील गुन्हा नोंदवून घेण्यास श्रीवर्धन येथील पोलीस निरीक्षकांनी दिलेला नकार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे यांनी " भिवंडी महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये सुमारे 100 शिक्षकांची पदे गेली दोन वर्षे रिक्त असणे, प्राथमिक शिक्षकांना वेतन न मिळणे, वरिष्ठ व निवड श्रेणीची प्रकरणे अनेक दिवसांपासून प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे प्रलंबित असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे यांनी " लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या देहू येथील संत तुकाराम महाराजांच्या शिळा मंदिरातील मुखवटा दिनांक 2 मार्च, 2008 रोजी चोरीस जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मा. सभापती...

यानंतर सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी " मुंबईतील परळ येथील के.ई.एम. रुग्णालयामध्ये पोसीट्रॉन एमीशन टोमोग्राफीची नवीन मशीन येऊन जागेअभावी धूळ खात पडून असणे, सदर मशीन अत्यंत प्रगत व महाग असून त्याचा कॅन्सरच्या रुग्णांवर उपचार करण्याकरिता सर्वात जास्त उपयोग होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. विनोद तावडे यांनी " राजेश चतुर्वेदी, बिल्डर यांना खोटया आरोपाखाली अटक करणे, त्यांचा मानसिक छळ करणे, त्यांच्याकडून पैशांची मागणी करणे, त्याची पूर्तता न झाल्याने वारंवार त्यांना अटक करुन पोलीस कोठडीत टाकण्याची धमकी देणे, गुंड, अतिरेकी, दहशतवादी, माफिया यांच्याबरोबर पोलीस हे बिल्डरांना धमकावून त्यांच्याकडून खंडणी मागत असल्याचे सर्रास प्रकार " या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता. परंतु तो प्रस्ताव मी नाकारला असून नियम 93 ची सूचना दाखल करुन घेतली आहे. तरी या विषयाच्या बाबतीत शासनाने निवेदन करावे अशा प्रकारची सूचना देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री शरद पाटील, जयंत प्र.पाटील यांनी " शासनाने राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचे धोरण स्विकारुनही त्यांची होत नसलेली पूर्तता, त्यांच्यासाठी 5 टक्के आरक्षण ठेवण्याबाबत होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. कानडे...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

सभापती ....

सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, शरद पाटील यांनी "शासनाने दिनांक 15 जानेवारी 2008 रोजी कोल्हापूर येथील उपसंचालक,आरोग्य सेवा कोल्हापूर मंडळ रद्द करुन सांगली व कोल्हापूर हे जिल्हे उपसंचालक,आरोग्य सेवा,पुणे यांना जोडल्याने तसेच सिंधुदूर्ग जिल्हा उपसंचालक आरोग्य सेवा ठाणे मंडळाकडे जोडल्याने कोल्हापूर, सांगली व सिंधुदूर्ग येथील जनतेची गैरसोय होत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, रामनाथ मोते यांनी शासनाने सन 2001 पासून राज्यात कार्यरत असलेल्या 8 हजार 655 वस्तीशाळांतील शिक्षकांना 3 वर्षे पूर्ण झाल्यानंतरही त्यांना सेवेत सामावून न घेतल्याने संबंधित शिक्षकांनी आमरण उपोषणाचा दिलेला इशारा या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या विषयावर आजच निवेदन करण्यास किंवा उद्या निवेदन करण्यास शासनास आपण निदेश द्यावेत.

सभापती : शासनाने याविषयावर शक्यतो उद्या निवेदन करण्याचा प्रयत्न करावा. अन्यथा परवा याविषयावर निवेदन करावे. संसदीय कार्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत.त्यांनी याची नोंद घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

पृ.शी./मु.शी. : औचित्याच्या मुद्यासंबंधी

सभापती : औचित्याचे फक्त दोन मुद्दे मांडण्यासाठी मी परवानगी देणारआहे. सन्माननीय सदस्यांनी एका मिनिटामध्ये विषय मांडावा. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत आणि सन्माननीय सदस्य डॉ. वसंतराव पवार यांनी औचित्याचे मुद्दे आता सदनात मांडावेत.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, रोजगार हमी योजनेचा निधी आणि शासनाचा अन्य निधी याचा वापर कसा करावा यासंदर्भात एक विधेयक सदनात आले होते. या विधेयकावर साधक-बाधक चर्चा व्हावी म्हणून ते संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले होते. असे असतानाही या समितीचा अहवाल सदनात न मांडताच अध्यादेश काढण्याचा प्रयत्न केला. या अध्यादेशाला विधानसभेमध्ये प्रचंड विरोध झाला. म्हणून यासंदर्भात संयुक्त चिकित्सा समितीची पुन्हा एकदा बैठक बोलावण्यात आली. मला माहिती अशी मिळाली की, या संयुक्त चिकित्सा समितीची आज विधानभवनात सकाळी 10.00 वा. बैठक झाली. या समितीचा मी एक सदस्य असतानाही मला या बैठकीचे निमंत्रण मिळाले नाही. अत्यंत महत्वाच्या अशा रोजगार हमी निधीचा वापर कसा करावा यासंदर्भातील हे विधेयक आहे आणि त्या विधेयकावरील संयुक्त चिकित्सा समितीचा मी एक सदस्य आहे. असे असतानाही मला आजच्या बैठकीचे निमंत्रण मिळाले नाही. माझ्या हक्कांचा भंग होत आहे असे मी याठिकाणी नमूद करु इच्छितो. याबाबतीत आपण योग्य ते निदेश द्यावेत अशी विनंती करतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी सुध्दा या समितीचा एक सदस्य आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांकडे झालेल्या चहापानाच्या वेळी या विधेयकाचा विषय मांडण्यात आला होता. अधिवेशन तोंडावर आले असताना आणि विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे असताना अशा पध्दतीने अध्यादेश काढणे ही हुकुमशाही आहे. मी समितीचा सदस्य असताना सुध्दा बैठकीचा निरोप मिळाला नाही. बैठक घेऊन निर्णय घेऊन टाकला आणि आता सभागृहात निर्णय थोपवायचा याला काही अर्थ राहिला नाही. सदनामध्ये सत्ताधारी पक्षाची मेजॉरिटी आहे. राज्यपाल नियुक्त सदस्य अजून यावयाचे आहेत. याबाबतीत शासनाने योग्य ती काळजी घ्यावी आणि खऱ्या अर्थाने हुकुमशाही पावले शासनाने टाकू नयेत म्हणून योग्य ती समज सरकारला आपण द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, संयुक्त चिकित्सा समिती सदनाच्या माध्यमातून नियुक्त केली जाते. कायदा तयार करीत असताना त्यावर साधक-बाधक विचार व्हावा त्याचप्रमाणे कायद्याच्या प्रत्येक टप्प्यातील भागाचा योग्य तो अर्थ निघून कायद्याचा त्रास होणार नाही आणि लोकांचे संरक्षण व्हावे अशी भूमिका त्यामागे असते. सर्वपक्षीय आमदारांच्या माध्यमातून ही समिती नियुक्त केलेली असते. अधिवेशन सुरु आहे. मंत्री उपलब्ध आहेत म्हणून मध्येच एखादी बैठक लावली जाते. माझी आपणांस विनंती आहे की, अधिवेशन सुरु असताना संयुक्त चिकित्सा समितीची कुठलीही बैठक बोलावली जाऊ नये. साधक-बाधक चर्चा करण्याची सन्माननीय सदस्यांना पूर्णत: मुभा असावी अशी मी विनंती करतो.

नंतर श्री. खर्चे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री. अरविंद सावंत, विनोद तावडे, दिवाकर रावते यांना संयुक्त चिकित्सा समितीच्या बैठकीचे निमंत्रण का देण्यात आले नाही यासंबंधीची चौकशी तातडीने करण्यात येईल व ज्यावेळी हे विधेयक सभागृहात चर्चेला येईल त्यावेळी या विधेयकासंबंधी आपण आपले विचार मांडावेत, अशी मी त्यांना विनंती करतो. तसेच सन्माननीय सदस्य या संयुक्त समितीचे सदस्य असतांना त्यांना बैठकीसाठी बोलाविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ती जबाबदारी पार पाडली नाही म्हणून संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, काल 4 वाजता सहकार कायद्यात दुरुस्ती करण्यासंबंधीच्या विधेयकावर संयुक्त समितीमध्ये चर्चा करण्यासाठी बैठक बोलाविण्यात आली होती परंतु सदर बैठकीचे निमंत्रण फक्त अर्धा तास अगोदरच आम्हाला मिळाले. म्हणून आमची विनंती आहे की, अधिवेशन काळात अशा प्रकारे संयुक्त चिकित्सा समितीच्या बैठका घेण्यात येऊ नयेत, असे निदेश आपण द्यावेत.

सभापती : आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंतराव पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : मला औचित्याच्या मुद्यावर बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. आज सकाळपासून बऱ्याच वेळा चर्चेच्या माध्यमातून नाशिकचा विषय येतो. मराठी कामगारांवर अन्याय होत असतांना इनोव्हा रबर प्रा.लि. आणि डेल्टा इलेस्टोमीटर्स प्रा.लि. या कंपनीमध्ये महाराष्ट्र समर्थ कामगार संघटनेचे चिटणीस आणि कॉंग्रेसचे माजी अध्यक्ष श्री. दिनकर पाटील यांच्या नेतृत्वाखाली उपोषण चालू आहे. त्या कामगारांना न्याय मिळवून देण्याचे काम चालू आहे. त्यांनी "दैनिक देशदूत" जे दैनिक गेल्या 37 वर्षांपासून अखंडपणे कार्यरत आहे त्या पेपरमध्ये, जिल्हाधिकाऱ्यांना संघटनेने दिलेल्या निवेदनाची जाहिरात 126 कामगारांनी सह्या करुन छापलेली आहे. या सह्यांचे निवेदन पेपरमध्ये छापले म्हणून काही गुंडांनी त्या ठिकाणी वर्तमानपत्राच्या कार्यालयावर अटॅक केला व या दैनिकाच्या कार्यालयाची संपूर्णपणे नासधूस केली. इतकेच नव्हे तर त्या ठिकाणी असलेली संपादकीय विभागातील कार्ड पंचिंग मशिन, टीबीएस आणि दूरध्वनीची मोडतोड केली व कार्यालयातील लोकांना धाकदपटशा दाखविला या प्रकाराबद्दल मी निषेध व्यक्त करतो आणि शासनाकडे अशी मागणी करतो की, लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या वृत्तपत्राच्या कार्यालयावर, प्रसार माध्यमावर अशा प्रकारचा अटॅक करणाऱ्या गुंडांना प्रमोशन देणे चुकीचे आहे. याबाबत आपण शासनाला निदेश द्यावेत व या घटनेची चौकशी करुन सभागृहाला निवेदन सादर करयास सांगावे. तसेच अटॅक करणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करावी. "देशदूत" सारख्या नामांकित वर्तमानपत्रात दिलेली दै. जाहिरात छापल्याबद्दल त्या कार्यालयावर अशा प्रकारचा अटॅक करणे चुकीचे आहे. म्हणून याबाबत शासनाला आपण निदेश द्यावेत.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. वसंतराव पवार यांनी मांडलेल्या मुद्याशी मी सहमत आहे. कारण अशा प्रकारचे हल्ले होणे हे गैरच आहे म्हणून शासनाच्या माध्यमातून अशा गुंडगिरीला ताबडतोब निर्बंध घालून उचित कारवाई होणे आवश्यक आहे. पण त्याचबरोबर मी असेही निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आपल्या मंत्रिमंडळातील एका मंत्री महोदयांनी देखील "झी टी.व्ही." वर हल्ला केला होता, मोडतोड केली होती, तोडफोड केली होती. त्यासंदर्भात शासनाने कोणती पावले उचलली, कोणत्या मंत्री महोदयांना अटक केली, याचाही उहापोह होणे आवश्यक आहे. कारण न्याय सर्वांनाच सारखा असला पाहिजे. झी टी.व्ही. च्या कार्यालयात जाऊन मोडतोड करणे आणि माझ्या संदर्भात प्रक्षेपण केले म्हणून हल्ला करणे, माझी बदनामी केली म्हणून तोडफोड करणे, असे काम करणारी व्यक्ती आपल्या सभागृहात बसलेली आहे, त्यासंबंधी देखील निषेध व्यक्त करावा, अशी माझी विनंती आहे.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

यानंतर श्री. जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव पंवार यांनी औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे परंतु या ठिकाणी मी एक गोष्ट विनम्रपणे सांगू इच्छितो की, मी यापुढे कोणतेही निर्देश देणार नाही. माझ्यावर जेव्हा निर्देश देण्याची जेव्हा वेळ येते तेव्हा सरकार काय करते हा प्रश्न तुमच्यासारखाच मलाही पडतो. त्यामुळे समजावयाचे त्यांनी समजून घ्यावे, त्यांनी योग्य ती कार्यवाही करावी एवढेच मी या निमित्ताने म्हणेन.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण आधी झुणका-भाकर केंद्राच्या संदर्भात जे निर्देश दिलेले आहेत त्या निर्देशाचे काय झाले आहे ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, या सदनामध्ये आपण घेतलेली भूमिका आम्हाला नेहमी आधारभूत वाटत आलेली आहे. या सदनातील सर्व सदस्यांच्या हक्काचे रक्षण करण्याची भूमिका आपण नेहमी घेत आलेला आहात त्यामुळे आम्हाला नेहमी आपल्या बद्दल आपुलकी वाटत आलेली आहे. सर्वसामान्य जनेतेच्या हिताचे प्रश्न या ठिकाणी आम्ही मांडीत असतो व त्यावर आपण जे निदेश देतात ते निदेश हे सरकार पाळत नाही हे आपल्या आताच्या बोलण्याने ध्वनित झालेले आहे, त्यामुळे आम्ही फार व्यथित झालेलो आहोत. अशा प्रकारे सरकार वागत असल्यामुळे सदनाचा अवमान, माननीय सभापतींच्या निर्देशाचा अवमान हा प्रश्न निर्माण होतो. पाच अधिवेशनापासून माननीय सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार साहेब झुणका भाकरीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करीत होते व त्या प्रश्नाला आम्ही सर्वांनी पाठिंबाही दिलेला होता. झुणका भाकरीच्या संदर्भात आपण ठाम निदेश सुध्दा दिले होते, या प्रश्नाच्या बाबतीत माननीय सभापतींच्या दालनात बैठक सुध्दा घेण्यात आली होती व त्यावेळी माननीय सभापतींनी सांगितले होते की, या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांना सांगतो, मंत्रीमंडळाच्या बैठकीत या विषयाच्या संदर्भात निर्णय घेऊ परंतु आजपर्यंत सुध्दा माननीय पीठासीन अधिका-यांनी जे निदेश दिले होते त्या निदेशांचा सन्मान झालेला नाही. झुणका भाकर केंद्राच्या निर्णयाच्या संदर्भात हजारो तरुण आज आपल्याकडे आतुरतेने वाट पहात आहेत. त्यामुळे आम्ही आपल्याकडून अशी अपेक्षा व्यक्त करतो की, माननीय सभापती महोदयांनी सर्वसामान्य, गोरगरीब जनेच्या हिताच्या संदर्भात जे निदेश दिलेले आहेत ते निदेश शासनाने तातडीने अंमलात आणावे व माननीय सभापती महोदयांचा सन्मान करावा अशी या निमित्ताने पुन्हा एकदा विनंती करतो.

....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

उपसभापती : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी निर्देशाच्या संदर्भात विचारणा केलेली आहे. मला आता पूर्ण खात्री आहे की, शेतक-यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात शासनाने जसा चांगला निर्णय घेतलेला आहे त्याच प्रमाणे झुणका-भाकर केंद्राच्या संदर्भात हे शासन निर्णय घेईल असा विश्वास व्यक्त करुया. यासंदर्भातील विश्वास शासनाने सार्थ करुन दाखवावा अशा प्रकारची आपण शासनाला विनंती करु या. लोकाभिमुख शासनाने शेतक-यांची कर्ज माफी केली त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. तसेच आता हे शासन झुणका-भाकर केंद्राच प्रश्न नक्की सोडवेल अशी या सदनाच्या वतीने मी आपल्याकडे अपेक्षा व्यक्त करतो. त्यावर आपण काही तरी बोलावे अशी विनंती करतो, निर्देश करीत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नागपूर येथील हिवाळी अधिवेशनातील कामकाज सल्लागार समितीमध्ये हा विषय निघाला असतांना त्यावेळी माननीय सभापती महोदयांनी असे सांगितले होते की, याबाबतीतील निर्णय ताबडतोब करा. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी असे कबूल केले होते की, ताबडतोब हा विषय कॅबिनेट पुढे आणून तातडीने निर्णय घेण्यात येईल. परंतु चार महिन्याचा कालावधी लोटून गेल्यानंतरही कॅबिनेटपुढे हा विषय आलेला नाही. त्यामुळे ठराविक कालावधीत, हे अधिवेशन संपण्याच्या आत कॅबिनेट समोर झुणका-भाकर केंद्राच्या संदर्भातील विषय आणून यासंदर्भातील निर्णय करावा.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला या गोष्टी मांडतांना अक्षरशः क्लेश होतो. आम्ही या सदनात येतो व आम्हाला पीठासीन अधिकारी सर्व मार्गदर्शन करतात व संपूर्ण सभागृहाचे नियमन करतात. आम्ही जो विषय मांडतो ते सुटावेत हा त्यामागील मुख्य उद्देश असतो. काही विषय आम्ही आग्रहाने मांडतो त्यावेळी आमच्या डोळयासमोर सर्वसाधारण जनता असते. आमचा त्यामध्ये व्यक्तिगत स्वार्थ काहीही नसतो. झुणका भाकरीचा प्रश्न सुध्दा असाच आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ...

या ठिकाणी निदेश देऊनसुध्दा ते प्रश्न सुटलेले गेलेले नाहीत. माननीय सभापतींनी आपल्या दालनात या संदर्भात बैठक घेंऊन हा प्रश्न नंतर सोडवितो असे सागितले होते. त्याप्रमाणे बैठक झाली परंतु ते प्रश्न सुटलेले नाहीत. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आताच नागपूरचा संदर्भ दिला आहे. तो प्रश्न सुध्दा तसाच आहे. सभापती महोदय, पीठासीन अधिकाऱ्याचे स्थान अत्यंत उच्च आहे. या स्थानावर कोणती व्यक्ती बसते हे महत्वाचे नाही. परंतु जी व्यक्ती या स्थानावर बसते तिचा सन्मान राखणे, त्यांनी जो निदेश दिलेला आहे त्याचे पालन करणे जसे आम्हा सन्माननीय सदस्यांचे काम आहे तसेच शासनाचे देखील काम आहे . शासनाने त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. पीठासीन अधिकाऱ्यांची जर अशा प्रकारे अवहेलना करण्यास शासनाने सुरुवात केली तर या सदनाचे काम चालविणे सदनातील कोणत्याही पीठासीन अधिकाऱ्याला कठीण जाईल. भविष्य काळात या पीठासीन अधिकाऱ्यांच्या पदाचा दर्जा कमी होत जाईल. तेव्हा असे घडता कामा नये आणि हे स्थान जसे पवित्र आहे तसेच राहिले पाहिजे. त्याचा मान आणि सन्मान राखला गेला पाहिजे. त्याचबरोबर येथून दिलेल्या निदेशाचे पालन सन्माननीय सदस्यांनी आणि शासनाने करावयालाच पाहिजे. माननीय सभापतींनी दिलेल्या निदेशाचे पालन केल्यामुळे हे सदन आणि लोकशाही अद्याप टिकून आहे. ज्या वेळी निदेशांचे पालन होणार नाही व त्यांचा अवमान व्हावयास लागेल त्या त्यावेळी लोकशाही धोक्यात येईल हे मला मुद्दाम आग्रहाने येथे सांगावयाचे आहे.सभापती महोदय, माझी शासनाला या निमित्ताने अशी विनंती आहे की, या पूर्वी जे निदेश दिले गेले आहेत त्या संदर्भातील हा विषय खरे म्हणजे मला माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत मांडावयाचा होता परंतु दुर्दैवाने माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाहीत त्यांच्या समोर हा विषय मांडून या विषयाची एकदा विल्हेवाट लावण्याची आवश्यकता आहे. अन्यथा पीठासीन अधिकाऱ्यांनी काम कसे करावयाचे, कोणते निदेश द्यावयाचे, कोणते निदेश द्यावयाचे नाहीत या बाबतीत एखादी नियमावली तयार तयार करु या. तसेच याबाबतीत कोडिफिकेशन करण्याची आवश्यकता आहे.तसे झाले तर या सदनाचे काम चालविणे अत्यंत कठीण होईल एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. पीठासीन अधिकाऱ्याच्या स्थानावरुन दिल्या गेलेल्या निदेशाचा मान राखला जावा. हे निदेश आपण दिलेले असोत किंवा माननीय सभापतींनी दिलेले असोत. त्या निदेशाचा मान, सन्मान राखला जावा आणि सन्माननीय सदस्यांना न्याय मिळावा एवढीच माझी आपल्याला या निमित्ताने विंनती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन देशमुख :सभापती महोदय, माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी उच्च स्थानावरुन दिलेल्या निदेशाचा अवमान व्हावा अशी सरकारची भूमिका नाही . परंतु त्या संदर्भात कारवाई करण्यामध्ये दिरंगाई झालेली आहे ही गोष्ट खरी आहे. हे मी नाकारत नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो मुद्दा कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सुध्दा उपस्थित झाला होता. या संदर्भात सरकारच्या वतीने जे आश्वासन दिले असेल किंवा आपणाकडून जे निदेश दिले गेले असतील त्या बाबतीत निश्चितपणे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल अणि लवकरात लवकर त्या बाबतीत निर्णय घेण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण त्या स्थानावर बसून जे निदेश देतात त्या निदेशाची सरकार अवहेलना करते. या ठिकाणी झुणका भाकर केन्द्राच्या संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला होता, श्री.आंधळकर नावाच्या पोलीस अधिकाऱ्याने आपल्याबद्दल दुसऱ्या व्यक्तीसमोर जे अपशब्द वापरले होते त्या प्रकरणी नागपूर अधिवेशनामध्ये पुष्कळ चर्चा झाली होती. त्या प्रकरणाचे पुढे काय झाले आहे ? हा विषय केवळ आपलाच आहे असे नाही. सभागृहातील उप सभापती या नात्याने तो आमच्या सन्मानाचा सुध्दा विषय आहे. त्या विषयाची या ठिकाणी सविस्तर चर्चा झाली असतांना तो अधिकारी पुन्हा कामावर रुजू झालेला आहे

एक सन्माननीय सदस्य : केवळ रुजू झाला नाही तर तो प्रमोट झाला आहे.

श्री विनोद तावडे : तो अधिकारी प्रमोट झाला आहे तेव्हा या संबंधातील वस्तुस्थिती काय आहे ?, या सदनातील सन्माननीय सदस्य, माननीय सभापती यांचा सन्मान शासन सांभाळते किंवा नाही हे आम्हाला समजले पाहिजे तसेच या प्रकरणातील वस्तुस्थिती आम्हाला समजली पाहिजे. माननीय उपसभापती महोदय, त्यावेळी आपण भावूक होऊन आपल्यावरील अन्यायाचा विषय या ठिकाणी अत्यंत तीव्रतेने मांडला होता तसेच आपण सर्व वस्तुस्थिती मांडली होती. या ठिकाणी आपण काहीही चुकीचे सांगितलेले नव्हते. परंतु या उपरही त्या बाबतीत शासन काही करीत नाही. मुख्य सचिवांनी प्रशासन "क" दर्जाचे आहे असे सांगितलेले आहे परंतु लोकप्रतिनिधीच्या संदर्भातील हा प्रकार केवळ "क" दर्जाचा नसून हा प्रकार तर "क" दर्जा पेक्षा खालच्या दर्जाचा आहे.त्याचबरोबर हा प्रकार लोकप्रतिनिधींचा अवमान कराणारा आहे. जे अधिकारी

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

लोकप्रतिनिधींचा अवमान करतात त्यांना पाठीशी घालणारे कोणी तरी सत्तेतील मंत्री असतील तेव्हा या संबंधातील वास्तव समोर आले पाहिजे असे मला वाटते. त्यामुळे हा विषय मी या ठिकाणी मांडला असून माननीय सभापतींचा, सन्माननीय सदस्यांचा सन्मान संसदीय कामकाज मंत्र्यांनी ठेवला पाहिजे आणि यातील वस्तुस्थिती आमच्या समोर आणली पाहिजे.

नतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी या सदनाला खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की, कोठल्याही परिस्थितीत आणि केव्हाही या सदनातील सदस्यांचा, माननीय सभापतींचा अवमान करावा अशी भूमिका सरकारची वा सरकारच्या वतीने कोणाचीही नाही. मात्र याबाबतीत येथे असा मुद्दा उपस्थित केला गेला की, मागील अधिवेशनात उपस्थित झालेल्या मुद्यासंधात काय झाले आहे? तर मी आपल्याला सांगू इच्छितो की, निश्चितपणे त्याबाबत गृह विभागाच्या माध्यमातून त्या विषयीची माहिती सभागृहाला दिली जाईल. तेव्हा त्याबाबतीत या सदनाचा किंवा कोणाही सदस्यांचा अवमान होईल असे कोणतेही कृत्य वा कारवाई सरकारकडून केली जाणार नाही याची मी आपणास खात्री देऊ इच्छितो.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, असे असेल तर मी आपल्याकडे एकच मागणी करतो की, या सभागृहाच्या माध्यमातून सभापती आसनावरून दिलेल्या निदेशांबाबतचा अनुपालन अहवाल माननीय संसदीय कार्य मंत्री सभागृहाला सादर करतील का ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, असे असेल तर त्याबाबतीत सदस्यांनी येथे मांडलेल्या मुद्यांचेदेखील विश्लेषण करावे लागेल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांचे असे बोलणे अत्यंत गंभीर आहे. यामुळे आपल्यावरही आक्षेप निर्माण झालेला आहे ....

(काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात .... अडथळा ....)

उपसभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण प्रथमत: माझे म्हणणे ऐकून घ्यावे.... कृपया आपण सर्वांनी शांत व्हावे. ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय काय म्हणाले ते आपण पहा. त्यांची ही दादागिरीच झाली ....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी त्यांचे शब्द मागे घेतले पाहिजेत. ..

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी येथे जे काही म्हटले त्याचा कृपया आपण वेगळा अर्थ घेऊ नये. ...

उपसभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा प्रश्न माझ्याशी संबंधित असल्याने या ठिकाणी मी हे सभागृह 5 मिनिटांसाठी स्थगित करतो.

सभागृहाची बैठक 2.16 वाजता 5 मिनिटांसाठी स्थगित झाली.

(यानंतर श्री. सरफरे ....सीसी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

औचित्याच्या मुद्दयासंबंधी

सभापती : या सभागृहामध्ये सन्माननीय उपसभापती यांच्या अनुषंगाने सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि दोन्ही बाजूकडील अन्य सन्माननीय सदस्यांनी एका पोलीस अधिकाऱ्याच्या संदर्भात घडलेल्या प्रकारासंबंधी अत्यंत तीव्रतेने याठिकाणी चर्चा उपस्थित केली. सन्माननीय उपसभापतींचा अवमान होईल अशी एखादी गोष्ट होणे म्हणजे पर्यायाने या सभागृहाचा सुध्दा तो अवमान आहे. त्यादृष्टीने सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे अत्यंत गांभीर्याने याठिकाणी मांडले आहे. आज याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी त्या संदर्भात शासनाकडून कोणती अचूक कारवाई झाली आहे? यासंबंधीचा मुद्दा याठिकाणी उपस्थित केला. त्यांनी उपस्थित केलेला मुद्दा बरोबर आहे. या सभागृहामध्ये सन्माननीय विरोधी पक्षनेते व अन्य सन्माननीय सदस्य हे ज्यावेळी पीठासीन अधिकाऱ्यांच्या संदर्भात एखादी गैर गोष्ट घडते व त्यासंबंधी या सभागृहामध्ये अत्यंत तीव्रतेने आपले म्हणणे मांडतात त्यावेळी त्या प्रकाराची तेवढयाच गांभीर्याने शासनाकडून नोंद घेऊन कारवाई होणे गरजेचे आहे. त्याकरिता सन्माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांना मी सूचना करतो की, सन्माननीय उपसभापती श्री. वसंत डावखरे यांच्या बाबतीत घडलेल्या प्रकारासंबंधी सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना सभागृहामध्ये व्यक्त केल्या आहेत त्या संबंधी शासनाने कोणकोणती कारवाई केली आहे? त्या संदर्भात सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना आपण विदित करावे अशी यानिमित्ताने सूचना करतो.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, होय.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : अध्यक्ष महाराज, आणखी एक गोष्ट आहे. मघाशी माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी असे वक्तव्य केले आहे की, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा देखील उहापोह करणे आवश्यक आहे. हे वाक्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात यावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : अध्यक्ष महाराज, मी असे म्हटले आहे की, यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे विश्लेषण आणि माझे म्हणणे . . . .परंतु सन्माननीय सदस्यांचा अवमान करण्याचा माझा उद्देश नाही. सन्माननीय सदस्यांनी कोणताही मुद्दा उपस्थित केला तर त्याची नोंद होते आणि संसदीय कार्यमंत्री म्हणून माझी ती जबाबदारीच आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महाराज, हे जरा जास्तच झाले. खरे म्हणजे मी बोलणार नव्हतो पण . . . .

सभापती : मी रेकॉर्डवरील माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांचे वक्तव्य पाहतो. ते अचूक असेल तर रेकॉर्डवर ठेवतो आणि अचूक नसेल तर रेकॉर्डवरुन काढून टाकतो.

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महाराज, आपण माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांना समज द्यावी.

. . . .2 डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कांदा उत्पादक शेतकऱ्यांना योग्य हमीभाव देण्याची आवश्यकता.

मु.शी.: कांदा उत्पादक शेतकऱ्यांना योग्य हमीभाव देण्याची आवश्यकता यासंबंधी श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : अध्यक्ष महाराज, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पणन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"संपूर्ण राज्यात जानेवारी-फेब्रुवारी, 2008 मध्ये कांद्याचे मोठया प्रमाणात झालेले उत्पादन, त्याचरोबर रेल्वेकडून इतर राज्यात व निर्यातीकरिता कांदा पाठविण्यासाठी पुरविलेले अत्यल्प माल वाहतूक डबे, परिणामी राज्यात मोठया प्रमाणात झालेली कांद्याची साठवण, त्यामुळे शेतकऱ्यांच्या कांद्याचे गडगडलेले भाव, तसेच व्यापारी व दलाल यांचेकडून कांदा खरेदी करताना शेतकऱ्यांची होत असलेली पिळवणूक, परिणामी शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे झालेले आर्थिक नुकसान, यामुळे राज्यातील चिंताग्रस्त झालेला शेतकरी, याबाबत साकल्याने विचार करुन शासनाने कांद्यास योग्य हमीभाव देण्याची आवश्यकता, तसेच ज्या शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, त्यांना तात्काळ एकरी रु.20,000 अनुदान देण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची आवश्यक ती कारवाई व शासनाची भूमिका."

श्री.हर्षवर्धन पाटील (पणन मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .2 डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(**सभापतीस्थानी - मा. उप सभापती**)

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : अध्यक्ष महाराज, दरवर्षी अधिवेशनामध्ये शेती आणि शेतीच्या संबंधातील प्रश्नांबात चर्चा होत असताना कांद्याच्या संबंधात चर्चा झालेली नाही असे क्वचितच झाले असेल. म्हणून मी अगदी मोजक्याच शब्दात बोलणार आहे. राज्य शासनाने कांद्याच्या धोरणाच्या अतिशय योग्यरितीने काम केलेले असले तरी देखील सातत्याने आजही हा प्रश्न सर्वांना भेडसावत आहे आणि खास करुन शेतकऱ्यांना हा प्रश्न जास्त भेडसावत आहे. म्हणून मला शासनाला विनंती करावयाची आहे की, कांद्याच्या निर्यात धोरणाबाबत सातत्य असले पाहिजे. जेव्हा कांद्याचे दर उत्पादन खर्चापेक्षा कमी होतात, तेव्हा शेतकऱ्यांना फार मोठा तोटा सहन करावा लागतो. अवेळी पडणारा पाऊस, दुष्काळ इ.सर्व गोष्टी लक्षात घेता शासनाने कांद्याची बेस प्राईज ठरविली पाहिजे.शासनाने 3 रुपये 50 पैसे प्रति किलो अशी प्राईज ठरविलेली आहे. परंतु आता मात्र 50 पैसे प्रति किलो अनुदान दिलेले आहे. शासनाने 3 रुपये 50 पैसे बेस प्राईज ठरविलेली असताना देखील अनुदान कमी मिळत आहे. अशा प्रकारची विसंगती असता कामा नये. आज राज्यात जवळपास 18 लाख मे.टन कांद्याचे उत्पादन झालेले आहे. त्यातील 5 लाख मे.टन कांद्याचा वापर राज्यामध्ये केला आणि उरलेला 13 लाख मे.टन कांदा परदेशामध्ये पाठविण्याच्या बाबतीत शासनाच्या माध्यमातून व्यवस्था झालेली आहे. पण यासाठी सुरुवातीलाच म्हणजे जानेवारी-फेब्रुवारी महिन्यामध्येच रेल्वेच्या वाघिणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याची गरज आहे आणि त्यासंदर्भात शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत केंद्र शासन, नाबाड यांच्याशी चर्चा करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाला मध्यस्थाची भूमिका घेता येईल. तसेच शासनाने याबाबतीत देखील विचार केला पाहिजे की, सर्वसामान्य जनतेला लागणारा कांदा आणि हॉटेल मध्ये वापरला जाणारा कांदा, याच्या किंमतीमध्ये फरक करता येईल का ? सर्वसामान्य जनतेला लागणाऱ्या कांद्याची किंमत वेगळी आणि हॉटेलमध्ये वापरला जाणारा कांद्यांची किंमत फार वेगळी ठेवता येणार नाही, परंतु याबाबतीत विचार करण्यात यावा अशी मी विनंती करतो. तसेच कांदा उत्पादक शेतकरी ते ग्राहक यामध्ये जवळपास 7-8 टप्पे आहेत. यामध्ये अडते, मार्केट कमिटया, मुंबई मार्केट कमिटी, व्यापारी, दलाल आणि मग ग्राहक असे टप्पे आहेत. हे टप्पे कमी करता आले तर शेतकऱ्यांना निश्चितपणे चांगला दर मिळू शकेल. पण सध्या ग्राहकांना द्यावा लागणारा दर आणि शेतकऱ्यांना मिळणारा दर यामध्ये फार मोठी तफावत दिसून येते.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, मला शेवटी अशी विनंती करावयाची आहे की, मार्केट कमिटी लेव्हलपर्यंत किंवा त्याच्या खालच्या लेव्हलपर्यंत संस्थांच्या माध्यमातून, सरकारच्या माध्यमातून बाजारभाव देण्याची व्यवस्था केली जात आहे. याबाबतीत फार पुढचे नियोजन करता येणार नाही पण किमान एक-दोन वर्षात महाराष्ट्रात काद्यांचे उत्पादन किती होऊ शकेल, काद्यांची गरज किती आहे? पर राज्यात आणि परदेशात काद्यांची निर्यात किती करावी लागेल? याचा विचार करुन जर शासनाने सगळी नैसर्गिक परिस्थिती आणि बाजारभाव लक्षात घेऊन, कांद्याचे उत्पादन कमी होणार असेल आणि भाव चांगला मिळणार असेल तर हरकत नाही. पण उत्पादन जास्त होऊन भाव उतरणार असतील तर त्याच दिवशी कांद्याचा बाजारभाव ठरवून शेतक-यांना त्याच दिवशी सबसिडी दिली तर ख-या अर्थाने शेतक-यांना मदत मिळेल. कांद्याचे बाजारभाव कमी झाल्यानंतर शेतक-यांना रास्त दर मिळत नाही म्हणून शेतकरी कर्ज बाजारी होतात. त्यानंतर त्या शेतक-यांना कर्ज देण्यात येते किंवा मदत दिली जाते. अशा पध्दतीने शेतक-यांना नंतर मदत देण्याऐवजी पहिल्यांदाच मदत देता आली तर निश्चितप्रकारे शेतक-यांना त्याचा लाभ मिळेल, अशी माझी सूचना आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी या ठिकाणी दोन-तीन मुद्दे उपस्थित केले आहेत. उत्पादक ते ग्राहक ही संकल्पना ज्याला आपण डायरेक्ट मार्केटिंग म्हणतो ती नव्या मॉडेल ॲक्टमध्ये स्वीकारलेली आहे. महाराष्ट्रात जवळपास 43 लायसन्स डायरेक्ट मार्केटिंगच्याबाबतीत दिलेले आहेत. त्यामध्ये ख-या अर्थाने मधल्या दलालाची अडचण आहे. या मधल्या दलालामुळे शेतक-यांना भाव मिळत नाही आणि ग्राहकांनाही वाढीव दराने कांदा खरेदी करावा लागतो. म्हणून उत्पदक ते ग्राहकांची संकल्पना शासनाने स्वीकारलेली आहे. सगळयात मोठी अडचण अशी आहे की, दर वर्षी खरीप हंगामामध्ये कांदा येतो. साधरणत:जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च पर्यंतच्या अडीच महिन्यांचा गेल्या पंधरा वर्षांचा इतिहास आपण पाहिला तर याच अडीच महिन्यात काद्यांच्या भावाची घसरण सातत्याने होते आणि त्याचा दुष्परिणाम या राज्यातील लाखो शेतक-यांना भोगावा लागतो असे दिसून येते. म्हणून याबाबतीत कांदा तदर्थ समितीच्या वतीने एक दीर्घकालीन उपाययोजना तयार केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील यांची सूचना रास्त आहे. किमान दोन वर्षांचा आराखडा शासनाने तयार करावा असे आपण म्हटलेले आहे. याबाबतीत माझ्या विभागाची तयारी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. येत्या दोन वर्षांचा आराखडा तयार करण्यात येईल. दर वर्षी साधारणत: 18 ते 20 लाख मे.टन कांद्याचे उत्पादन होते. त्यापैकी रब्बी व खरीप हंगामातील कांद्याच्या भावाची वर्गवारी पाहिली तर असे लक्षात येते की, रब्बीमध्ये भाव ब-यापैकी असतात पण खरीप हंगामात कांद्याचे भाव कमी होतात. खरीप हंगामात कांद्याचे भाव कमी होण्याची दोन कारणे आहेत. त्याबाबतचा शासनाने अभ्यास केलेला आहे. यासंदर्भात काही सन्माननीय सदस्यांची समिती गठीत केली होती. विशेषत: किपिंग क्वालिटी ज्याला आपण खरीप हंगामामधील काद्यांचा लाईफ सेल म्हणतो तो जास्त काळ टीकत नाही. म्हणून एनएचआरडीएफच्या माध्यमातून काही संशोधन, प्रक्रिया करणारे उद्योग आणि मिनिमम सपोर्ट प्राईसच्या बाबतीतील एक विषय आहे. यासंदर्भात राज्य शासनाने केंद्र शासनाला विनंती केली आहे. आज कापसाला हमीभाव देण्यात येतो. दुधाला हमीभाव देण्यात येतो. साखरेला एसएमपी देण्यात येतो. म्हणून काद्यांच्या बाबतीत किमान पाच रुपये हमीभाव देण्याच्या संदर्भातील निर्णय घेणे गरजेचे आहे. सरकारची याबाबतीत प्रामाणिक भूमिका आहे. महाराष्ट्रातील 22 जिल्हयांमध्ये कांद्याचे उत्पादन घेतले जात आहे.

याठिकाणी दुसरा एक मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. साधारणत: डायरेक्ट लायसेन्ससाठी शेतक-यांच्या काही संस्था पुढे येत असतील तर मुंबईमध्ये सुध्दा त्यांना डायरेक्ट लायसेन्स देण्याचा शासनाचा विचार आहे. डायरेक्ट लायसेन्स देण्याच्या संदर्भात जे सात-आठ टप्पे आहेत ते कसे कमी करता येतील आणि शेतक-याचा माल डायरेक्ट मार्केटिंगमध्ये कसा आणता येईल या दृष्टीने निर्णय घेण्यात येईल. मुंबईमध्ये 66 कन्झुमर्स स्टोअर्स आहेत. त्याठिकाणी डायरेक्ट विक्रीकरिता परवानगी द्यावी, अशा प्रकारचे शेतक-यांच्या काही संस्थांचे अर्ज शासनाकडे आलेले आहेत. याबाबतीतील निर्णय सरकारच्या माध्यमातून लवकरच घेण्यात येईल. जानेवारी आणि फेब्रुवारी या दोन महिन्यात ज्या शेतक-यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा दिला असेल अशा शेतक-यांच्या कांद्याला प्रती क्विन्टल 50 रुपयाप्रमाणे रोख अनुदान देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. परंतु याबबातची सगळी तपासणी केल्यानंतरच शेतक-यांना चेकने हे अनुदान देण्यात येणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेल्या उत्तरात स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की,. 'दोन महिन्यातच कांदा येतो आणि त्याचवेळेस रेल्वेच्या वॅगन्स मिळाल्या नाहीत, त्यामुळे कांदा तसाच पडून राहिला आणि सडला व कांद्याचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे' सभापती महोदय, विदर्भात कापूस हे कॅश क्रॉप आहे. तसे महाराष्ट्रातील 20 ते 22 जिल्हयामध्ये कांदा हे कॅश-क्रॉप आहे.

यानंतर श्री. बरवड.... . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख .....

हे जिरायती भागातील पीक आहे. लहान शेतकरी कांद्याची शेती करतात. म्हणून यामध्ये पुढच्या दोन तीन वर्षाचे नियोजन महत्वाचे ठरणार आहे. कांद्याचे भाव एकदम कोसळल्यामुळे शेतकरी कांदा विकावयास जातो आणि बारदाण घेऊन परत जातो अशी परिस्थिती आहे. आपण दोन तीन वर्षाचे काय नियोजन करावयाचे आहे ते करावे परंतु आता 50 रुपये प्रती क्विंटल जे अनुदान दिलेले आहे त्यामध्ये वाढ करावी अशा प्रकारची आग्रहाची विनंती मी माननीय मंत्रिमहोदयांना करीत आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, भाव कोसळण्याच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी सांगितले. यामध्ये रेल्वे वॅगन्सचा मुद्दा उपस्थित झाला होता. त्या काळात लासलगाव, निफाड, मनमाड या परिसरात ती अडचण निर्माण झाली होती. त्यावेळी आम्ही रेल्वे विभागाकडे पाठपुरावा केला. त्यामध्ये माननीय केंद्रीय कृषी मंत्र्यांनी पाठपुरावा केला. आम्ही केंद्रीय रेल्वे मंत्र्यांना भेटलो. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील पाठपुरावा केला. आमदार सुध्दा त्या ठिकाणी भेटले. रेल्वे वॅगन्सच्या बाबतीत अे, बी, सी, डी अशा कॅटेगरीज आहेत. "अे" कॅटेगरी मिल्ट्रीसाठी राखीव आहे. "बी" कॅटेगरीमध्ये वाहतुकीच्या प्रायोरिटीमध्ये कांदा असावा याबाबत रेल्वे विभागाने कांदा "डी" कॅटेगरीमधून "बी" कॅटेगरीमध्ये घेण्याचे मान्य केले आहे. त्यामुळे प्रथम प्राधान्याने रेल्वे वॅगन्स उपलब्ध करुन देण्यास त्यांनी मान्यता दिलेली आहे. शासनाने क्विंटलला 50 रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे. हे करीत असताना मंत्रिमंडळामध्ये याबाबत विस्ताराने चर्चा केली. जानेवारी, फेब्रुवारी महिन्यामध्ये जो भाव कमी झाला त्या भावातील जो फरक आहे तो काढून आम्ही 50 रुपयांचा निर्णय घेतलेला आहे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, इतर कोणत्याही शेतीमालापेक्षा कांद्यात होणारी तेजी-मंदी फार मोठया प्रमाणावर असते. कारण कांदा नाशवंत आहे. दीर्घकालीन दृष्टीकोनातून कांद्याचे डिहायड्रेशन करण्याचे प्रक्रिया उद्योग सहकार क्षेत्रात आणि खाजगी क्षेत्रात जास्तीत जास्त निर्माण व्हावेत तसेच जे अनुदान देतो त्यासंबंधीचा प्रश्न सोडविण्यासंबंधी शासन विचार करील काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, प्रक्रिया उद्योगासाठी एकास नऊ असे धोरण आपण घोषित केलेले आहे. कांद्याचे डिहायड्रेशन करणे हा नवा दृष्टीकोन आहे तसेच ओनियन पावडर हा विषय सुध्दा घेतलेला आहे. असे दोन प्रस्ताव प्रायोगिक तत्वावर महाराष्ट्रामध्ये सुरु करणार आहोत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कांद्याच्या बाबतीतील प्रत्येक अधिवेशनातील उत्तरे माननीय मंत्रिमहोदयांनी तपासून पहावीत. आपण प्रत्येक अधिवेशनामध्ये कांद्याच्या संदर्भात शेतकऱ्यांची कशी दिशाभूल करीत आहोत हे त्यांच्याच लक्षात येईल. सुरुवातीला या ठिकाणी कांद्याचे कौतुक करीत बसले. कांद्याच्या चाळी, शेतकऱ्यांना सांभाळणे वगैरे बाबत घोषणा झाल्या. कांद्याच्या अनुदानाच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी जे सांगितले ते अयोग्य आहे. या सदनामध्ये शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय व्हावा अशी या सभागृहाची अपेक्षा आहे. नेहमी केंद्राकडे बोट दाखविण्याची सवय झालेली आहे. कापूस एकाधिकार योजनेचे तीनतेरा वाजवले त्याची चर्चा आपण करता. शासनाने जाहीर केल्याप्रमाणे शेतकऱ्याचा कांद्याचा उत्पादन खर्च प्रती किलो साडेतीन रुपये असेल आणि त्याला आपण 50 पैसे अनुदान देत असाल तर या सदनाची अशी मागणी आहे की, केंद्र शासन ज्यावेळी निर्णय घ्यावयाचा त्यावेळी घेईल परंतु आपण 50 रुपये देण्याबाबत जे म्हणत आहात त्यामध्ये तातडीने काही वाढवून द्यावेत आणि त्याची घोषणा आज अपेक्षित आहे. हे शासन शेतकऱ्यांची काही जबाबदारी घेणार आहे की नाही ? या सदनामध्ये मागच्या अधिवेशनामध्ये पेढे वाटावेत अशी घोषणा केली. शेतकऱ्यांचा कांदा शेतकरी थेट शहरामध्ये विक्रीला आणणार अशी घोषणा केली. आता आणखी काही तरी सांगत आहेत. दुसऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणणाऱ्या कांद्याच्या उत्पादकांच्या डोळ्यात आज अश्रू निर्माण झालेले आहेत अशी परिस्थिती आहे. आज आपल्याकडून आम्हाला महाराष्ट्र शासनाचा निर्णय पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

50 रुपये प्रती क्विंटलला अनुदान देण्याचे शासनाने जाहीर केले आहे त्यामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीकोनातून निर्णय घ्यावा. केंद्र सरकारला काय निर्णय घ्यावयाचा असेल तो घेईल. या अधिवेशनाची आता कोठे सुरुवात झालेली आहे. शेतकरी वणवण फिरत आहेत, ते कधी दिसत नाहीत. आपण मात्र दिसता. शेतक-यांना द्यावयाच्या अनुदानात वाढ केली तर शासनाला शेतक-यांबद्दल कळवळा आहे ते दिसून येईल.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, निर्णय करीत असताना शेतक-यांसाठी निर्णय घेतले जातात, कोणाला दिसले पाहिजे यादृष्टीने निर्णय घेतला जात नाही. शासनाने 50 रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे त्यासाठी शासनाला 80 कोटी रुपये लागणार आहेत आणि हा खर्च राज्य सरकार करणार आहे. यामध्ये केंद्र सरकारचा संबंध नाही. कांदा उत्पादक शेतक-यांना हे अनुदान महाराष्ट्र सरकारच देणार आहे. कांद्याच्या चाळींच्या माध्यमातून शासनाने 4 लाख मे.टन कांदा ठेवण्याची व्यवस्था केलेली आहे. राज्यातून 80 टक्के कांदा निर्यात केला जात असून आतापर्यंत 7 लाख मे.टन कांद्याची निर्यात झालेली आहे. शासनाने कांदा उत्पादक शेतक-यांना 50 रुपये प्रती क्विंटल अनुदान देण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी शासन 80 कोटींची व्यवस्था करणार आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शासनाने प्रती क्विंटल 50 रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु शासनाने यापूर्वी शेतक-यांसाठी जाहीर केलेले अनुदान कृषी खात्याकडे वर्ग केलेले आहे, ते शेतक-यांपर्यंत पोहोचले आहे काय ? माननीय मंत्रिमहोदयांनी आंबा उत्पादक शेतक-यांसाठी जाहीर केलेले अनुदान प्रत्यक्षात शेतक-यांपर्यंत पोहोचलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. आता या कांदा उत्पादक शेतक-यांसाठी जाहीर केलेले अनुदान जलद गतीने पोहोचण्यासाठी शासन तातडीने कार्यवाही करील काय ? रायगड जिल्हयातील आंबा उत्पादक शेतक-यांचे 4.5 कोटी रुपये रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेत पडून आहेत. हे पैसे शेतक-यांपर्यंत पोहोचलेले नाहीत. कांदा उत्पादक शेतक-यांगबाबत त्याची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी शासन घेईल काय ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : शासनाने या शेतक-यांना अनुदान देण्यासंबंधी निर्णय घेतलेला आहे आणि त्याची तातडीने अंमलबजावणी केली जाईल. या शेतक-यांना चेकने पैसे दिले जातील. माननीय सदस्यांनी आता आंबा उत्पादक शेतक-यांसंबंधीचा प्रश्न उपस्थित केला आहे.....

श्री.दिवाकर रावते : कांदा निर्यातीचा भाव काय होता आणि शेतक-यांना काय भाव मिळाला ते शासनाने जाहीर करावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : शासनाने 50 रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे. शासनाने जानेवारी महिन्यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विकला गेलेल्या दराची सरासरी काढली आहे...

श्री.अरविंद सावंत : मंत्रिमहोदय मघापासून तेच सांगत आहेत. दरामध्ये जो 50 रुपये फरक गृहित धरला आहे तो कशाच्या आधारे काढण्यात आला आहे ? वस्तुस्थिती ही आहे की, त्यावेळी 30 रुपयांपासून 50 रुपयांपर्यंत कांदा विकला गेला होता.

श्री.हर्षवर्धन पाटील : दिनांक 1.1.2008 ते 31.1.2008 पर्यंत जवळजवळ 20-22 कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये लिलाव झालेला आहे. त्या बाजार समित्यांच्या प्रत्येक दिवसाच्या लिलावाची माहिती मी पटलावर ठेवू शकतो.

उपसभापती : पटलावर माहिती ठेवावी.

श्री.हर्षवर्धन पाटील : जानेवारी, 2008 मध्ये साधारणपणे 316 रुपये सरासरी दर आलेला आहे. काही कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये 270 रुपये तर काही कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये 375 रुपये दर आला आहे. या दरांचा सरासरी दर 316 रुपये आला आहे. फेब्रुवारी, 2008 मध्ये 270 रुपये आणि दिनांक 1.3.2008 ते दिनांक 10.3.2008 पर्यंतचा सरासरी दर 310 रुपये आलेला आहे. माननीय सदस्य म्हणत आहेत की, 50 रुपये दराने कांदा विकला गेला आहे. परंतु मागील दोन महिन्यांमध्ये 316 रुपये सरासरी दर आलेला आहे.

नंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. हर्षवर्धन देशमुख ...

फेब्रुवारी महिन्यामध्ये 270रुपये सरासरी दर आला आहे. ज्या दराने शेतक-यांनी कांदा दिलेला आहे ते दर माझ्याकडे आहेत. त्याप्रमाणे दरामध्ये घसरण झाली म्हणून त्यांना अतिरिक्त 50 रुपये मदत देण्यात आलेली आहे. भावामध्ये तफावत निर्माण झाल्यामुळे, भाव घसरल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आले. त्यामुळे अशा शेतक-यांना मदत म्हणून 80 कोटी रुपये देणार आहोत.

श्री. पांडुरंग फुंडकर : मंत्री महोदयांनी कांद्याच्या भावाचे जानेवारी, फेबुवारी आणि मार्च महिन्यातील सरासरी दर सांगितले. ज्याप्रमाणे कापसाला आणि दुधाला हमी भाव मिळतो त्याप्रमाणे कांद्याला देखील 500 रु. हमीभाव केन्द्र सरकारने जाहीर करावा अशा प्रकारचे वक्तव्य माननीय मंत्री महोदयांनी केलेले आहे. असे असताना आता त्यांनी कांद्याचे सरासरी भाव 270 रु. ते 300 रु. असल्याचे सांगितले. 4 लाख मे.टन कांदा परदेशात निर्यात केलेला आहे. हा कांदा परदेशामध्ये शेतक-यांनी निर्यात केला की दलालांनी निर्यात केला ? परदेशात निर्यात केलेल्या कांद्याचा भाव काय होता ? माननीय मंत्री महोदयांनी हेही कबूल केलेले आहे की, महाराष्ट्रामध्ये 22 जिल्ह्यात कांद्याचे उत्पादन होते. आता 60 हजार कोटीचे कर्ज माफ करुन आपण महाराष्ट्रभर ढोल बडवित आहात. या कांदा उत्पादक शेतक-या क्विंटला फक्त 50 रु., म्हणजे किलोला 50 पैसे अशा प्रकारची मदत करुन त्यांच्या तोंडावर हा मदतीचा तुकडा फेकलेला आहे. हे अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. तेव्हा कांदा उत्पादक शेतक-याला ही जी 50 रु. मदत देण्यात येणार आहे त्याचा आपण फेरविचार करुन कांदा उत्पादक शेतक-याला न्याय देणार आहात काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी कांदा निर्यातीचा मुद्दा उपस्थित केला. निर्यातीसाठी 26-27 एजन्सीज फायनल केलेल्या आहेत. त्यामध्ये नाफेड आहे आणि काही शेतक-यांच्या आणि काही व्यापा-यांच्या संस्था आहेत. 35 मि.मी. पेक्षा आकाराने मोठा असलेला कांदा निर्यात केला जातो आणि 35 मि.मी. पेक्षा आकाराने लहान असलेला कांदा डोमेस्टिक मार्केटमध्ये विकला जातो. निर्यातीचा भाव कधी 4.50 रु. तर कधी 5 रु. या प्रमाणे क्वालिटीवर अवलंबून असतो. कांद्याचे ग्रेडेशन केले जाते. 35 मि.मी. पेक्षा लहान आकाराचा कांदा निर्यात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. हर्षवर्धन पाटील.....)

करण्यासाठी घेतला जात नाही. मध्यंतरी केन्द्र सरकारने इपीएम रेट जास्त केला होता. हा रेट 250 डॉलर इतका होता. तो रेट आता 70 डॉलर इतका केलेला आहे. हा रेट कमी केल्यामुळे निर्यातीला वाव मिळालेला आहे. मध्यंतरीच्या काळात अत्यावश्यक सेवेमध्ये कांद्याचा अंतर्भाव केलेला होता. कांद्यावरील निर्यात बंदी आपण उठविलेली आहे. डोमेस्टिक मार्केट, एक्स्पोर्ट मार्केट, कंझ्युमर मार्केट अशा पध्दतीने ही मार्केट सिस्टिम आहे. कांदा हा नाशवंत पदार्थ आहे. 500 रु. हमी भाव मिळाला पाहिजे अशा पध्दतीने वर्कआऊट केलेले आहे. काही वेळा डिसेंबरमध्ये 900 रु.भाव होता तर सप्टेंबर तो 2200 रु. इतका होता. कांद्याच्या भावातील चढ-उताराची आपणास कल्पना आहे. ...

श्री. पांडुरंग फुंडकर : कांद्याला 900 ते 2200 रु. भाव होता असे मंत्री महोदयांनी सांगितले. शेतक-याच्या मालाची अवस्था अशी असते की, जेव्हा शेतातून माल शेतक-याच्या घरामध्ये येतो त्यावेळी त्या मालाचे भाव घसरतात आणि त्याचा साठा केला जातो.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MMP/ 14:50

श्री. पांडुरंग फुंडकर...

कांदा उत्पादक शेतक-यांना शासनाने प्रति क्विंटल 50 रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे तो योग्य नाही असे आमचे स्पष्ट मत आहे. कांदा उत्पादक शेतक-यांना प्रति क्विंटल किमान 100 रुपये अनुदान देण्यात यावे अशी आमची मागणी आहे. 50 रुपये अनुदानाची रक्कम शासनाला न शोभणारी आहे. म्हणून कांदा उत्पादक शेतक-यांना प्रति क्विंटल 100 रुपये अनुदान देण्यात यावे अशी आमची पुन:श्च मागणी आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : या ठिकाणी कांदा साठवणुकीच्या बाबतीत सांगितले गेले. कांदा साठवणूक करण्यासाठी चाळीची योजना कांदा उत्पादक शेतक-यांसाठी सुरु केलेली आहे. कांदा उत्पादक शेतकरी काद्यांचे उत्पादन घेतल्यानंतर तो कांदा ते चाळीत साठवून ठेवतात. ज्यावेळी मार्केटमध्ये कांद्याला चांगला दर असतो, त्यावेळी कांदा उत्पादक शेतकरी आपला माल मार्केटमध्ये विक्री करण्यासाठी आणतात. परंतु कांदा उत्पादक शेतक-यांच्या सर्व अडचणींचा विचार करुनच प्रति क्विंटल 50 रुपये अनुदान देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

(विरोधी पक्ष सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर : कांदा उत्पादक शेतक-यांना प्रति क्विंटल 100 रुपये अनुदान शासनाकडून दिले जात नसल्यामुळे आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे सदस्य सभात्याग करतात.)

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मच्छिमार बांधवांना दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करणेबाबत
मु.शी. : मच्छिमार बांधवांना दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करणेबाबत या विषयासंबंधी सर्वश्री संजय दत्त, गोविंदराव आदिक, यशवंतराव गडाख, सय्यद जामा, शरद रणपिसे, प्रतापसिंह मोहिते-पाटील, राजन तेली, जैनुद्दीन जव्हेरी, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, संजय केळकर, परशुराम उपरकर, डॉ.दीपक सावंत, ॲड.अनिल परब, सर्वश्री अरुण गुजराथी, रणजितसिंह मोहिते-पाटील, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, भास्कर जाधव, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" महाराष्ट्राला कोकण समुद्र किनारपट्टी मुंबईपर्यंत लाभली असणे, दर्याराजा म्हणून संबोधण्यात येणारा कोळीबांधव मागील कित्येक पिढयांपासून मत्स्यव्यवसाय करीत असणे, परंतु सद्य:स्थितीत सदर किनारपट्टीवर मच्छिमारांना मच्छी न मिळणे आणि हा व्यवसाय निर्माण नेस्तनाबूत होण्याच्या मार्गावर येत असणे, त्यामुळे कोळी कुटुंबात निर्माण झालेले भीतीचे वातावरण, या कोळीबांधवांना दुष्काळग्रस्त म्हणून शासनाची मान्यता मिळविण्याची नितांत गरज, राज्यातील शेतक-यांना नुकतीच कर्जमाफी जाहीर होणे, परंतु मच्छिमारांकडे कुणाचेच लक्ष नसणे, याबाबत दिनांक 28 फेब्रुवारी, 2008 रोजी सर्वपक्षीय व मच्छिमार नेत्यांची बैठक होऊन राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्याचा घेतलेला निर्णय, याबाबत शासनाने मत्स्य दुष्काळ जाहीर करुन मच्छिमार बांधवांना दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. अनिस अहमद (मत्स्यव्यवसाय मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : महाराष्ट्राला 720 किलोमिटरचा समुद्र किनारा लाभलेला आहे. राज्यामध्ये ट्रॉलींग,कव दालदा, डोल, रापण व गिलनेटींग इत्यादी पध्दतीने मासेमारी केली जाते आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात राज्यात गेल्या चार वर्षापासून ते आजमितीपर्यंत किती मत्स्योत्पादन झाले याची आकडेवारी दिलेली आहे. परंतु आज परिस्थिती अशी आहे की, महाराष्ट्रातील सागरी किनायावरील कोळी बांधव व्यावसायिक मच्छिमारी करण्यापासून उपेक्षित होत आहेत. त्या कोळी बांधवांचे भवितव्य उज्वल व्हावे याबाबतीत शासन काय करणार आहे ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. संजय दत्त ने बहुत महत्वपूर्ण सवाल पूछा है. मुंबई से गोवा तक 720 कि.मी. का समुद्री किनारा है. जब पिछली बार यह बात हमारे सामने आई कि मछली पकड़ने वालों को नुकसान हो रहा है तो सही मायने में दुष्काल है या नहीं यह जानकारी लेने की जबाबदारी कमिश्नर को दी गई थी. इस बारे में जो रिपोर्ट हमारे सामने आई है, उसके अनुसार वर्ष 2004-05 में 4 लाख 17 हजार 854 मेट्रिक टन मछली का उत्पादन हुआ है, वर्ष 2005-06 में 4 लाख 45 हजार 343 मेट्रिक टन मछली का उत्पादन हुआ है और वर्ष 2006-07 में 4 लाख 64 हजार 90 मेट्रिक टन मछली का उत्पादन हुआ है. इसलिए सब रिकॉर्ड को देखते हुए सरकार ने यह निर्णय लिया है कि जहां पर मछली कम मिल रही है वहां पर मछली पकड़ने वालों को पूरे देश के अन्दर . . .

श्री. दिवाकर रावते : हमें देश के बारे में जानकारी नहीं चाहिए, आप हमें महाराष्ट्र राज्य के बारे में जानकारी दीजिए.

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, सरकार ने डीजल पर 80 करोड़ रुपए की सबसिडी देने का निर्णय किया है और वेट पर 100 प्रतिशत छूट देने का निर्णय लिया गया है. मछली पकड़नें वालों की मदद करने के लिए सरकार की तरफ से एक पॅकेज तैयार हो रहा है और इसके लिए नए बजट में प्रावधान करने के लिए फायनेंस डिपार्टमेंट से कहा गया है. इस प्रकार से सरकार मछली पकड़ने वालों की मदद करेगी.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, शासनाने लक्षवेधी सूचनेचे निवेदन वितरीत केले आहे त्या निवेदनास प्रथम मला हरकत घ्यावयाची होती. परंतु सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी लक्षवेधी सूचना पुकारली त्यामुळे मी त्या निवेदनावर हरकत घेतली नाही. शासनाने लेखी निवेदन वितरीत करुन एक प्रकारे सभागृहाची दिशाभूलच केली आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन 2007-08 मध्ये सागरी क्षेत्रातील योजना झालेल्या खर्चाची माहिती दिलेली आहे. डिझेलवरील मुल्यवर्धीत कर परतावा करण्यासाठी 60 कोटी रुपये खर्च केला आहे. ती कर परताव्याची रक्कम राज्य शासनाने खर्च केलेली नसून ती केंद्र सरकारने खर्च केली आहे. राष्ट्रीय कल्याण निधी या केंद्र पुरस्कृत योजनेसाठी 1कोटी 43 लाख 10 हजार रुपये राज्य शासनाचा हिस्सा आहे. आणि योजनांतर्गत मच्छिमारांना घरे बांधून देण्यासाठी.....

यानंतर श्री. कानडे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

ही सगळी 66 कोटी 2 लाख 53 हजार रुपयांची मदत आहे. मच्छिमार बांधवांनी 1347 कोटी 2 लाख रुपयांचे परकीय चलन या देशाकरिता मिळवून दिले. त्यांना शासन फक्त 4 कोटी रुपयांची मदत करते. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, 50 टक्के मच्छिमारी कमी येत असल्यामुळे त्यांना कशा प्रकारे मदत दिली जाणार आहे ? 5 वर्षांचा संपूर्ण आढावा घेतल्यानंतर मच्छिमारी कमी येत असल्यामुळे मच्छिमारांना दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करता येत नाही असे मंत्रिमहोदयांनी सांगितले. ही पूर्णपणे चुकीची माहिती आहे. यासाठी 1981 च्या जनगणनेचा आधार घेतला गेला. 16.1.1981 रोजी जो कायदा केला त्याचा आधार घेऊन पारंपारिक पध्दतीने केली जाणारी मासेमारी आणि त्यानंतर यांत्रिकी नौकेतून केली जाणारी मच्छिमारी पाहिली तर तेच ॲव्हरेज येते म्हणजे मच्छिमारी पूर्णत: 100 टक्के कमी झालेली आहे. म्हणून 1981 च्या कायद्याचा आधार न घेता त्यानंतरची प्रचलित पध्दत लक्षात घेऊन शासन मच्छिमार बांधवांना दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करणार आहे काय ? निवेदनाच्या माध्यमातून असे म्हटले आहे की, केंद्र शासनाच्या माध्यमातून 60 हजार कोटी रुपयांची मदत शेतकऱ्यांना देणार आहोत. याबद्दल सरकारचे अभिनंदन आम्ही करणार आहोतच. परंतु यामध्ये मच्छिमार बांधवांसाठी कोणतीही तरतूद केलेली नाही. केंद्र शासन मच्छिमार बांधवांसाठी तरतूद करो अथवा न करो परंतु राज्य शासन या मच्छिमार बांधवांना दिलासा देण्यासाठी काही तरतूद करणार आहे काय याबाबतचे उत्तर शासनाने दिलेले नाही. त्याचप्रमाणे 1981 च्या कायद्यामध्ये शासन बदल करणार आहे काय ? मच्छिमार बांधवांना मदत करण्यासाठी नवीन कर्जमुक्तीचे धोरण राज्य शासन आणणार आहे काय ? जुने उत्तर देऊन मंत्रिमहोदयांनी मच्छिमार बांधवांची फसवणूक करु नये.

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव ने भावनात्मक रुप से अपनी बात सदन में पेश की है. हमारा डिपार्टमेंट पूरी तरह से उनकी बात से सहमत है. यह बात सच है कि जिस तरह से किसानों को मदद की गई है, उसी तरीके से मछली पकड़ने वालों को मदद मिलनी चाहिए. हमारी तरफ से डीजल पर सबसिडी दी गई है और वेट 100 प्रतिशत माफ किया है.

श्री. भास्कर जाधव : डीजल पर सबसिडी केन्द्र सरकार की तरफ से दी गई है.

. . . JJ 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिस अहमद : यह राज्य सरकार ने किया है. राज्य सरकार डीजल पर 80 करोड़ रुपए की सबसिडी दे रही है. सरकार माननीय सदस्य की बात से सहमत हैं कि 100 प्रतिशत दुष्काल है, मछली पकड़ने वालों की हालत खराब है. सरकार उनकी मदद करना चाहती है, इसलिए हमने कमिश्नर (फिशरीज) की एक कमेटी बनाई गई है. यह कमेटी इस बात पर विचार कर रही है कि राज्य सरकार की तरफ से मछली पकड़ने वालों की किस तरह से मदद की जा सकती है. जैसे ही हमारे पास कमिश्नर की रिपोर्ट आएगी, हम अधिवेशन खत्म होने से पहले ..

श्री. भास्कर जाधव : क्या सरकार 1981 के कायदे को रिवाइज करेगी ?

श्री. अनिस अहमद : अगर 1981 का एक्ट रिवाइज करना है तो सरकार उसके लिए भी तैयार है. हम इस एक्ट में सुधार लाएंगे.

. . . KK 1

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ज्या ज्या वेळी सभागृहात हा विषय येतो त्या त्या वेळी मंत्री महोदयांकडून या प्रश्नाला थातुरमातूर उत्तरे दिली जातात. आपण स्वत: या विभागातील आहात. मच्छिमारांच्या विषयाकडे नेहमीच सरकारने दुर्लक्ष केले आहे. कारण समुद्रकिनाऱ्याशी संबंध नसलेल्या मंत्र्यांकडे हे खाते दिले जाते त्यामुळेच मच्छिमारांची पूर्णपणे वाताहत झालेली आहे. कारण या लोकांना एनसीडीसी काय आहे हे देखील समजत नाही. मच्छिमारांना डिझेल कोण देते हे देखील यांना माहीत नाही, ट्रॉलर मच्छिमार आणि बोटीचे मच्छिमार या सर्वांना एकाच मापात मोजले जाते. किनारपट्टीवरील समस्यांची यांना जाणीव नाही. शेवटी या मच्छिमारांना न्याय मिळणार की नाही ? हा खरा प्रश्न आहे. वापि येथील केमिकलच्या प्रदुषणामुळे ठाणे जिल्ह्यातील मच्छिमारांना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते अशा प्रकारचे वेगवेगळया भागातील वेगवेगळे विषय आणि समस्या आहेत, परंतु माननीय मंत्री महोदय मात्र सर्व भागांकडे एकाच नजरेने पाहतात. म्हणून माझी विनंती आहे की, यासंदर्भात आपल्या दालनात एक बैठक बोलवावी. कारण मच्छिमारांचा प्रश्न आता चांगला ऐरणीवर आलेला आहे. मंत्री महोदय म्हणतात की, गरज पडली तर आपण मार्गदर्शक तत्वांमध्ये बदल करु. परंतु यासाठी अर्थ विभाग सहज मान्यता देईल असे वाटत नाही, कारण ते तेवढे सोपे नाही. म्हणून यासंबंधीची बैठक बोलावून खरोखरच हे अधिवेशन संपण्यापूर्वी मत्स्य दुष्काळ घोषित झाला तरच मच्छिमारांना न्याय मिळू शकेल. केवळ अशा प्रकारची उत्तरे देऊन वाटाण्याच्या अक्षता वाटू नयेत, कारण आता मच्छिमार एवढा साधा राहिलेला नाही, हे लक्षात घ्यावे.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे आपण एक बैठक बोलावू आणि या बैठकीत सर्व गोष्टींचा उहापोह होईल व योग्य निर्णयाप्रत आपण येऊ, तोपर्यंत ही चर्चा आपण स्थगित ठेवू.

श्री. मधुकर सरपोतदार : महोदय, ही लक्षवेधी सूचना मांडतांना त्यात अशी मागणी केली आहे की, "दिनांक 28 फेब्रुवारी, 2008 रोजी सर्वपक्षीय व मच्छिमार नेत्यांची बैठक होऊन राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्याचा घेतलेला निर्णय, याबाबत शासनाने मत्स्य दुष्काळ जाहीर करुन मच्छिमार बांधवांना दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करण्याची आवश्यकता". थोडक्यात दुष्काळ जाहीर होण्याबद्दल संपूर्ण निवेदनात कुठेही उल्लेख केलेला नाही. अशा प्रकारे मागणी काय आणि उत्तर कोणत्या प्रकारे दिलेले आहे याचा बोध होत नाही.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, मैं सम्माननीय सदस्य की इस बात से सहमत हूं कि मछली मारने वालों की हालत बहुत खराब है.

उपसभापती : मेरी हालत उनसे ज्यादा खराब हो गई है. .आपण यासंबंधी आता असा निर्णय घेतलेला आहे की येत्या आठ दिवसांच्या आत बैठक बोलाविण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : महोदय, लक्षवेधी सूचना वेगळी आणि उत्तर वेगळेच दिलेले आहे, म्हणून ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी, अशी माझी मागणी आहे.

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, ही लक्षवेधी सूचना आज राखून ठेवावी आणि आपल्या

श्री. दिवाकर रावते : या लक्षवेधी सूचनेत दोन तीन प्रश्न इन्व्हॉल्व्ह आहेत.

उपसभापती : आपल्याला ही लक्षवेधी सूचना आज राखून ठेवून बैठक घेतल्यानंतर पुन्हा मांडावयाची आहे काय ?

श्री. मधुकर चव्हाण : होय, ही लक्षवेधी सूचना पुन्हा सभागृहात चर्चेला घ्यावयाची आहे.

श्री. अनिस अहमद : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याची आवश्यकता नाही. इस विषय के संबंध में जितने आमदार चर्चा करना चाहते हैं, उनसे मैं चर्चा करने के लिए तैयार हूं, उनसे सुझाव लेने के लिए तैयार हूं. उन सभी सदस्यों को बैठक में बुलाकर चर्चा करेंगे.

उपसभापती : लक्षवेधी सूचनेवर आताच चर्चा करावयाची असेल तर मी यासाठीची बैठक बोलाविणार नाही, म्हणून सन्माननीय सदस्यांनी यावरील चर्चा तरी थांबवावी.

श्री. दिवाकर रावते : महोदय, लक्षवेधी सूचनेतील विषय दुष्काळ जाहीर करण्यासंबंधीचा आहे परंतु त्याचे उत्तर मिळालेच नाही. तसेच सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी केवळ दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच उत्तरामध्ये डिझेलच्या प्रति लिटरला अबकारी कर कोण देतो तर त्याबाबत अबकारी करात सवलत देण्याची 100 टक्के केंद्रपुरस्कृत योजना राबविण्यात येते असे सांगण्यात आले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुद्धीत प्रत / मुद्रितशोधनाची नाही

श्री. अनिस अहमद : मैं इस प्रश्न के संबंध में राजनीति नहीं करना चाहता. मत्स्य व्यवसाय विभाग के द्वारा जो योजना अमल में लायी जा रही है, उसकी जानकारी मैंने दी है. जैसे, मछलीमार सहकारी संस्थाओं की यांत्रिकी नौकाओं के लिए डीझल पर 100 प्रतिशत सेल्स टैक्स की सुविधा प्रतिपूर्ति के रुप में दी जाती है. दूसरी बात यह है कि आपने जो बैठक बुलाई है, उस बैठक में इस विषय पर चर्चा की जा सकती है. मैं सम्माननीय सदस्य की इस बात से सहमत हूं कि मछलीमारों की हालत बहुत खराब है. सम्माननीय वित्त मंत्री जी को भी इस बैठक में बुलाया जाना चाहिए. सरकार मछलीमारों की मदद करना चाहती है. जिन मछलीमारों के पास दो सिलेण्डर है .....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय मंत्रीमहोदयांनी छोटया मच्छीमार लोकांच्या संदर्भात जी भूमिका घेतलेली आहे त्याबद्दल धन्यवाद देतो. परंतु आज सकाळी ई-टीव्ही वर रत्नागिरी येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिका-यांनी मच्छीमारांच्या संदर्भात जे निवेदन केलेले आहे ते मी ऐकलेले आहे. आज संपूर्ण कोकण पट्टीत रत्नागिरीपासून ते सिंधुदुर्ग कोकणपट्टीत मत्स्य व्यवसाय चालत असतो. अशी परिस्थिती असतांना मत्स्य विद्यापीठ कोकणामध्ये हवे असतांना ते नागपूर मध्ये आणले् जात आहे त्यामुळे मत्स्य विद्यापीठ कोकणामध्ये ठेवले जाणार आहे की, ते नागपूर मध्ये आणले जाणार आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावी एवढी विनंती आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग में जो मछलीमार रहते हैं और मत्स्य शिक्षा ग्रहण करना चाहते हैं, क्या आप उन मछलीमारों को नागपुर में ले जाकर पढाने वाले हो ?

उपसभापति : मंत्री महोदय का यह कहना है कि नागपुर में भी मछलीमार रहते हैं.

श्री. अरविंद सावंत : या लक्षवेधीच्या संदर्भात आपल्या दालनात बैठक झाल्यानंतर त्याचा निर्णय सभागृहाला सादर करण्यात यावा.

उपसभापती : ठीक आहे. आता लक्षवेधी क्रमांक 3 चर्चेला घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : विदर्भात शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांची पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांचे प्रचंड प्रमाणात होत असलेले हाल

मु.शी. : विदर्भात शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांची पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांचे प्रचंड प्रमाणात होत असलेले हाल यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"विदर्भातील ग्रामीण रुग्णालये आणि जिल्हापरिषदामार्फत चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रात फेब्रुवारी, २००८ अखेरीस डॉक्टरांची शेकडो पदे रिक्त असणे, विदर्भाच्या नागपूर विभागात दोनशेहून अधिक तर अमरावती विभागात १५० हून अधिक डॉक्टरांची पदे रिक्त असणे, जिल्हापरिषदांच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात नियुक्त असलेले डॉक्टर्स हजर नसणे, औषधांचा तुटवडा सतत असणे, काही रुग्णालयांना अजूनही वाहनांची सोय नसणे, ज्या रुग्णालयांना वाहने दिली आहेत त्यांना डिझेल, पेट्रोल मिळत नसल्यामुळे ती विनावापर पडून असणे, काही रुग्णालयात डॉक्टरांचे काम कंपाऊंडरकडून करुन घेण्यात येणे, या सर्व दुरावस्थेमुळे रुग्णांचे प्रचंड हाल होणे, आतापर्यंत खर्च झालेल्या शासकीय निधीचा योग्य वापर न होणे, शासनाचे याकडे झालेले दुर्लक्ष व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विदर्भामध्ये सर्व विभागाचा बॅकलॉग असतांना आता आरोग्य खात्याचा देखील विदर्भात बॅकलॉग तयार झालेला आहे. निवेदनात म्हटले आहे की, "विदर्भात एकूण 98 ग्रामीण रुग्णालये व 477 प्राथमिक आरोग्य केंद्रे असून जवळपास प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ग्रामीण रुग्णालयासाठी 98 वैद्यकीय अधिक्षक व 1248 वैद्यकीय अधिका-यांची पदे रिक्त आहेत." सभापती महोदय, विदर्भामध्ये दवाखाने झाले परंतु वैद्यकीय अधिका-यांची पदे रिक्त आहेत अशी स्थिती आहे. निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, "महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे सरळसेवेने भरतीसाठी वैद्यकीय अधिका-यांची वर्ग-1 (गट-अ) संवर्गातील 142 उमेदवारांची मागणी करण्यात आली असून वैद्यकीय वैद्यकीय अधिकारी, वर्ग -2(गट-अ) या संवर्गातील 1202 उमेदवारांची मागणी शासनाने आयोगाकडे केलेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ..

ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये जवळजवळ 1200 डॉक्टर्स कमी आहेत.. "संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान " आणि "डॉक्टर तुमच्या दारी " या सारख्या घोषणा शासन नेहमीच करीत असते. दवाखान्यात जर डॉक्टर नसेल तर ते तुमच्या घरी कसे काय येतील ? व ते घरी जाऊन काय करणार आहेत ? ग्रामीण भागातील अनेक प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये डॉक्टर्स नाहीत तसेच तेथे औषधे नाहीत. डॉक्टर्स नसल्यामुळे तेथील कंपाऊन्डर रुग्णांना औषधे देण्याचे काम करीत असतो. अनेक प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये डॉक्टर्स नसल्यामुळे बी.ए.एम.एस. अर्हताधारकाची अस्थायी नियुक्ती करण्यात आलेली आहे. म्हणजे शिक्षण भागामध्ये ज्या प्रमाणे शिक्षण सेवक नेमण्यात आलेले आहे त्या प्रमाणे आरोग्य विभागात बी.ए.एम.एस.अर्हताधारकांची अस्थायी पदावर नियुक्ती करण्यात येत आहे. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात मला माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, विदर्भातील डॉक्टरांची ही पदे भरण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र लोक सेवा आयोगाकडे केव्हा दिला होता आणि ही पदे भरण्यात विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, दीड वर्षापूवीच हा प्रस्ताव पाठविला होता परंतु त्यांच्या प्रोसिजरमुळे ही पदे भरण्यास तेवढा वेळ लागतो. एम.पी.एस.सी. ही क्वासि ज्युडिशिअल असून पदे भरण्याच्या संदर्भात त्यांची प्रोसिजर ठरलेली आहे. डॉक्टरांची पदे लवकरात लवकर भरण्यात यावीत यासाठी आम्ही सतत त्यांच्याकडे पाठपुरावा करीत असतो. अनेक प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये डॉक्टरांची कमतरता आहे म्हणूनच ही पदे लवकरात लवकर भरावीत अशी आम्ही वारंवार एम.पी.एस.सी.कडे मागणी करीत असतो. या प्रश्नाच्या संदर्भात या पूर्वी सभागृहात अनेकदा चर्चा झालेली आहे. त्यामुळे लवरकात लवकर ही पदे भरण्याचा आमचा प्रयत्न आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अनेक प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये डॉक्टर्स नाहीत, तेथे पुरेशी औषधे नाहीत तसेच जी औषधे तेथे दिली जातात ती परस्पर विकली जातात. त्यामुळे अनेक रुग्णांना ही औषधे बाहेरुन विकत आणावयास लावून नंतर डॉक्टर त्यांच्यावर उपचार करीत असतात .तेव्हा प्राथमिक आरोग्य केन्द्रासाठी दरवर्षी किती रुपयाचा औषध पुरवठा केला जातो आणि या प्राथमिक आरोग्य केन्द्रात येणाऱ्या रुग्णांची सरासरी संख्या किती आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, आदिवासी भागातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केन्द्रासाठी वर्षाला एक लाख 60 हजार रुपयांचा औषध पुरवठा केला जातो आणि बिगर आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केन्द्रासाठी 1 लाख 20 हजार रुपयांचा औषध पुरवठा दर वर्षी केला जातो. त्या व्यतिरिक्त राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत काही निधी केन्द्र सरकारकडून मिळतो....

श्री.पांडुरंग फुंडकर : सहा सहा महिने औषधाचा पुरवठा होत नाही.

श्री.रणजित कांबळे : प्राथमिक आरोग्य केन्द्राना औषधे देण्याचे जे ठरलेले आहे त्यानुसार दर सहा महिन्यानंतर औषधांची खरेदी केली जाते. या कार्यक्रमा अंतर्गत 50 टक्के केन्द्र सरकार निधी देते तर 50 टक्के निधी राज्य सरकार देते. या वर्षी प्राथमिक आरोग्य केन्द्रांना औषध पुरवठा करण्याची रक्कम दुप्पट केलेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : दुप्पट म्हणजे किती रक्कम देण्यात येणार आहे ?

श्री.रणजित कांबळे : पूर्वी बिगर आदिवासी भागातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केन्द्रासाठी . 1 लाख 20 हजार रुपये दिले जावयाचे त्या ऐवजी आता 2 लाख 40 हजार रुपये दिले जाणार आहे आणि पूर्वी आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केन्द्रासाठी 1 लाख 60 हजार रुपये दिले जावयाचे त्या ऐवजी आता 3 लाख 20 हजार रुपये दिले जाणार आहेत. अशा प्रकारे हा निधी दुप्पट करण्यात आला आहे.

(सभापती स्थानी - तालिका सभापती श्री.उल्हास पवार)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेमध्ये असे म्हटलेले आहे की. प्राथमिक आरोग्य केन्द्रातील वैद्यकीय अधिकारी वर्ग 1 (गट अ) आणि वैद्यकीय अधिकारी वर्ग 2 (गट अ) यांची अनेक पदे रिक्त आहेत. एम.पी.एस.सी. च्या कक्षेतून अस्थाई डॉक्टरांना काढण्यासाठी कॅबिनेट समोर प्रस्ताव पाठविण्यात येणार होता त्या संदर्भात पुढे काय प्रगती झाली आहे ? त्या संदर्भात कोणता निर्णय घेण्यात आला आहे ?

(माननीय राज्यमंत्री माननीय मंत्री महोदयांबरोबर बोलतात)

माननीय राज्य मंत्री महोदयांनी माझा प्रश्न ऐकून घ्यावा. अजून माझा प्रश्न संपलेला नाही. अस्थाई डॉक्टरांना सेवेत घेतल्यानंतर राजपत्रित वैद्यकीय अधिकारी गट अ यांना सेवेत घेण्यासाठी आपण कॅबिनेटसमोर गेला होता त्या संबंधी काय निर्णय झाला ?

नंतर श्री.सुंबरे

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सावंत ...

आणि माननीय सभापतींच्या दालनामध्ये या विषयावर बैठक झाली होती त्यामध्ये जे काही ठरले होते वा आश्वासन दिले होते त्याबाबत काय झाले ? त्यांना सेवेत आपण केव्हा समाविष्ट करून घेणार आहात ? आणि माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आपण महिना 10 हजाराचे 20 हजार रूपये केले. या शिवाय पीएलसी मधून आपण तेथील एमओ म्हणजे वैद्यकीय अधिकाऱ्याकडे जे पैसे देता ते नेमके किती देता ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, आपल्या सेवेतील अस्थायी डॉक्टर्सना सेवेत कायम करण्याचा प्रश्न आपण कॅबिनेट समोर नेला होता आणि कॅबिनेटने देखील त्याला मान्यता दिली आहे. तरीही हा विषय आतापर्यंत एमपीएससीकडे होता आणि त्यामुळे कॅबिनेटचा याबाबतचा निर्णय त्यांच्याकडे पाठवावा लागतो आणि त्यानुसार त्यांच्याकडे पाठविल्यानंतर त्यांचा यावरील निर्णय अजून यावयाचा आहे. परंतु मागील अधिवेशनामध्ये माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात जाहीर केले होते की, या प्रश्नी आम्ही कॅबिनेटसमोर जाणार. त्याप्रमाणे आम्ही हा प्रश्न कॅबिनेटसमोर नेऊन कॅबिनेटची मान्यता घेतली आहे. आता यात वेळेचा प्रश्न आहे आणि हे लवकरात लवकर होण्यासाठी एमपीएससीकडून उत्तर यायचे आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. एमपीएससीमध्ये जे नियुक्त सदस्य लागतात ते आज तेथे नाहीत. आज तेथे केवळ अध्यक्ष आणि सेक्रेटरी एवढेच आहेत. त्या बोर्डावर महाराष्ट्र सरकारने अद्याप कोणाचीही सदस्य म्हणून वर्णी लावलेली नाही त्यामुळे एमपीएससीच्या बैठकाच होत नाहीत. आज एमपीएससी बोर्ड अस्तित्त्वातच नाहीत. मग हे म्हणतात की, आमच्याकडे बीएएमएस डॉक्टर्स आहेत, तेच आम्ही पाठवितो. म्हणजे ग्रामीण भागामध्ये तेथील जनतेच्या आरोग्य रक्षणासाठी बीएएमएस डॉक्टर्स आणि शहरात मात्र एमबीबीएस डॉक्टर्स हे देणार. हा अन्याय का ? राज्य सरकारच्या धोरणामुळेच हा प्रश्न निर्माण झालेला आहे. तेव्हा आपण एमपीएससीच्या परव्ह्यू मधून हा विषय काढून राज्य सरकारला जे अधिकार आहेत, त्या अधिकारानुसार, राज्य सरकारला घटनेनुसार जे अधिकार आहेत, त्यांचा वापर सरकार का करीत नाही ? त्यासाठी सरकार राज्यपालांकडे का जात नाही ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, या बाबतीत कॅबिनेटपुढे जाऊन आम्ही कॅबिनेटचा निर्णय घेतलेला आहे मात्र त्या दृष्टीने आता नियमांमध्ये दल करावे लागतील आणि त्याला वेळ लागणार आहे. ... . एनएन 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : तोपर्यंत लोकांनी मरायचे का ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी हे लक्षात घ्यावे की, आम्ही याबाबत कार्यवाही करीत आहोत.... त्यांनी अशा प्रकारे बोलणे बरोबर नाही.

तालिका सभापती (श्री.उल्हास पवार) : सन्माननीय सदस्यांनी हे लक्षात घ्यावे की, माननीय राज्यमंत्री आपल्याला सांगत आहेत की, त्यांनी या बाबत प्रामाणिक प्रयत्न केले आहेत व करीत आहेत. त्यांनी आपल्याला सांगितले आहे की, याबाबत कॅबिनेटचा, शासनाचा निर्णय झालेला आहे. केवळ काही तांत्रिक आणि कायदेशीर बाबी पूर्ण करावयाच्या आहेत, त्यासाठी ते प्रयत्नशील आहेत.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, शेवटी ही पदे भरावयाची म्हटले तर शासनाची काम करण्याची एक पद्धत आहे त्याप्रमाणेच आपल्याला काम करावे लागणार आहे. मागील अधिवेशनामध्ये माननीय मंत्री महोदयांनी याबाबत सभागृहामध्ये आश्वासन दिले होते की, हा प्रश्न आम्ही कॅबिनेटपुढे घेऊन जाऊ. त्याप्रमाणे आम्ही कॅबिनेटपुढे गेलो आणि कॅबिनेटनेही याला मान्यता दिली आहे. आता असे होत नाही की, कॅबिनेट संपल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी हे झाले.

डॉ. दीपक सावंत : पण याला आता सहा महिने झालेले आहेत. ...

श्री. रणजित कांबळे : माननीय मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये आश्वासन दिले होते, त्याला सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे अजून सहा महिने झालेले नाहीत. ...

डॉ. दीपक सावंत : माननीय सभापतींच्या दालनामध्ये जी बैठक झाली आणि त्यामध्ये जे आश्वासन मंत्र्यांनी दिले होते त्याला 6 महिने होऊन गेले आहेत...

श्री. रणजित कांबळे : त्याबद्दल मी काही सांगू शकत नाही. मात्र खालच्या सदनामध्ये माननीय मंत्र्यांनी आश्वासन दिले होते त्याप्रमाणे आम्ही कॅबिनेटपुढे हा विषय नेऊन कॅबिनेटची मान्यता घेतलेली आहे, त्याला आपण म्हणता आहात त्याप्रमाणे सहा महिने झालेले नाहीत. खालच्या सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.खडसे यांनी हा विषय उपस्थित केला होता त्यावेळेस माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले होते की, हाय, आम्ही कॅबिनेटसमोर हा विषय घेऊन जाणार आहोत. त्याप्रमाणे आम्ही कार्यवाही केली आहे. त्यानंतर त्याप्रमाणे त्यांच्या नियमामध्ये काही बदल करावे लागतील, ते आम्ही करून घेणार आहोत. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला होता त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, प्रत्येक पीएचसीमध्ये तेथील मेडिकल ऑफिसरकडे 25 हजार रूपये फंड म्हणून आपण देतो.

..... एनएन 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, गेल्या तीन चार अधिवेशनांमध्ये मी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील डॉक्टरांची कमतरता हा विषय सातत्याने मांडत असताना दुसऱ्या अधिवेशनामध्ये माननीय मंत्री तसेच राज्यमंत्री यांनी सांगितले होते की, राज्यामध्ये डॉक्टरांची 2 हजार पदे रिक्त आहेत आणि ही पदे भरण्याचेही त्यांनी तेव्हा कबूल केले होते. तेव्हा त्या संबंधात माननीय सभापतींनी 15 दिवसात याबाबत कारवाई करण्याचे आदेश दिले होते. ती कारवाई अजून का करण्यात आली नाही ?

(यानंतर श्री.सरफरे ..... ओओ 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, माननीय सदस्यांचा प्रश्न वेगळा आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, राज्यामध्ये दोन हजार डॉक्टर्सची पदे रिक्त आहेत हे आपण कबूल केले आहे. तेव्हा ही पदे आपण केव्हा भरणार आहात?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, माननीय सदस्यांचा प्रश्न वेगळा आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी बी.ए.एम.एस. झालेले डॉक्टर्स भरल्यानंतर सुध्दा 182 पदे रिक्त रहातात असे उत्तर दिले. विदर्भामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये 182 डॉक्टर्सची पदे रिक्त आहेत. त्याठिकाणी डॉक्टर नसल्यामुळे कंपाऊंडर दवाखाने चालवितात. तेव्हा ही 182 रिक्त पदे आपण किती दिवसात भरणार आहात? 98 ग्रामीण रुग्णालयांमध्ये 91 वाहने कार्यान्वित आहेत आणि 477 प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये 367 वाहने कार्यान्वित आहेत. माझ्या माहितीप्रमाणे यामधील 25 टक्के वाहने बंद अवस्थेत पडली आहेत. आणि काही वाहनांकरिता पेट्रोल व डिझेलची व्यवस्था केलेली नाही, काही वाहनांकरिता वाहन चालक नेमले नाही. काही वाहनांच्या दुरुस्तीकरिता तरतूद नसल्यामुळे ती वाहने बंद आहेत. ही वाहने कार्यान्वित करण्यासाठी विदर्भाकरिता अतिरिक्त निधी देण्यात येईल काय? त्याचप्रमाणे अकोला मंडळाकरिता 29 व नागपूर मंडळाकरिता 24 रुग्णवाहिका खरेदी करण्याचे प्रस्तावित केले आहे. ही वाहने आपण केव्हा खरेदी करणार आहात?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, विदर्भामध्ये अकोला व नागपूर असे दोन डिव्हिजन आहेत. त्यापैकी अकोला डिव्हिजनमध्ये बी.ए.एम.एस. डॉक्टर्सची फक्त 18 पदे भरावयाची आहेत. ही पदे भरण्याकरिता 146 अर्ज आले आहेत. त्याकरिता 18 तारखेला बैठक ठेवण्यात आली असून त्यावेळी ही पदे भरण्यात येणार आहेत. उर्वरित प्रश्न नागपूर संदर्भातील आहे. ही पदे भरीत असतांना पदांचे आरक्षण न ठेवता तातडीने मुलाखती घेण्याची कारवाई करण्यात आली. तेथील आयुक्तांकडून झालेली ही चूक काही लोकांच्या निदर्शनास आली. त्यामुळे ही बाब दुरुस्त करुन दोन महिन्याच्या आत नागपूर डिव्हिजनमधील भरती पूर्ण करण्यात येईल. सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी रुग्णवाहिकेसंबंधी प्रश्न विचारला आहे. याठिकाणी वाहनांची जी संख्या देण्यात आली आहे त्यामधून नादुरुस्त वाहने वगळण्यात आली आहेत. ही सर्व वाहने चालू स्थितीतील आहेत. 477 प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये 367 वाहने कार्यान्वित आहेत, त्याठिकाणी अजून 110 वाहनांची आवश्यकता आहे. तसेच, 98 ग्रामीण रुग्णालयांमध्ये 91 वाहने कार्यान्वित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. रणजित कांबळे...

असून त्याठिकाणी आणखी 7 वाहनांची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे कॉंट्रक्ट बेसिसवर काही ठिकाणी वाहने चालू ठेवण्यात आली आहेत. मागील वर्षीपेक्षा यावर्षी पी.ओ.एल. अकाऊंटमध्ये रक्कम वाढवून ठेवण्यात आली आहे. त्याप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ट्रायबल एरियामध्ये 60 हजार आणि नॉन ट्रायबल एरियामध्ये 16 हजारांची तरतूद केली आहे. याव्यतिरिक्त बहुतांशी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये डिलिव्हरीकरिता पेशंट येतात. यादृष्टीने वाहनांची उपलब्धता होण्याकरिता संपूर्ण राज्यामध्ये कुटुंब नियोजन विभागाकरिता पी.ओ.एल. अकाऊंटमध्ये 2 ते 3 कोटी ठेवले आहेत. वाहनांच्या इंधनाकरिता जसजशी मागणी येते त्याप्रमाणे आम्ही त्यांना खर्च करण्यास मान्यता देतो. याकरिता ग्रामपंचायत स्तरावर सरपंच आणि अंगणवाडी सेविका यांचे संयुक्त खाते उघडयात आले आहे, ते अन टाईड अकाऊंट आहे. त्याचप्रमाणे सब सेंटरमध्ये ए.एच.एम. यांचे संयुक्त अकाऊंट काढले आहे. जेणेकरुन ईमर्जन्सी केसमध्ये ट्रान्सपोर्टेशनची व्यवस्था या अकाऊंटमधून आपल्याला करता येईल. यादृष्टीने सब सेंटर आणि ग्रामपंचायतीच्या स्तरावर पैश्याचे वाटप झाले आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे . . . .

ग्राम पंचायत स्तरावर अंगणवाडी आणि सरपंच आणि सब सेंटरमध्ये सरपंच व ए.एन.एम.चे संयुक्त अकाऊंट आहे. त्याच्या व्यतिरिक्त आपण आर.एच.साठी बजेट देतो आणि ते ठरलेले आहे. पी.एल.अकाऊंट मध्ये पैसे पाहिजेत. यामध्ये जसजशी मागणी येते, त्याप्रमाणे तरतूद करतो. पेट्रोल आणि ऑईलसाठी पैशाची कमतरता आहे असे जे सांगण्यात आले आहे, ते चुकीचे आहे हे मी आपल्या माध्यमातून सदनाला सांगू इच्छितो. याठिकाणी मेन्टेनन्सच्या बाबतीत वारंवार उल्लेख केला जातो. हे खरे आहे की, गाडयांच्या दुरुस्तीसाठी पैशाची गरज आहे आणि हा निधी वाढविण्याची गरज आहे. मागच्या वेळेस अशी मागणी करण्यात आली होती आणि पूर्वी पेक्षा पेट्रोल आणि ऑईलसाठी निधी थोडासा वाढवून दिला आहे. त्याप्रमाणे पुढच्या काळामध्ये दुरुस्तीच्या बाबतीत सुध्दा तशी तरतूद करु.

डॉ.नीलम गोऱ्हे : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये शेवटी असे म्हटलेले आहे की, "प्राथमिक आरोग्य केंद्रात अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे नेमणुकीबाबतचे धोरण राबविल्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता पूर्वीसारखी जाणवत नाही." हे जे उत्तर देण्यात आले आहे, त्याबाबतीतच सर्वांचे मतभेद आहे आणि त्यामुळेच परत-परत प्रश्न विचारण्याची गरज भासत आहे. याचे कारणच असे आहे की, निवेदनामध्ये सांगितल्याप्रमाणे वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता पूर्वीसारखी जाणवत नाही. पण अगोदरच्या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की,"ही रिक्त पदे सुध्दा पुढील नजिकच्या काळात भरण्यात येणार आहेत." हा काळ कधी संपणार आहे हे कोणालाही माहिती नाही. सध्या बजेट अधिवेशन सुरु आहे आणि एप्रिल-मे-जून नंतर साथीचे आजार सुरु होतात आणि मग डॉक्टरांची गरज भासते. मग जे-जे संवेदनाशील सन्माननीय सदस्य आहेत, मग ते सत्ताधारी पक्षाचे आहेत किंवा विरोधी पक्षाचे आहेत हा प्रश्न नाही. परंतु याबाबतीत प्रत्येक गावा-गावातून तक्रार येत आहे. म्हणून माझा एक प्रश्न आहे. तुमच्याकडून असे सांगितले जाते की, आम्ही व्यवस्थापन करतो, संनियंत्रण करतो. तर माझा पहिला प्रश्न असा आहे की, ही पदे कधीपर्यंत भरण्यात येणार आहेत ? तसेच निवेदनामध्ये असेही म्हटलेले आहे की,"वैद्यकीय अधिकाऱ्यांना मुख्यालयी राहण्याबाबत सक्त सुचना देण्यात आलेल्या आहेत." माझा दुसरा प्रश्न असा आहे की, याबाबतीत किती ठिकाणी अंमलबजावणी होत आहे ? याची अंमलजावणी झालेली दिसली नाही तर त्याबाबतीत कोणती कारवाई करण्यात आली आहे ? याबाबतीत कोणत्याही .....

. . . .2 पी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

प्रकारचे स्पष्टीकरण करण्यात आलेले नाही. सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे.

तालिका सभापती (श्री.उल्हास पवार) : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आताच माननीय मंत्री महोदयांनी रिक्त पदांच्या बाबतीत माहिती सांगितलेली आहे की, उमेदवारांची यादी आलेली असून मुलाखती घेण्यात आल्या आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे : अध्यक्ष महाराज, निवेदनामध्ये शेवटी असे म्हटलेले आहे की, "प्राथमिक आरोगय केंद्रात अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे नेमणुकीबाबतचे धोरण राबविल्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता पूर्वीसारखी जाणवत नाही." याबद्दल आपण आम्हाला संरक्षण द्यावे. कारण वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता जाणवते ही वस्तुस्थिती आहे म्हणूनच येथे लक्षवेधी सूचना देण्याचा उपद्व्याप करावा लागलेला आहे. त्यामुळे माझे असे म्हणणे आहे की, निवेदनातील ही दोन वाक्ये वगळण्यात यावीत.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी हे नाकारत नाही की, डॉक्टरांची कमतरता आहे. सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य वारंवार हा विषय मांडतात आणि त्यांना हे माहिती आहे की, डॉक्टर ग्रामीण भागामध्ये जाण्यासाठी तयार होत नाहीत. तेथे वैद्यकीय अधिकारी किंवा एम.बी.बी.एस.डॉक्टर जाण्यासाठी तयार होत नाहीत म्हणून तेथे दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांच्याऐवजी 1 बी.ए.एम.एस. डॉक्टर राहील असे शासनाने धोरण घेतलेले आहे. मी मघाशी सांगितले त्याप्रमाणे जवळपास 2 महिन्याच्या आत सर्व भरतीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. त्यामुळे प्रत्येक पी.एच.सी. मध्ये किमान 1 बी.ए.एम.एस.डॉक्टर राहील आणि त्यांच्या व्यतिरिक्त 1 एम.बी.बी.एस.डॉक्टरही देण्याच्या बाबतीत प्रयत्नशील आहोत. सध्या एक डॉक्टरांच्या बाबतीत तरतूद आहेच. पण तसे पाहिले तर दोन डॉक्टर कायम स्वरुपामध्ये तेथे रहाणार आहेत. पण दुसरा मुद्दा असा आहे की, जेव्हा पी.एच.सी.मध्ये केवळ एक डॉक्टरच आहे. शेवटी त्याला सुध्दा सुटी मिळाली पाहिजे. त्याला देखील स्वत:साठी काही वेळ असावयास पाहिजे.

श्री.पांडुरंग फुंडकर (खाली बसून) : तेथे कम्पाऊंडर दवाखाना चालवित असतो.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, आपल्याला जेव्हा खाजगी डॉक्टरकडे जावयाचे असते, तेव्हा आपण त्याच्या वेळेनुसार जातो. पण आपण जेव्हा सरकारी डॉक्टरकडे जातो मग केव्हाही अगदी रात्री, बेरात्री असेल, पण त्याने 24 तास तेथे हजर राहिले पाहिजे अशी इच्छा ....

. . . .2 पी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असते. पण शेवटी तो डॉक्टर माणूस आहे. त्याला देखील स्वत:साठी काही वेळ पाहिजे. एक माणूस किती तास काम करु शकतो ? त्यामुळे जेव्हा कोणी तिकडे जाईल, त्यावेळी तेथे कर्मचारी उपस्थित असण्याची शक्यता आहे. ही बाब सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत समजू शकतात. कारण ते स्वत: डॉक्टर आहेत. ज्यावेळी ते स्वत: प्रॅक्टीस करीत होते, त्यावेळी ते 24 तास हॉस्पिटलमध्ये बसत होते काय ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना एक उपाय सांगू इच्छितो. तालुक्याच्या ठिकाणी अनेक खाजगी डॉक्टर प्रॅक्टीस करीत असतात. आपण जर त्यांना चांगल्या प्रकारचे रेम्युनरेशन दिले, चांगले अनुदान दिले, चांगला भत्ता दिला तर कोणतेही डॉक्टर आपल्याकडे काम करण्यास तयार होतील. पण याबाबतीत राज्य शासनाची राजकीय इच्छाशक्ती पाहिजे की, आपल्याला ही प्रायमरी हेल्थ सेंटर चालवावयाची आहे. त्यामुळे याबाबतीत अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय घेणार आहात काय ?

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत. . .

असल्यास तो निर्णय सर्व महाराष्ट्रभर लागू करावा, अशी माझी सूचना आहे. दुसरी गोष्ट अशी की, आमच्याकडे 25 हजार रुपये फंड येतो. पण आऊटडोअर पेशंन्टची संख्या किती आहे तसेच इनडोअर पेशंन्टची संख्या किती आहे? याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा केलेला नाही. 25 हजार रुपये स्विय प्रपंची फंडात असतात. त्यातून एकावेळी किती रुपयाची औषधे मागविता येतात ? तसेच दर महिन्याला येणा-या एकूण रुग्णांची सख्यां किती आहे?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, याबाबतची माहिती सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. 25 हजार रुपये तातडीच्या व अत्यावश्यक औषधांच्या खरेदीसाठी आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधे उपलब्ध असतात परंतु काही अत्यावश्यक औषधांसाठी हे पैसे ठेवण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्यांचा पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे की, प्रत्येक तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी किंवा इतर ठिकाणी खाजगी डॉक्टर्स आहेत. खाजगी डॉक्टर्सना रेम्युनरेशन चांगले दिले तर ते डॉक्टर्स आपल्याकडे येऊ शकतात. याबाबतीत एन.आर.एच.एम.मध्ये तरतूद केलेली आहे. शासनाचा असाही प्रयत्न आहे की, ज्या ज्याठिकाणी डॉक्टर्सची कमतरता आहे त्या त्याठिकाणी डी.एच.ओ. किंवा सी.एस. खासगी डॉक्टर्सना कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर घेऊ शकतात. अनेक प्रकारच्या कॉन्ट्रॅक्टरवर डॉक्टर्सना नेमता येईल. डेली बेसिसवर, काही तासांवर किंवा केसवाईज सुध्दा खासगी डॉक्टर्सना नेमता येईल. या सगळया तरतुदी या वर्षीपासून सुरु करण्यात आल्या आहेत. सध्या शासनाचा एक प्रयोग असा आहे की, दुर्गम भागात असलेल्या मेडिकल कॉलेजेसना त्याठिकाणच्या पी.एच.सी. एफिलिएट करण्याचा प्रयोग वर्धा जिल्हयात करण्यात येत आहे. अशा पध्दतीने दुर्गम भागातील दोन मेडिकल कॉलेजेसकडे काही पी.एच.सी. आणि काही आर.एच., एन.आर.एच.एम. अंतर्गत दिलेल्या आहेत. या मेडिकल कॉलेजेसनी हे काम यशस्वीपणे राबविले तर इतर जिल्हयामध्ये असलेल्या मेडिकल कॉलेजेसना देखील या कार्यक्रमामध्ये इन्व्हॉल करण्यात येईल. डॉक्टर्स मेडिकल कॉलेजेसमधूनच तयार होतात. डॉक्टर्स मिळण्याचा तोच प्रमुख सोर्स आहे. तेथूनच चांगले डॉक्टर्स मिळू शकतात आणि जास्त संख्येमध्ये मिळू शकतात. त्यामुळे याबाबतीत शासनाचा प्रयोग चालू आहे. सन्माननीय सदस्य जो प्रश्न उपस्थित करीत आहेत, त्या प्रश्नाचे उत्तर आणि त्याबाबतीतील अडचणी त्यांना सुध्दा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे. . . .

माहीत आहेत. सन्माननीय सदस्यांच्या विधायक सूचना शासन केव्हाही स्वीकारण्यास तयार आहे. सन्माननीय सदस्यांच्या आणखी काही सूचना असतील तर त्यांनी माझ्याकडे जेवणासाठी यावे, त्याठिकाणी आपण याबाबतीत चर्चा करु.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ.शी.: डहाणू व तलासरी तालुक्यातील आदिवासी मच्छिमारांना समुद्री वादळात बोटी बुडाल्यामुळे मिळालेली जलसमाधी.

मु.शी.: डहाणू व तलासरी तालुक्यातील आदिवासी मच्छिमारारांना समुद्री वादळात बोटी बुडाल्यामुळे मिळालेली जलसमाधी याबाबत श्री.संजय केळकर, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंसबंधीची सूचना मांडतो.

डहाणू व तलासरी (जि. ठाणे) तालुक्यातील असंख्य आदिवासी मच्छिमार बांधव गुजराथ राज्यातील बोटीवर खलाशी/मच्छिमार म्हणून कार्यरत असताना त्यांच्या बोटी समुद्री वादळामुळे भरकटून खडकावर आपटून लाटांच्या तडाख्यात सापडून फुटल्याने बोटीवरील सर्वांना जलसमाधी मिळालेली आहे. खवळलेल्या भर समुद्रात बोट बुडाल्याने त्यांचे मृतदेह मिळालेले नाहीत. त्यामुळे त्यांचे मृत-दाखला अगर शवविच्छेदन अहवाल तयार झालेले नाहीत व शासनाच्या नियमानुसार मृत असल्याचा दाखला असल्याशिवाय त्यांच्या वारसांना आर्थिक मदत देता येत नाही. घरचा कर्ता माणूस गेला तरी शासन आर्थिक मदत देत नाही. त्यामुळे अशा आदिवासी मच्छिमारांचे कुटुंबीय अक्षरश: रस्त्यावर पडले आहेत. याबाबत शासनाला वेळोवेळी कळविलेले आहे. एका बाजूला केंद्र सरकारने पाकिस्तानच्या जेलमध्ये असलेल्या मच्छिमारांच्या कुटुंबीयांना मदत केलेली आहे. त्या संबंधीचा जी.आर.सुध्दा निघालेला आहे आणि त्यांच्या कुटुंबियांना तीन लाख रुपये मदत देण्यात आलेली आहे. केंद्र सरकार शेतक-यांना मदत देते परंतु राज्य सरकार शेतक-यांना कुठल्याही प्रकारची मदत देत नाही. 1999 साला पासून शेकडो मच्छिमार बेपत्ता झालेले आहेत. मच्छिमारांना जगायला साधन नाही म्हणून ते कुठल्यातरी बोटीवर काम करतात. बोटीवर काम करीत असतांना जे मच्छिमार बेपत्ता झालेले आहेत आणि जे मृत झालेले आहेत त्या मच्छिमारांच्या कुटुंबीयांकडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर. . .

दुर्लक्ष केल्याने डहाणू, तलासरी भागातील जनतेंच्या मनामध्ये, तसेच आदिवासी कुटुंबीयांमध्ये अतिशय चिडीची भावना निर्माण झालेली आहे. त्या भावनेचा उद्रेक होण्याची शक्यता असल्याने त्यांच्या भावना मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणीत आहे. तरी तातडीने कार्यवाही व्हावी ही विनंती. धन्यवाद.

यानंतर श्री. बरवड. . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : श्रीवर्धन तालुक्यातील (जि.रायगड) दिघीसह, मुरुड तालुक्यातील राजपुरी व आगरदांडा येथे प्रवासी वाहतुकीसाठी शासनाने जेट्टींची दुरुस्ती करण्याची आवश्यकता

मु.शी. : श्रीवर्धन तालुक्यातील (जि.रायगड) दिघीसह, मुरुड तालुक्यातील राजपुरी व आगरदांडा येथे प्रवासी वाहतुकीसाठी शासनाने जेट्टींची दुरुस्ती करण्याची आवश्यकता याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्री. उल्हास पवार) : मा□□य सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

" श्रीवर्धन व म्हसळा (जि. रायगड) तालुक्यातील रहिवाशांच्या सोयीसाठी त्याचबरोबर पर्यटकांसाठी श्रीवर्धन तालुक्यातील दिघीसह, मुरुड तालुक्यातील राजपुरी व आगरदांडा येथे प्रवासी वाहतुकीसाठी शासनाने 30 वर्षापूर्वी जेट्टी बांधल्या. या जेट्टी मेरीटाईम बोडाच्या अखत्यारीत येतात. त्या जेटीवरुन दरवर्षी लाखो प्रवासी जलमार्गाने प्रवास करतात. त्यातून दरवर्षी लाखोंचा महसूल शासनाला मिळतो.

आगरदांडा ते दिघी आणि राजपुरी ते दिघी अशी लॉंचसेवा असून पावसाळ्यात राजपुरी ते दिघी ही सेवा बंद असते आणि आगरदांडा ते दिघी ही सेवा बारमाही सुरु असते. त्याचबरोबर समुद्रातील जंजिरा किल्ल्यात जाण्यासाठी शिडाच्या होड्या पावसाळ्याचे दिवस वगळता सुरु असतात. शिडाच्या होडीने एप्रिल 2006 ते 2007 मध्ये 3 लाख 19 हजार 136 तर आगंरदांडा व राजपुरी मोटारलॉंचेने 29 हजार 240 प्रवाशांनी प्रवास केल्याचे मेरीटाईम बोर्डाकडून समजते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

मुरुड तालुक्यातील मेरीटाईम बोर्डाचे सहाय्यक बंदर पर्यवेक्षक एन.जे.भगत यांनी आगरदांडा जेट्टीच्या झालेल्या दुरावस्थेबाबत अलिबागच्या कार्यालयाकडे ऑगस्ट, 2007 मध्ये पत्र पाठवून या कार्यालयाचे याकडे लक्ष वेधले होते. त्या पत्रात पावसाळ्यात उसळणाऱ्या आणि समुद्राला येणाऱ्या मोठ्या उधाणाच्या लाटांच्या तडाख्याने जेट्टीचे बांधकाम कमकुवत झाले आहे. ही जेट्टी खूपच जुनी असल्याने त्याची आयुमर्यादाही संपलेली आहे. ही जेट्टी कोणत्याही क्षणी कोसळून प्राणहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे कळविले होते.

अलिबाग कार्यालयाला हे पत्र मिळताच या कार्यालयाने मेरीटाईम बोर्डाचे मुख्य बंदर अधिकारी यांच्या कार्यालयाला या प्रकरणी पत्र लिहून या कार्यालयाचे याकडे लक्ष वेधले होते. मागील वर्षीही अशाच प्रकारची पत्रे अलिबाग कार्यालयाने मुख्य बंदर अधिकारी कार्यालयाकडे पाठविली होती. परंतु त्यानंतर कोणतीच हालचाल या कार्यालयाकडून न झाल्याने आगरदांडा जेट्टीची दुरुस्ती होऊ शकलेली नाही.

सबब या जेट्टीची दुरुस्ती करण्यासाठी व पर्यटन विकासाचे एक चांगले ठिकाण निर्माण होण्यासाठी मी शासनाचे लक्ष या विशेष उल्लेखाव्दारे वेधत आहे."

--- ----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाने 9 हजार कोटीचा नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प रोखून ठेवला असल्याने मुंबईतील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विमानतळांवर अतिरिक्त ताण पडणे

मु. शी. : केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाने 9 हजार कोटीचा नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प रोखून ठेवला असल्याने मुंबईतील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विमानतळांवर अतिरिक्त ताण पडणे याबाबत श्री. संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□य सदस्य श्री. संजय दत्त यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

" मुंबईतील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विमानतळांवर अतिरिक्त ताण पडत आहे. साहजिकच हवाई वाहतुकीमध्ये नेहमीच ट्रॅफिक जॅम होण्याचे प्रकार नित्यनेमाने घडत आहेत. परिणामी विनाकारण अत्यंत मूल्यवान असलेले इंधन नष्ट होणे, हवाई प्रवाशांच्या वेळेचा अपव्यय होणे, याकरिता आणखी एक विमानतळ तातडीने तयार करण्याची गरज आहे. खारफुटीचे कारण देऊन पर्यावरण मंत्रालयाने 9 हजार कोटींचा नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प रोखून ठेवला आहे. त्याचबरोबर नवी मुंबई विमानतळाची जागा बदलली जाणार नाही अशी भूमिका केंद्रीय उड्डाण मंत्र्यांनी घेतलेली असणे, राज्य शासनाने या अत्यंत महत्वाच्या गंभीर प्रश्नावर तातडीने तोडगा काढण्याची गरज आहे. या सार्वजनिकदृष्ट्या अत्यंत महत्वाच्या प्रश्नासंदर्भात विशेष उल्लेखाची सूचना दाखल करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील अनेक शाळांना पैसे भरुनही विद्युत पुरवठा न होणे व शाळांची कागदपत्रे महावितरण कंपनीने गहाळ करणे

मु. शी. : ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील अनेक शाळांना पैसे भरुनही विद्युत पुरवठा न होणे व शाळांची कागदपत्रे महावितरण कंपनीने गहाळ करणे याबाबत श्री. रामनाथ मोते वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□य सदस्य श्री. रामनाथ मोते यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

" ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील अनेक शाळांना पैसे भरुनही विद्युत पुरवठा होत नसल्याबद्दल व शाळांची कागदपत्रे महावितरण कंपनीने गहाळ केल्याबद्दलचा विषय या विशेष उल्लेखाव्दारे मांडत आहे."

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यामध्ये आदिवासी भाग फार मोठ्या प्रमाणावर आहे. मोखाडा तालुका संपूर्ण आदिवासी तालुका आहे. या आदिवासी तालुक्यामध्ये प्राथमिक शाळांना विद्युतपुरवठा मिळण्यासाठी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह 2004-05 मध्ये या शाळांचा प्रस्ताव महावितरण कंपनीकडे सादर केलेला आहे. त्यासाठी आवश्यक असलेला कोट्यवधी रुपयांचा निधी सुध्दा आदिवासी विभागाने संबंधित महावितरण कंपनीला दिलेला आहे. आदिवासी विभागाने ज्या कंपनीला हा निधी दिला त्यांच्याकडून या तालुक्यातील जवळजवळ 23 गावे आणि पाड्यांमधील शाळांना विद्युत पुरवठा होण्यासाठी विद्युत जोडणीचे काम केलेले नाही. या सर्व गावांमध्ये आणि पाड्यांमध्ये जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा आहेत. या सर्व प्राथमिक शाळांना शासनाकडून आणि सर्व शिक्षा अभियानातून दूरदर्शन संच मिळालेले आहेत तसेच संगणक मिळालेले आहेत परंतु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

केवळ विद्युत जोडणी न मिळाल्यामुळे, विद्युत पुरवठा न मिळाल्यामुळे हे संगणक धूळ खात पडलेले आहेत. दूरदर्शनचा उपयोग होऊ शकत नाही. खऱ्या अर्थाने या गोरगरीब मुलांना या सुविधा मिळण्याची व्यवस्था शासनाने केलेली आहे परंतु एम.एस.ई.बी.कडून किंवा महावितरण कंपनीकडून वेळेवर त्यांना जोडणी न दिल्यामुळे ही सगळी मुले अंधारात आहेत. गेली अनेक वर्षे महावितरण कंपनीच्या संबंधित उपअभियंत्याने या कामाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले असल्यामुळे विद्युत जोडणीच्या प्रस्तावाचे काम झालेले नाही. सर्व फाईल महावितरण कंपनीकडून गहाळ झालेल्या आहेत. कोणताही कागद त्या ठिकाणी उपलब्ध नाही. त्यामुळे त्या शाळांना कनेक्शन मिळत नाही. कालच संबंधित अधिकाऱ्याशी बोललो. त्यांनी सांगितले की, मला येऊन 4 महिने झालेले आहेत. चारपाच वर्षापूर्वी जे उपअभियंता असतील त्यावेळी कामे रखडलेली आहेत. माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनाशी संबंधित हा प्रश्न आहे. सर्व पैसे भरलेले असल्यामुळे तातडीने त्या शाळांना विद्युत जोडणीचे काम महावितरण कंपनीकडून हाती घेऊन पूर्ण व्हावे यासाठी मी हा विषय या विशेष उल्लेखाव्दारे मांडत आहे.

....6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बोर्डाच्या वतीने परीक्षा केंद्रावर कॉपी होऊ नये म्हणून केलेल्या विविध उपाययोजनेचा गैरफायदा घेऊन बऱ्याच केंद्रावर पोलिसांनी जाणीवपूर्वक शिक्षकांना अटक करणे

मु. शी. : बोर्डाच्या वतीने परीक्षा केंद्रावर कॉपी होऊ नये म्हणून केलेल्या विविध उपाययोजनेचा गैरफायदा घेऊन बऱ्याच केंद्रावर पोलिसांनी जाणीवपूर्वक शिक्षकांना अटक करणे याबाबत श्री. विक्रम काळे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□य सदस्य श्री. विक्रम काळे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

" राज्यभर इयत्ता 10 वी व 12 वी च्या बोर्ड परीक्षा सुरु आहेत. बोर्डाच्यावतीने परीक्षा केंद्रावर कॉप्या होऊ नयेत म्हणून विविध उपाययोजना केल्या जातात. पोलीस प्रशासनाची मदत घेण्यात येते. शासनाने मंडळाच्या मार्फत परीक्षा केंद्रावर एखाद्या हॉलमध्ये कॉपी करताना एखादा विद्यार्थी सापडला तर त्या हॉलवर पर्यवेक्षण करणाऱ्या संबंधित शिक्षकावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा आदेश दिल्याचे समजते. याचा गैरफायदा घेऊन बऱ्याच परीक्षा केंद्रावर पोलीस जाणीवपूर्वक शिक्षकांना अटक करीत आहेत. व त्यांचा मानसिक छळ करीत आहेत. दिनांक 29.2.2008 रोजी घाटनांदूर, ता. अंबाजोगाई, जि. बीड येथील 12 वीच्या परीक्षा केंद्रावर अशाच पध्दतीने एका शिक्षकाला अटक करुन मारहाण करण्याचा प्रयत्न पोलिसांनी केलेला आहे.

तरी माननीय शिक्षण मंत्री यांना विनंती आहे की, त्वरित याबाबत परीक्षा मंडळाला सूचना देऊन शिक्षकांवर होणारी पोलिसांची दडपशाही थांबवावी अशी सूचना मी या विशेष उल्लेखाव्दारे मांडत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. विक्रम काळे .....

सभापती महोदय, सध्या राज्यामध्ये इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षा सुरु आहेत. या परीक्षा एस.एस.सी. बोर्डामार्फत घेतल्या जातात. महाराष्ट्र राज्यात माननीय शिक्षण मंत्र्यानी वर्तमानपत्राच्या माध्यमातून असे प्रसिध्द केले होते की,

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

एखाद्या परीक्षा केंद्रावर एखाद्या हॉलमध्ये विद्यार्थ्यास कॉपी करीत असताना पकडले तर त्या हॉलमधील परीक्षकाविरुध्द फौजदारी कारवाई केली जाईल असे सूतोवाच केले होते. त्याचा गैरफायदा घेऊन पोलीस शिक्षकांना वेठीस धरण्याचे काम करीत आहेत. अंबेजोगाई तालुक्यातील घाटनांदूर येथील परीक्षा केंद्रावर दिनांक 29.2.2008 रोजी एका शिक्षकाला पकडण्यात आले. त्यांना केवळ पकडले नाही तर पोलिसांनी मारहाण करण्याचे काम केले आहे. म्हणून माझी या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने विनंती आहे की, अशाप्रकारे शिक्षकांना वेठीस धरण्याचे काम, त्यांना अटक करुन मारहाण करण्याचा अतिरेक पोलिसांनी चालविला आहे त्याच्यावर निर्बंध घालण्यात यावे.

तालिका सभापती (श्री.उल्हास पवार) : शासनाने नोंद घ्यावी.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: साळाव खाडीवरील (ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड) जेट्टीची सुधारणा करणे

मु.शी.: साळाव खाडीवरील (ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड) जेट्टीची सुधारणा करणे या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 9620 ला दिनांक 8 डिसेंबर, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : अध्यक्ष महाराज, 'साळाव खाडीवरील (ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड) जेट्टीचीसुधारणा करणे' या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 9620 ला दिनांक 8 डिसेंबर, 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, रेवदंडा, मुरुड-जंजिरा याठिकाणी प्रवासी जेट्टी सुरु होती. 1985 साली रेवदंडा खाडीवर जेट्टी बांधण्यात आली होती, त्या जेट्टीची अवस्था अतिशय खिळखिळी झालेली आहे. या जेट्टीवर प्रवासी वाहतूक होत होती आणि काही मच्छिमार आपल्या होडया सुध्दा लावत होते. या रेवदंडा खाडीवर 16 कोळीवाडे आहेत. यामध्ये रेवदंडा कोळीवाडा, खंडेराव कोळीवाडा, आगराराव कोळीवाडा, बाजारपाडा कोळीवाडा, आगल्याची वाडी कोळीवाडा, दरसोलपाडा कोळीवाडा, साळाव कोळीवाडा, बोरली कोळीवाडा, चोरडे कोळीवाडा आदि 16 कोळीवाडयातील लोक जेट्टीवरुन प्रवासी वाहतूक व माशांची वाहतूक करीत होते. 1985 सालापासून मेरी टाईम बोर्डाने या जेट्टीच्या दुरुस्तीसाठी एक रुपया सुध्दा खर्च केलेला नाही. त्यामुळे तेथील मच्छिमारांची गैरसोय होत आहे. या जेट्टीची शासनाने तातडीने दुरुस्ती करावी अशी विनंती मी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर (खार जमीन व बंदरे राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी महत्वाच्या विषयावर अर्धा-तासाची चर्चा उपस्थित केलेली आहे. रेवदंडा तालुक्यात खाडीवर पूल झाल्यामुळे प्रवासी वाहतूक कमी झालेली आहे....

श्री.जयंत प्र.पाटील : तो पूल होण्यापूर्वी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून तरीचा लिलाव होत होता आणि त्या तरीतून प्रवासी वाहतूक होत होती. आता ही तर बंद झाल्यामुळे लिलाव सुध्दा बंद झालेला आहे. त्याठिकाणचे मच्छिमार आपल्या होडया हावत होते. परंतु पूल झाल्यामुळे या 16 कोळीवाडयातील लोकांसमोर प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे होडया लावण्यासाठी जेट्टीची योग्य प्रकारे दुरुस्ती करावी.

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. प्रवासी वाहतूक पूलावरुन होत आहे. मच्छिमार जेट्टीचा उपयोग करतात, परंतु ती जेट्टी नादुरुस्त झाली आहे याबद्दल शंका नाही. या जेट्टीची दुरुस्त करण्यात येईल. या जेट्टीच्या दुरुस्तीचे काम मत्स्यव्यवसाय विभागाकडे जाणार आहे. या कामाचे अंदाजपत्रक मंजूर झाल्यानंतर लगेच दुरुस्ती करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : मी हा प्रश्न चार वेळा उपस्थित केलेला आहे. माननीय सभापतींनी माझी विनंती मान्य करुन हा विषय अर्धा-तास चर्चेमध्ये कन्व्हर्ट केला आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील...

माझी माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, मेरीटाईटम बोर्डाकडे भरपूर पैसे आहेत, त्यामुळे त्यांनी स्वत:च्या निधीतून या जेट्टीची दुरुस्ती करावी. आम्हास निधीसाठी डीपीडीसीकडे किंवा अन्य कुठे जाण्यास सांगू नये. दुरुस्तीसाठी फक्त 5-10 लाख रु. लागणार आहेत. हा प्रश्न मी या ठिकाणी उपस्थित केल्यानंतर त्याचे उत्तर मेरीटाईम बोर्डाने द्यावयाचे की मत्स्यव्यवसाय विभागाने द्यावयाचे हे त्यांचे त्यांनीच ठरवाचे आहे. कोणत्याही विभागाने उत्तर दिले तरी शासन म्हणूनच तो विभाग या प्रश्नाला उत्तर देणार आहे.म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, मेरीटाईम बोर्डाने त्यांच्या स्वत:च्या निधीतून या जेट्टीची दुरुस्ती करावी.

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : सन्माननीय सदस्यांनी केलेली मागणी मान्य करुन त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात येईल.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : 400 एकर शेतजमीन सरकार जमा करण्याच्या तहसीलदारांच्या आदेशाबाबत

मु. शी. :"400 एकर शेतजमीन सरकार जमा करण्याच्या तहसीलदारांच्या आदेशाबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 9476 ला दिनांक 7 डिसेंबर 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. जयंत प्र. पाटील यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, "400 एकर शेतजमीन सरकार जमा करण्याच्या तहसीलदारांच्या आदेशाबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 9476 ला दिनांक 7 डिसेंबर 2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, नाशिक, दिंडोरी या ठिकाणी शासनाने रेशिम उद्योगासाठी शेतक-यांची 850 एकर जमीन संपादित केली होती. परंतु त्या जमिनीवर कोणताही रेशिम उद्योग सुरु झाला नाही. म्हणून ती जमीन पुन्हा शेतक-यांना द्यावी अशा प्रकारची मागणी मी या सदनामध्ये दोन वेळा प्रश्नाच्या माध्यमातून केली होती. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, आपली मागणी बरोबर आहे. याबाबतीत चौकशी करुन शेतक-यांची संपादित केलेली जमीन परत करण्यात येईल. नंतर पुन्हा मी याठिकाणी प्रश्न उपस्थित केला त्यावेळी सन्माननीय महसूल राज्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले की, याबाबतीत उच्च पातळीवर चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येईल. सभापती महोदय, विकास आयुक्ताची चौकशी करण्यासाठी तहसीलदाराला नेमले. तहसीलदार विकास आयुक्ताची चौकशी करु शकतो काय ? 342 एकर जमीन त्या कंपनयांनी परस्पर दुस-याना विकली. आज नाशिक आणि दिंडोरी परिसरातील जमिनीचे भाव गगनाला भिडलेले आहेत. ज्या कारणासाठी शेतक-यांची जमीन संपादित केलेली असेल त्याच कारणासाठी ती वापरली पाहिजे अन्यथा ती शेतक-यांना परत केली पाहिजे अशी कायद्यामध्ये तरतूद आहे. ही संपादित केलेली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र.पाटील....)

जमीन शेतक-यांना परत करण्यासंबंधी राज्याच्या माननीय मुख्यमंत्री या सभागृहामध्ये आश्वासन देऊन देखील त्या आश्वासनाप्रमाणे कार्यवाही होत नाही. त्या कंपन्यांनी ही जमीन विकलेली असून ती विकण्यासाठी ज्या विकास आयुक्तांनी किंवा संबंधित अधिका-यांनी त्या कंपन्याना साथ केली आहे त्यांची सीआयडी चौकशी करावी आणि ती जमीन शेतक-यांना परत करावी अशी मागणी मी या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने करीत आहे. तेथील गरीब शेतक-यांच्या जमिनी रेशिम उद्योगासाठी संपादित केलेली आहे. परंतु त्या ठिकाणी तो उद्योगच उभा राहिलेला नाही. सभापती महोदय, उद्योग उभा करण्यासाठी शेतक-यांच्या जमिनी संपादित केल्या जातात, त्या 10-15 वर्षे तशाच ठेवल्या जातात, कोणत्याही प्रकारचा उद्योग त्याठिकाणी सुरु केला जात नाही आणि चढ्या भावाने त्या जमिनी विकल्या जातात. यामुळे गरीब शेतकरी मात्र उद्ध्वस्त होतो. तेव्हा या प्रकरणी लक्ष घालून शेतक-यांना त्यांच्या जमिनी परत करण्याच्या दृष्टीने तातडीने निर्णय घ्यावा अशी मी शासनाला विनंती करतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ SBT/

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून याठिकाणी संपादित जमिनीचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. किर्लोस्कर सिल्क इंडस्ट्रीज, पुणे आणि ओरिएण्टल सेरिटेक या दोन कंपन्यांनी दिंडोरी तालुक्यातील अनुक्रमे 433 व 417.5 एकर जमीन विकास आयुक्तांची परवानगी घेऊन विकत घेतली होती. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या दोन्ही कंपन्यांनी जमीन विकत घेतली होती ही गोष्टी खरी आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे....

त्या ठिकाणी किर्लोस्कर सिल्क इंडस्ट्रीजने जवळपास 4.07 एकर जमीन विकून टाकली होती. आणि ओरिएन्टेल सेरिटेक या कंपनीने सुध्दा 323.01 एकर जमीन विकून टाकली होती. कोणत्याही कायद्याने वा नियमाने ती जमीन विक्री करता येत नसतानाही त्यांनी जमिनी विकून टाकल्या होत्या. विकास आयुक्तांनी रेशीम उद्योग उभारणी करण्यासाठी या कंपन्यांना जमिनी उपलब्ध करुन दिल्या होत्या. परंतु या कंपन्यांनी त्या जमिनीवर कोणत्याही प्रकारचा उद्योग न उभारता त्या जमिनी त्यांनी विकून टाकल्या. परंतु सदर कंपनीना ज्या प्रयोजनासाठी जमिनी दिल्या त्या प्रयोजनासाठी जमिनीचा उपयोग केला नाही तर जमीन मालकांना मूळ किंमतीत जमीन खरेदी करण्याचा अधिकार अबाधित ठेवण्यात आला असून तशी नोंद 7/12 च्या उता-यामध्ये त्या ठिकाणच्या तहसीलदारांनी नोंद करुन ठेवलेली आहे. या कंपन्यांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या इतर जमिनी ख-या खु-या औद्योगिक वापरासाठी उपयोगात न आणल्यामुळे शासनाने जवळपास किर्लोस्कर सिल्क इंडस्ट्रीजला 21 लाख 81 हजार 141 रुपये दंड केलेला आहे. ओरिएन्टल सेरिटेक कंपनीला सुध्दा जवळपास 25 लाख 59 हजार 792 रुपये एवढा दंड आकारलेला आहे. या दोन्ही कंपन्यांना जमिनी दिल्या होत्या, त्या जमिनी सरकार जमा करुन घेतलेल्या आहेत. ज्या शेतक-यांकडून ही जमीन विकत घेतलेली होती, त्या शेतक-यांना त्या जमिनी मूळ किंमतीत दिल्या गेल्या पाहिजेत अशा प्रकारची कायद्यात तरतूद आहे. ज्या कारणासाठी या कंपन्यांनी जमीन विकत घेतली होती, त्या कारणासाठी ती जमीन वापरली नाही तसेच अशा जमिनींचा वापर पाच वर्षात प्रयोजनासाठी केला गेला नाही तर अशा जमिनीची मागणी मूळ शेतक-यांनी केली तर ती जमीन त्यांना मूळ किंमतीत परत देण्यात यावी अशा प्रकारची शासनाने प्रोव्हीजन केलेली आहे. या ठिकाणच्या शेतक-यांनी ती जमीन परत मिळावी अशी मागणी केली तर त्या शेतक-यांना त्यांच्या जमिनी परत देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. ही जमीन सरकार जमा करुन घेतलेली आहे. तसेच या जमिनीचा विनियोग ज्या प्रयोजनासाठी करावयास पाहिजे होता, तो केला नाही म्हणून त्या कंपन्यांवर दंडाची कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याविरुध्द करण्यात आलेल्या कारवाईच्या विरुध्द त्यांनी अपील केले आहे. एम.आर.टी.मध्ये ते अपील प्रलंबीत आहे. त्या अपीलाच्या संदर्भात पाठपुरावा करण्यात येत आहे. सभापती महोदय,या ठिकाणी कंपन्यांनी अतिशय बेजबाबदारपणाने व्यवहार केलेला असल्यामुळे, तसेच ते व्यवहार गैरकायदेशीर अणि नियमाला धरुन केलेले

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे..

नसल्यामुळे तेथील जमिनी संबंधित मूळ मालकांना परत देण्याच्या संदर्भात शासन स्वत:हून पुढे येईल एवढे मी या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो. यापुढे देखील शेतक-यांना मदत करण्याची भूमिकाच शासनाची राहणार आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : माननीय महसूल राज्यमंत्र्यांच्या उत्तराने माझे समाधान झालेले आहे. ज्या आयुक्तांच्या सहमतीने या कंपन्यांनी अशा प्रकारचा गैरव्यवहार केलेला आहे. त्याबाबतची चौकशी झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. परवानगी न घेता कंपन्यांनी जमीन विक्रीचे व्यवहार केलेले आहेत. माननीय मंत्री महोदय, म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावतो आहे. अशा प्रकरणी संबंधित अधिका-यांवर कारवाई झाली नाही तर त्या गोष्टीची पुनरावृत्ती होऊ शकते. ज्या अधिका-यांच्या सहमतीने अशा प्रकारच्या व्यवहार केलेला आहे, त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात यावी अशी मी पुन्हा मागणी करतो.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या प्रकरणात आयुक्त असतील किंवा महसूल अधिका-याचे अधिकारी सहमत असतील, मग त्यात तलाठी असतील, मंडल अधिकारी असतील, इतर महसूल विभागाच्या संबंधित अधिकारी असतील, त्यांनी या प्रकरणात कुठे अनियमितता केली असेल, नियमांचे उल्लंघन केले असेल तर त्याबाबतची निश्चितपणे चौकशी केली जाईल आणि योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

तालिका सभापती (श्री. उल्हास पवार) : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 12 मार्च, 2008 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 53 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 12 मार्च, 2008 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------X----------

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही